# उल्हास हरी जोशी

# आधुनिक बोधकथा



# आधुनिक बोधकथा

उल्हास हरी जोशी

ई साहित्य प्रतिष्ठान

# आधुनिक बोधकथा

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओोळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

आधुनिक बोधकथा

लेखकाचे संपूर्ण नांव:- उल्हास हरी जोशी

Ph. : 9226846631/ 9309765192

joshiulhas5@gmail.com

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पूनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान


www.esahity.com


esahity@gmail.com


प्रकाशन : ५ जानेवारी २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.









उल्हास हरी जोशी यांची ई साहित्य तर्फ़े प्रकाशित पुस्तके

या कव्हर्स वर क्लिक करताच ती ती पुस्तके उघडतील



# लेखकाची ओळख

## श्री. उल्हास हरी जोशी



उल्हास हरी जोशी यांचा जन्म 24 मे 1946 चा. शिक्षणाने ते मेकॅनिकल इंजिनिअर आहेत पण त्यांचे सर्व करिअर मार्केटींग व सेल्स मध्ये घडले असून त्यांना 48 वर्षांचा मार्केटींग व सेल्सचा अनुभव आहे. त्यांनी किर्लोस्कर ऑईल इंजिन्स, किर्लोस्कर न्युमॅटीक, मायको (बॉश), स्वराज माझदा, साई सर्विस, बजाज, टाटा मोटर्स इत्यादी कंपन्यांमध्ये काम केले.. सन 2002 पासुन ते आर्थिक सेवा क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांनी भरपूर प्रवास केला असून अनेक वेळा परदेशात जाऊन आले आहेत.

एक छंद म्हणुन त्यांनी लोखनाला सुरवात केली. त्यांचे 'मार्केटिंग' या विषयावरचे 'Marketing For Everybody' हे इंग्रजी पुस्तक 2005 साली अमेरिकेत प्रसिद्ध झाले. त्यांचे अनेक लेख सांगलीहून प्रसिद्ध होणाऱ्या 'आम्ही उद्योजिका', पुण्याहून प्रसिद्ध होणाऱ्या 'ब्राह्मण व्यावसायिक पत्रिका, व्यापारी मित्र, उत्तम कथा' तसेच नाशीकहून प्रसिद्ध होणाऱ्या 'अमृत' या मासीकांमधून प्रसिद्ध झाले आहेत. तसेच पुण्याहून प्रसिद्ध होणाऱ्या सकाळ, महाराष्ट्र टाईम्स, प्रभात या

वर्तमानपत्रांमधून त्यांचे लेख प्रसिद्ध होत असतात. नुकतेच त्यांचे पुण्याचे यशस्वी उद्योजक 'डी. व्ही. ब्रह्मे' यांच्या चरित्रावर आधारीत 'कर्मयोगी' हे पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. ई-साहित्य प्रतिष्ठान तर्फे त्यांची 'हिंमते मर्दा, यशोयुतांम वंदे, निती संपदाची, पाऊल पडते पुढे, मिसेस बी-नाबाद 104 ही पुस्तके प्रकाशीत झाली आहेत.

हल्लीच्या मराठी तरुण तरूणींनी नोकरीच्या मानसिकतेमधून बाहेर पडून उद्योग व्यवसायाच्या मानसिकतेमध्ये शिरावे या दृष्टीने त्यांचे प्रयत्न चालु असतात. तसेच मराठी माणसाची आर्थिक साक्षरता वाढावी या दृष्टीने पण ते प्रयत्नशील असतात.

# आधुनीक बोधकथा

माझ्या लहानपणी ईसापनितीच्या कथा फार प्रसिद्ध होत्या. या छोट्या छोट्या कथा आयुष्यातील काही महत्वाची प्रिन्सिपल्स सहज शिकवुन जायच्या. या कथांचे नाव ईसापनिती असेच होते. ईसाप नावाचा हा माणूस प्रत्यक्षात गुलाम होता म्हणे. आपल्या मालकाच्या मुलांचे मनोरंजन करण्यासाठी तो या कथा रचून सांगत असे. बहुतेक कथा या प्राणी आणि पक्षांबद्दल असत. या कथा त्यावेळी अत्यंत लोकप्रीय झाल्या होत्या.

अशाच दुसऱ्या लोकप्रीय झालेल्या कथा म्हणजे ‘पंचतंत्र’ या कथा. या कथा पण प्राणी आणि पक्षी यांबद्दलच असायच्या. या कथा पण आयुष्यातील काही महत्वाची ‘तत्वे’ शिकवुन जायच्या. थोडक्यात या कथांमधून काहीतरी शिकायला मिळायचे.

ज्या कथांमधून किंवा गोष्टींमधून काहीतरी शिकायला मिळते त्यांना ‘बोध कथा’ असे म्हणतात. या कथा जशा प्राचीन काळात सांगीतल्या जात होत्या तशाच त्या हल्लीच्या म्हणजे आधुनीक काळात पण सांगीतल्या जातात. या कथांमधुनही बरेच काही शिकता येते. माझ्या हातुन अशा काही कथांचे लिखाण झाले असल्याचे माझ्या लक्षात आले आहे. अर्थात माझे लिखाण हे माझे स्वतःचे तसेच इतरांच्या अनुभवावर आधारलेले आहे. यातील बहुतेक कथा फेसबूकवर पोस्ट केलेल्या आहेत. यातील काही कथांना तर प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. काही कथा तर व्हॉट्सअपवर व्हायरल पण झाल्या आहेत. मला अनेक ठिकाणाहुन या कथा आवडल्याचे फोन, मेसेजेस आणि व्हॉट्सअप मेसेजेस येत असतात.

असे हे लेख एकत्र करून ते पुस्तक रुपाने प्रसिद्ध केल्यास ते वाचकांना आवडेल असे वाटल्यामूळे हा प्रपंच. माझा हा प्रयत्न यशस्वी करायचा की नाही हे वाचकांनीच ठरवायचे.

अनुक्रमणिका


1 - शहाणपण हॉट चॉकलेट मधील

2 - EXPLAIN GOD

3 - पाय वापरायला शिका

4 - जसे पेराल तसे उगवेल

5 - माणुसकीची किंमत

6 - कॉर्पोरेट कल्चर (Corporate Culture)

7 - माणसाच्या बाह्य रुपावरून त्याची किंमत किंवा पारख करू नका!

8 - टॉयलेट (Toilet) संस्कृती

9 – ‘श्रद्धा’ आणि ‘अंधश्रद्धा’

10 - मरतुकडी गाय

11 - मोटारीचे दफन

12 - 90 टक्के मार्क

13 - अन्नाची नासाडी

14 - माणुसकीचा झरा

15 - शहाणपण लोखंडी खिळयांचे

16 - चेक

17 - ‘ईगो’ (Ego) म्हणजे नक्की काय?

18 - करावे तसे भरावे

19 - उंटांचे शहाणपण

20 - प्रेम (Love) आणि मीपणा (Ego)

21- भिकारी

22 - बस ड्रायव्हर

23 - चर्चचे छप्पर

24 - पर्चेस मॅनेजर

25 - Walk don’t run! चाला, पळु नका

26 - चांगला बाप

**या सर्व कथा वाचा किंवा ऐका.**

**वाचता वाचता ऐका**

**ऐकता ऐकता वाचा**

**त्या त्या कथेच्या नावावर क्लिक करताच ती ती कथा ऐकू येईल.**

# शहाणपण हॉट चॉकलेटमधील

खुप वर्षांनी कॉलेजमधल्या जुन्या मित्रांचा ग्रुप 'कॉलेज डे' च्या निमित्ताने जमला होता. ते आता वेल एस्टॅब्लिश्ड होते. निरनिराळया क्षेत्रात त्यांनी नाव कमावले होते. धन, दौलत, प्रतिष्ठा, मान, सन्मान सर्व काही मिळवले होते. त्यातील काहीजण इंजिनीअर होते, डॉक्टर होते, कुठल्या ना कुठल्यातरी कंपन्यांचे सीईओ होते. दोघेजण अभिनेते होते. सुपर स्टार म्हणुन ते ओळखले जात होते. एकाने संगीताच्या क्षेत्रात मोठे नाव कमावले होते. ते कॉलेजमध्ये असताना त्यांच्या आवडीचे एक प्रोफिसर होते. सर्वांनाच त्यांच्याबद्दल आदर वाटत होता. ते आता रिटायर झाले होते पण कॉलेजच्या कॅम्पसमध्येच एका छोट्या बंगल्यात रहात होते. सगळेजण त्यांना भेटायला गेले. प्रोफेसर साहेबांना पण त्यांना भेटुन खुप आनंद झाला.

पुन्हा एकदा सगळयांच्या गप्पा रंगल्या. पण गप्पांचा ओघ हळु हळु  संकटे, स्ट्रेस, झालेले पराभव, तुटलेली नाती यासारख्या दुःखी विषयांकडे वळु लागला.

प्रोफेसरसाहेब किचनमध्ये गेले आणि गरमागरम हॉट चॉकलेटचा भला मोठा मग घेऊन बाहेर आले. हॉट चॉकलेट पिण्यासाठी ते पुष्कळ कप घेऊन आले. हे कप वेगवेगळया आकाराचे, वेगवेगळया प्रकारचे, काही उच्च दर्जाचे, काही सुरेख नक्षीकाम केलेले, काही

साधे काचेचे तर काही चिप क्वालिटीचे - प्लॅस्टीकचे होते. प्रोफेसरांनी सर्वांना आपापल्या आवडीच्या कपातुन हॉट चॉकलेट घ्यायला सांगीतले. सगळयांचे हॉट चॉकलेट घेऊन झाल्यावर त्यांनी विचारले. 'कसे झाले आहे हॉट चॉकलेट? ठीक झाले आहे ना?'

'सुपर्ब! फारच सुरेख!' सगळेजण एक सुरात म्हणाले. खरोखरच हॉट चॉकलेट सुरेखच झाले होते.

'मी बघतो आहे की तुम्ही सगळयांनी महागड्या आणि सुरेख दिसणाऱ्या कपातुन हॉट चॉकलेट घेतलेत. काचेच्या आणि प्लॅस्टिकच्या कपांना कोणी हात सुद्धा लावला नाही.' प्रोफेसर साहेब बोलु लागले. 'ईतकेच नव्हे तर हॉट चॉकलेट घेताना दुसरा कोणत्या कपातुन हॉट चॉकलेट घेतो आहे हे पण तुम्ही चोरुन चोरुन बघत होता. याचा अर्थ तुम्हाला आयुष्यात जे काही सर्वोकृष्ट किंवा सर्वोत्तम असेल तेच हवे असते. हाच तुमचा सर्वात मोठ्ठा प्रॉब्लेम आहे.'

'ज्या कपामधुन तुम्ही हॉट चॉकलेट पीत आहात त्यामुळे हॉट चॉकलेटच्या क्वालिटीमध्ये काहीच फरक पडणार नाही. तुमचे कप ईतरांपेक्षा जास्त महाग आहेत ईतकेच. उलट कधी कधी तर तुम्ही यातुन नक्की काय पीत आहात हे कळणार पण नाही.'

'तुम्हाला खरे काय हवे होते तर हॉट चॉकलेट! पण तुम्ही सर्वांनी जाणीवपुर्वक फक्त कपांनाच महत्व दिलेत. इतकेच नव्हे तर ईतरांचे कप कसे आहेत हे पण चोरुन पहायला सुरवात केलीत.'

'आता मित्रांनो विचार करा की तुमचे आयुष्य हे हॉट चॉकलेट आहे. तर तुमचे शिक्षण, तुमचा जॉब, तुमची संपत्ती, तुमचा मान सन्मान, तुमची प्रातिष्ठा हे सगळे कप्स

आहेत. ज्याप्रमाणे कप्स हे हॉट चॉकलेट होल्ड करण्याचे साधन आहे तसेच ही सर्व तुमचे आयुष्य होल्ड करणारी साधने आहेत.'

'तुमचा कप हॉट चॉकलेटची क्वालिटी ठरवु शकत नाही. त्याचप्रमाणे तुमचे शिक्षण, जॉब, संपत्ती, प्रातिष्ठा, मान सन्मान तुमच्या आयुष्याची क्वालिटी ठरवु शकत नाहीत किंवा बदलु शकत नाहीत. बऱ्याच वेळा आपण कपांना महत्व देण्याच्या नादात देवाने आपल्याला दिलेल्या आयुष्यरुपी हॉट चॉकलेटचा आनंद घ्यायला विसरून जातो'.

'नेहमी लक्षात ठेवा. देव आपल्यासाठी हॉट चॉकलेट बनवत असातो. त्याच्या कपाची निवड तो करत नसातो.'

'जगातील सुखी आणि आनंदी लोकांकडे सर्वोकृष्ट गोष्टी असतातच असे नाही. पण त्यांच्याकडे जे काही आहे त्याचा सर्वोकृष्ट उपयोग करत असतात.

साधे रहा! प्रेमाने वागा! लोकांना मदत करा! बाकीचे देवावर सोडा.

ज्याच्याकडे खुप काही आहे तो श्रीमंत मनुष्य नसतो. ज्याच्या गरजा कमी असतात तो खरा श्रीमंत मनुष्य असतो.

आता हॉट चॉकलेट इन्जॉय करा!'

गुंतवणुक गुरु वॉरन बफे पण हेच सांगतात.

मग आयुष्यात महत्व कशाला द्यायचे? हॉट चॉकलेटला की त्याच्या कपांना?

हे तुम्हीच ठरवायचे.

# EXPLAIN GOD

Little Boy's Explanation of God -- Fabulous!!! –

Out of the mouths of the Babes--

I Certainly don't think an adult could explain this more beautifully!

THIS IS FABULOUS!!!

It was written by an 8-year-old named Danny Dutton, who lives in Chula Vista, CA. He wrote it for his third grade homework assignment, to 'explain God.' I wonder if any of us could have done as well.

(And he had such an assignment, in California, and someone published it, I guess miracles do happen!)

EXPLANATION OF GOD:

'One of God's main jobs is making people. He makes them to replace the ones that die, so there will be enough people to take care of things on earth. He doesn't make grownups, just babies. I think because they are smaller and easier to make. That way he doesn't have to take up his valuable time teaching them to talk and walk. He can just leave that to mothers and fathers.'

'God's second most important job is listening to prayers An awful lot of this goes on, since some people, like preachers and things, pray at times beside bedtime. God doesn't have time to listen to the radio or TV because of this. Because he hears everything, there must be a terrible lot of noise in his ears, unless he has thought of a way to turn it off.'

'God sees everything and hears everything and is everywhere which keeps Him pretty busy. So you shouldn't go wasting his time by going over your mom and dad's head asking for something they said you couldn't have.'

'Atheists are people who don't believe in God. I don't think there are any in Chula Vista. At least there aren't any who come to our church.'

'Jesus is God's Son. He used to do all the hard work, like walking on water and performing miracles and trying to teach the people who didn't want to learn about God. They finally got tired of him preaching to them and they crucified him. But he was good and kind, like his father, and he told his father that they didn't know what they were doing and to forgive them and God said O.K.' And God did not let Jesus stay in the grave, but raised him from the dead

'His dad (God) appreciated everything that he had done and all his hard work on earth so he told him he didn't have to go out on the road anymore. He could stay in heaven. So he did. And now he helps his dad out by listening to prayers and seeing things which are important for God to take care of and which ones he can take care of himself without having to bother God. Like a secretary, only more important.'

'You can pray anytime you want and they are sure to help you because they got it worked out so one of them is on duty all the time.'

'You should always go to church on Sunday because it makes God happy, and if there's anybody you want to make happy, it's God!

Don't skip church to do something you think will be more fun like going to the beach. This is wrong. And besides the sun doesn't come out at the beach until noon anyway.'

'If you don't believe in God, besides being an atheist, you will be very lonely, because your parents can't go everywhere with you, like to camp, but God can. It is good to know He's around you when you're scared, in the dark or when you can't swim and you get thrown into real deep water by big kids.'

'But...you shouldn't just always think of what God can do for you. I figure God put me here and he can take me back anytime he pleases.

And...That's why I believe in God.'

Courtesy-Narain Sagar Wadhwani

This is not related to any particular Religion. This is applicable to all the religions. Only the names of God's Sons or God's Secretaries would change according to the religion. Otherwise the God is the same. His duties are the same. And his expectations also are the same.

## पाय वापरायला शिका

खालील घटना मी कुठे वाचली आठवत नाही. तसेच ती कोणी लिहिली हे पण ठाऊक नाही. पण मला ही घटना भावली आणि आवडली म्हणुन आपल्याबरोबर शेअर करत आहे. ज्याने ही घटना लिहिली त्याच्याच शब्दात ती देत आहे.

शेवटी एकदाचा मला इन्टर्व्हुचा कॉल आला आणि जीव भांड्यात पडला. एम.कॉम झाल्यावर गेले वर्षभर माझे जॉबसाठी प्रयत्न चालु होते पण यश येत नव्हते. कुठे कुठे ऍप्लिकेशन्स पाठवले होते पण त्याचा काही उपयोग होत नव्हता. बाजारात मंदी असल्यामुळे सगळीकडची रिक्रुटमेन्ट जवळ जवळ थांबली आहे. त्यामुळे जॉब मिळणे कठीण आहे असे सतत कानावर येत होते. तसे मला दोन एक ठिकाणी इन्टर्व्हुला बोलावणे आले होते पण ते सगळे फालतुच निघाले होते. आमच्या शहरातील एका मोठ्या आणि प्रतिष्ठीत बँकेची मध्ये 'ऑफिसर्स पाहिजेत' म्हणुन जाहीरात आली होती. त्याला पण अर्ज पाठवून झाला होता. त्याला पण आता सहा महिने होत आले होते. आता मला याच बँकेकडुन इन्टर्व्हुचे बोलावणे आले होते. इन्टर्व्हु आमच्या शहरातील बँकेच्या मुख्य शाखेत होणार होते. वेळ सकाळी 10 ची होती. इन्टर्व्हुसाठी वेळेवर हजर व्हा, जे उशीरा येतील त्यांचा विचार केला जाणार नाही अशी धमकीवजा सूचना पण होती. त्यासाठी वेळेवर पोचणे आवश्यक होते.

ज्या ठिकाणी इन्टर्व्हु होणार होते ते ठिकाण माझ्या घरापासुन कमीत कमी 7 कि. मी. तरी दूर होते. माझ्या घरापासुन तेथे जायला बस होती म्हणुन बरे होते. मी या इन्टर्व्हुचे फारच मनावर घेतले होते. कसुन तयारी केली होती. इन्टर्व्हुच्या दिवशी कधी लवकर न उठणारा मी, लवकर उठुन, घोटुन घोटुन दाढी करून, स्वच्छ आंघोळ करून, कडक इस्त्रीचे कपडे घालुन, टाय लावुन, चकचकीत पॉलिश केलेले बूट पायात घालुन सकाळी साडेआठवाजताच तयार होऊन बसलो होतो. चेहेऱ्यावर छान क्रिम लाऊन पावडर लावली होती, व्यवस्थीत भांग पाडला होता. पर्सनॅलिटी इंप्रेसिव्ह दिसते की नाही याची पुन्हा पुन्हा आरशात बघून खात्री करून घेत होतो. आईच्या पाया पडलो. आईने दिलेला डबा आणि पाण्याची बाटली सॅकमध्ये टाकली. इन्टर्व्हुला उपयोगी पडतील म्हणुन दोन पुस्तके पण सॅकमध्ये कोंबली आणि घरातून बाहेर पडलो. विचार होता की इन्टर्व्हु सुरु व्हायच्या कमीत कमी अर्धा तास तरी आधी पोचावे.

बसस्टॉपवर येऊ उभा राहीलो खरा पण बस काही येत नव्हती. टॅक्सी किंवा रिक्षा पण दिसत नव्हती. नेहमी बससटॉपवर गर्दी असते पण आज कोणीच नव्हते. पंधरा मिनीटे झाली. नऊची वेळ जवळ येत चालली पण बस काही येत नव्हती. धाकधुक वाढत चालली होती. 7 कि.मी. अंतर जायचे होते, ते सुद्धा सकाळच्या ट्रॅफिकमध्ये. कसे जमणार याची काळजी वाटत होती.

जवळ एक पानाची टपरी होती. त्या टपरीतील पानवाला बराच वेळ माझ्याकडे बघत होता. शेवटी त्याला काय वाटले कोणासठाऊक. त्याने मला जवळ बोलावले आणि म्हणाला 'आज बसचा संप आहे साहेब! आज बस, टॅक्सी, रिक्षा सगळे बंद आहे! तुम्ही पेपर वाचत नाही का?'

'बापरे!' माझ्या उरात तर धडकीच भरली. संप असल्याचे मला कसे नाही ठाऊक? इन्टर्व्हुला तर पोचायलाच हवे. लगेच रस्त्यावर उभे राहून आणि अंगठा वर करून लिफ्ट मागायचा प्रयत्न करून पाहीला पण कोणी थांबेल तर शपथ. माझ्या चेहेऱ्यावरची निराशा स्पष्ट दिसु लागली होती.

'काय झाले साहेब?' त्या पानवाल्याने विचारले.

'काय सांगू तुला. आज मला इन्टर्व्हुला जायचे आहे. दहा वाजेपर्यंत पोचायचे आहे. अंतर चांगले सात किलोमिटर्स आहे. आता मी कसा पोचणार?' मी खिन्नपणे त्या पानवाल्याला म्हणालो.

'तुम्हाला देवाने पाय दिले आहेत ना साहेब?' तो पानवाला म्हणाला.

'बर मग?' मी काहिश्या घुश्यातच म्हणालो.

‘त्याचा उपयोग करा साहेब! चक्क चालत जा! कोणाच्या नादी लागु नका. चालतच तुम्ही वेळेवर पोचाल बघा!’ तो पानवाला म्हणाला.

‘काय? चक्क सात किलोमिटर्स चालत जायचे?’ मी किंचाळलोच. एक किलोमिटर सुद्धा धडपणे पायी न चालणारा मी, सात किलोमिटर कसला पायी जातोय डोंबलाचे.

‘विचार करत बसू नका साहेब. चालायला लागा नाहीतर हा इन्टर्व्हु विसरून जा. चॉईस तुमचा आहे.’ तो पानवाला म्हणाला.

मी क्षणभर विचार केला आणि भरभर चालायला सुरवात केली. वेळेवर इन्टर्व्हुला पोचणे हे एकमेव ध्येय समोर ठेवले होते. आधी चालताना बराच त्रास होत होता. अनेक अडथळे येत होते. रस्ते क्रॉस करताना भंबेरी उडत होती. पण मग पुढे सवय झाली. भरभर चालत तर कधी कधी चक्क पळत पळत एकदाचे मी इन्टर्व्हुचे ठिकाण गाठले खरे पण या प्रयत्नात माझी अवस्था पहाण्यासाखी झाली होती. माझा पांढरा शर्ट चक्क घामाने भिजला होता, मळला होता आणि पँटमधून अर्धवट बाहेर डोकावत होता. गळ्याभोवती असलेल्या टायची पार वाट लागली होती. चेहेरा घामाने भिजलेला होता आणि केस विसकटलेले होते. चकचकीत पॉलीश केलेल्या बुटांवर चक्क धुळीचे थरच्या थर साचले होते. कशीबशी माझी जड सॅक खांद्यावर अडकवून मी इन्टर्व्हुच्या हॉलमध्ये प्रवेश केला तेव्हा मला चांगलाच दम लागला होता आणि पाय चक्क ठणकत होते. उभे रहाणे अशक्य होते.

विचार करत होतो की वॉशरुममध्ये जाऊन कपडे ठाकठीक करावेत. बाहेर लोंबणारा शर्ट पँटच्या आत खोचावा. चेहेरा धुवून फ्रेश व्हावे. कंगवा फिरवून केस ठिकठाक करावेत. पण कसचे काय. पहिल्यांदा माझ्याच नावाचा पुकारा झाला. मी सहज हॉलमध्ये नजर टाकली. माझ्यापेक्षा कितीतरी स्मार्ट लोक बसले होते. यात काही मुली पण होत्या. त्यांच्यापुढे मी म्हणजे अगदीच बावळट दिसत होतो. त्यातुनही मला लगेच बोलावणे आले होते. आवरायला पण वेळ नव्हता. आता आपल्याला हा जॉब काही मिळत नाही असे म्हणुन मी काहीश्या अनिच्छेनेच इन्टर्व्हुच्या केबीनमध्ये आलो.

केबीनमधील टेबल्याच्या मागे सुटा बुटातील तीन मध्यमवयीन व्यक्ती बसल्या होत्या. त्यातील मधले हे बँकेचे चेअरमन होते.

‘मी थोड्या वेळाने इन्टर्व्हु द्यायला आलो तर चालेल का?’ मी नम्रपणे विचारले.

‘कां?’ मधल्या माणसाने म्हणजेच चेअरमन साहेबांनी विचारले.

‘सर आज बस, टॅक्सी आणि रिक्षाचा संप आहे हे मला माहीत नव्हते. त्यामुळे मी सात किलोमिटर अंतर पायी चालत आलो आहे. लगेच मला बोलावणे आले. मला

वॉशरुममध्ये जायला पण वेळ मिळाला नाही. त्यामुळे मी आत्तातरी इन्टर्व्हु देण्याच्या परिस्थतीत नाही!' मी प्रामाणीकपणे सांगीतले.

'म्हणजे तुम्ही इन्टर्व्हु देण्यासाठी चक्क सात किलोमिटर्स पायी चालुन आलात?' चेअरमन साहेबांनी विचारले तेव्हा त्यांच्या चेहेऱ्यावरचे आश्चर्याबरोबरच कौतुकाचे भाव मला स्पष्ट दिसत होते.

'का?' तिथे बसलेल्या दुसऱ्या माणसाने विचारले.

'कारण तुमच्या बँकेत काम करण्याची माझी इच्छा आहे. मी तुमच्या बँकेबद्धल बरेच काही चांगले ऐकून आहे. मला येथे खुप काही शिकायला मिळेल असे मला वाटते.' मी उत्तर दिले.

चेअरमन सहेबांनी त्या माणसाकडे बघीतले आणि म्हणाले 'ठीक आहे. तुमची फाईल येथे ठेवुन बाहेर जाऊन बसा. पण आम्ही सांगीतल्याशिवाय घरी जाऊ नका.'

मी माझ्या मळक्या सॅकमधून माझी फाईल बाहेर काढून त्यांच्याकडे दिली आणि 'हुश्श' करत बाहेर आलो. आता काय इन्टर्व्हुचा निकाल लागलाच होता म्हणा. थांबायला का सांगीतले होते कळत नव्हते. मी बसलो होतो तेवढ्यात बँकेचा प्युन माझ्यासाठी ट्रेमधुन

कॉफी आणि पाण्याचा ग्लास पण घेऊन आला. ‘हे काय?’ मी विचारले. ‘चेअरमन साहेबांनी सांगीतले आहे’ तो म्हणाला. कारण इतरांना अशी कॉफी दिलेली निदान मी तरी पाहिली नाही.

इन्टर्व्हुला सुरवात झाली. भरभर एक एक कँडिडेट आत जात होते आणि बाहेर येत होते. सगळे कँडिटेट्स संपल्यावर मला आत बोलावण्यात आले.

‘खरे म्हणजे तुम्ही सकाळी जेव्हा आमच्याशी बोललात त्याच वेळी आम्ही तुमचे सिलेक्शन केले होते. पण फॉर्म्यालिटी म्हणुन आलेल्या इतर कँडिडेट्सचे इन्टर्व्हु घेणे भाग होते. तुम्ही इन्टर्व्हु देण्यासाठी बरेच अंतर चालत आलात ही गोष्ट आम्हाला फार भावली. यावरून तुम्हाला आमच्या बँकेविषयी किती प्रेम आणि आत्मियता आहे हे कळले. तसेच मेहेनत करायला तुम्ही कमी पडणार नाही याची खात्री पटली. अभिनंदन. तुमचे अपॉईंटमेन्ट लेटर तयार होते आहे ते घेऊनच बाहेर पडा. तुमची इच्छा असल्यास तुम्ही उद्यापासुन सुद्धा जॉईन होऊ शकता.’ आता त्या तिघांमधले तिसरे गृहस्थ माझ्याशी बोलत होते. ते एच आर हेड होते. तिघांनीही माझ्याशी शेकहॅन्ड केला. मी बाहेर आलो तेव्हा स्वर्गात असल्यासारखे मला वाटत होते.

माझी अपॉईन्टमेन्ट झाल्याची खबर बाहेर पसरली असावी. कारण रिसेप्शनिस्टने माझे अभीनंदन केले आणि अपॉईंटमेन्ट लेटर असलेले पाकीट माझ्या हातात ठेवले.

अपॉईंटमेन्ट लेटर वाचून तर मी उडालोच. माझ्या अपेक्षेपेक्षा कितीतरी जास्त पगार आणि फॅसिलिटिज मला दिल्या होत्या.

माझा परतीचा सात किलोमिटर्सचा प्रवास अक्षरशः हवेत तरंगतच झाला. पहिल्यांदा मला तो पानवाला दिसला. ही खुशखबर पहिल्यांदा त्याला सांगावी म्हणुन मी त्याच्या टपरीजवळ गेलो.

‘काय झाल साहेब?’ त्याने उत्सुकतेने विचारले.

‘मला नोकरी मिळाली. हे बघ अपॉईंटमेन्ट लेटर. हे केवळ तुझ्यामूळे घडले.’ मी आनंदाने म्हणालो.

‘काहीतरीच साहेब! पण तुमचे अभिनंदन आणि माझ्यातर्फे एक कोल्ड ड्रिंक’ असे म्हणत तो बाहेर ठेवलेल्या फ्रिजमधून कोल्ड ड्रिंकची बाटली काढायला म्हणुन बाहेर आला आणि मी त्याच्याकडे पहातच राहीलो.

त्याला दोन्हीही पाय नव्हते. गुढग्याच्या खाली त्याचे दोन्ही पाय कापलेले होते. तो कुबडीच्या सहाय्याने चालत बाहेर आला होता.

'बघा साहेब! मला पाय नसूनही मी भक्कम पायावर उभा आहे. आणि तुम्ही लोक पाय असूनही पायांचा उपयोग करत नाही. आज जर तुम्ही तुमच्या पायांचा उपयोग केला नसता तर तुम्हाला ही नोकरी मिळाली असती का? लोकांना देवाने पाय दिलेले असुनही लोक त्याचा का वापर करत नाहीत कळत नाही. लोक कशाला बस, टॅक्सी, रिक्षासाठी ताटकळत बसतात? जवळचे अंतर जाण्यासाठी सुद्धा त्यांना स्कूटर किंवा बाईक का लागते समजत नाही.' पानवाल्याची बडबड चालु होती पण माझे डोळे मात्र खाडकन उघडले होते.

खरच आपण प्रत्येकाने आपल्या पायांचा उपयोग करायला सुरवात केली तर?

अर्थात असे करायचे की नाही हे प्रत्येकाने ठरवायचे.

तुम्हाला काय वाटते?

## जसे पेराल तसे उगवेल

एका नावाजलेल्या आणि प्रसिद्ध कंपनीचे सीईओ वृद्ध होत चालले होते. तेच या कंपनीचे संस्थापक होते. मोठ्या कष्टाने आणि मेहेनतीने त्यांनी त्यांची कंपनी नावारुपाला आणली होती. आता लवकरच आपल्याला पायउतारा व्हावे लागणार याची त्यांना जाणीव व्हायला लागली होती. आता कंपनीसाठी नवीन सीईओ शोधुन काढणे आवश्यक आहे हे त्यांना कळले होते. कंपनीच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सनी नवीन सीईओ नेमायचे सर्व अधीकार त्यांना दिले होते.

कंपनीसाठी नवीन सीईओ नेमताना काहीतरी आगळे वेगळे करायचा त्यांचा विचार होता. या पोस्ट साठी कुटुंबातील माणसे, कंपनीचे जुने आणि निष्ठावान कर्मचारी, मित्र किंवा हितचिंतक, प्रोफेशनल्स किंवा इतर उद्योजक यांचा विचार न करता कंपनीतील तरुणांचा विचार करण्याचे त्यांनी ठरवले होते.

त्यांनी कंपनीमधील सर्व तरुण एक्झीक्युटिव्हजची मिटिंग बोलावली. या मिटिंगमध्ये ते म्हणाले, “ मित्रांनो! मी आता वृद्ध होत चाललो आहे. लवकरच मला रिटायर व्हावे लागणार आहे. कंपनीसाठी नवीन सीईओची नेमणुक करणे आवश्यक आहे. नवीन सीईओची निवड करण्याचे सर्व अधीकार बोर्ड ऑफ डायरेक्टर्सने मला दिले आहेत.

कंपनीचा नवीन सीईओ हा तरुण असावा अशी माझी ईच्छा आहे. त्यामुळे कंपनीच्या नवीन सीईओची निवड मी तुमच्यामधुनच करायचे ठरवले आहे. मी तुम्हा सर्वांना एक छोटे पाकीट देणार आहे. यात काही बिया आहेत. तुम्ही सर्वांनी घरी गेल्यावर या बीया कुंडीत लावा. बरोबर एक वर्षांनी तुमची कुंडी घेऊन या. तुमची कुंडी बघुन मी ठरवेन की नवीन सीईओ साठी कोणाची निवड करायची ते.”

तिथे हजर असलेल्या सर्व तरुण एक्झिक्युटिव्हजना बियांची पाकीटे वाटण्यात आली. त्यात जिम नावाचा एक तरुण पण होता. जिम बियांचे पाकीट घेऊन घरी आला आणि आपल्या बायकोला सर्व हकीगत सांगीतली. त्याची बायको पण त्याला मदत करायला तयार झाली. त्यांनी लगेच बाजारात जाऊन एक छानशी कुंडी आणली. माती आणली. त्या पाकीटातील बीया कुंडीत पेरल्या. खत घातले. रोज पाणी द्यायला सुरवात केली. मोठ्या प्रेमाने त्यांनी त्या कुंडीकडे लक्ष द्यायला सुरवात केली.

पंधरा दिवस होऊन गेले पण त्या कुंडीत साधे गवताचे पान पण उगवले नाही. आपले काही चुकले का असे वाटुन जिमने आणि त्याच्या बायकोने अधीक लक्षपुर्वक त्या कुंडीची निगराणी करायला सुरवात केली. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. कुंडीत काहीच उगवले नाही.

आता कंपनीत झाडांच्या कुंड्यांचीच चर्चा सुरु झाली होती. बहुतेक जणांच्या कुंड्यात सुरेख झाडे उगवली होती. जो तो त्यांच्या कुंडीत उगवलेल्या झाडांचे फोटो शेअर

करत होता. जिमच्या कुंडीत मात्र काहीच उगवले नव्हते त्यामुळे जो तो त्याची चेष्टा करत होता. साधे झाड लावता आले नाही म्हणुन कंपनीचे सीईओ हकालपट्टी करतील असे सगळे त्याला सांगत होते. बिचारा जिम हे सगळे मुकाटपणे ऐकुन घेत होता. घरी आल्यावर बायकोला हे सगळे सांगत होता. 'हे बघ! आपण झाड व्यवस्थीत लावले आहे. वेळच्या वेळी खत पाणी घालत आहोत. योग्य काळजी घेत आहोत. आता यात झाड उगवले नाही हा काही आपला दोष नाही' जिमची बायको त्याची समजुत घालत होती.

बघता बघता एक वर्ष होत आले आणि कुंड्या कंपनीत आणण्याचा दिवस जवळ जवळ येत चालला. सर्वांच्याच कुंड्यात सुरेख सुरेख झाडे उगवली होती. फक्त जिमच्या कुंडीतच काही उगवले नव्हते. त्यामुळे तो नर्व्हस होता. झाड न उगवलेली आपली कुंडी कंपनीत नेऊन आपली शोभा करुन घेऊ नये असे त्याला वाटत होते. पण त्याच्या बायकोने सांगीतले, 'असे करु नकोस! जशी असेल तशी कुंडी घेऊन जा! कोणी विचारले तर खरे काय आहे ते सांग! बी ऑनेस्ट!' त्यामुळे जिम एकदाचा त्याची कुंडी घेऊन जायला तयार झाला.

कुंड्या आणण्याचा दिवस आला. कंपनीचा हॉल कुंड्यांनी भरुन गेला. सर्वच कुंड्यांमध्ये सुरेख आणि आकर्षक झाडे होती. कंपनीचे सीईओ कुणाचे झाड सर्वात सुंदर आहे यावरून कंपनीच्या नवीन सीईओची निवड करणार अशी सगळयांची खात्री होती. त्यामुळे आपले झाड सर्वात सुंदर आणि आकर्षक दिसावे यासाठी त्यांच्यात चढाओढ लागली होती. जिमची कुंडी या सर्वांमध्ये अत्यंत विसंगत होती. त्यामुळे जिमची भरपूर चेष्टा होत होती. 'आता दुसरी नोकरी बघायला लागा!' अनेकांनी जिमला अनाहुत सल्ला द्यायला सुरवात

केली. जिम बिचारा त्यामुळे एका कोपऱ्यात तोंड लपवून उभा होता. आता आपली हकालपट्टी होणार अशी जिमला खात्री वाटु लागली होती. जिमचा चेहेरा चांगलाच उतरला होता. त्याचे तोंड चिमणीएवढे झाले होते. त्याने त्याची कुंडी पण एका कोपऱ्यात, कोणाला फारशी दिसणार नाही, अशी ठेवली होती.

कंपनीचे सीईओ आले आणि त्यांनी कुंड्यांची पहाणी करायला सुरवात केली. ते जिमने जिथे कुंडी ठेवली होती तेथे आले आणि त्यांचे लक्ष जिमच्या रिकाम्या कुंडीकडे गेले. 'ही कुंडी कोणाची आहे?' त्यांनी विचारले. जिम घाबरत घाबरत पुढे आला. 'काय झाले? तुझ्या कुंडीत झाड का नाही आले?' जिमने सगळी हकीगत प्रामाणीकपणाने सांगीतली. सीईओ लगेच स्टेजवर गेले आणि त्यांनी अनाऊन्समेन्ट केली, ' आपल्या कंपनीसाठी नवीन सीईओ सापडला आहे. त्याचे नाव जिम. कॉग्रॅच्युलेशन जिम. तु आमच्या कंपनीचा नवीन सीईओ आहेस!'

सीईओंची ही अनाउन्समेन्ट ऐकुन सगळे जण चाटच पडले. जिमचा सुद्धा त्याच्या कानावर विश्वास बसत नव्हता. 'पण! सर! माझ्या कुंडीत तर एक सुध्दा झाड उगवले नाही?' जिम घाबरत म्हणाला. 'तुझे बरोबर आहे जिम!' सीईओ म्हणाले., 'मी तुम्हा सर्वांना उकडलेल्या बीया दिल्या होत्या. अशा बियांमधुन झाडे उगवत नाहीत. पण तुम्हा सर्वांच्या लक्षात हे आल्यावर तुम्ही बीया बदलल्यात. मला खुश किंवा इम्प्रेस करण्यासाठी तुम्ही तुमच्या कुंड्यात सुरेख सुरेख झाडे उगवलीत. फक्त जिमनेच असे काही केले नाही.

मला आपल्या कंपनीसाठी प्रामाणीक आणि खोटेपणा करून मला इम्प्रेस न करणारा सीईओ हवा होता. तो मला जिमच्या रुपाने मिळाला.’

थोडक्यात या गोष्टीचे तात्पर्य

जसे पेराल तसे उगवेल

जर तुम्ही प्रामाणीकपणाचे बिज पेरलेत तर विश्वासाचे झाड उगवेल

चांगल्या गोष्टींचे झाड लावलेत तर चांगल्या मित्रांचा वृक्ष बहरेल

दयेचे बिज पेरलेत तर दयाळुपणाचे झाड उगवेल

कष्टाचे, मेहेनतीचे बिज पेरलेत तर यशाचे झाड उगवेल

दयाळूपणाचे बिज पेरलेत तर आत्म संतुष्टाचा वृक्ष बहरेल

अप्रामाणिकपणा, खोटेपणा, बनवाबनवीचे झाड लावलेत तर गुन्हेगारीचा वृक्ष तयार होईल

कुचकटपणाचे बिज लावलेत तर तुमच्या वृक्ष पण कुजकट, रोगट, कमकुवत उपजेल

भांडखोरपणाचे बिज पेरलेत तर पुढे वाळवंटातील वृक्षासारखे एकटे पडायची पाळी येईल

भेदाचे, फोडाफोडीचे बिज पेरलेत तर तुमच्या आयुष्याचा वृक्ष कधिही एकसंध रहाणार नाही

त्यामुळे तुम्ही कशाचे बिज लावता आहात हे काळजीपुर्वक तपासुन बघा

कारण जसे पेराल तसे उगवेल

(श्री. दिनेश कुमठेकर यांच्या सौजन्याने)

‘व्यापारी मित्र’ हे मासीक पुण्यातुन गेली कित्येक वर्ष प्रसिद्ध होत आहे. व्यापारी वर्तुळात हे मासीक चांगलेच लोकप्रीय आहे. आख्या महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर सुद्धा याचे असंख्य वाचक आहेत. व्यापाऱ्यांना उपयोगी पडणारे तसेच विविध सामाजीक विषयांवरचे अनेक लेख यात प्रसिद्ध होत असतात. या मासीकाच्या 2014 च्या दिवाळी अंकात माझा वरील लेख प्रसिद्ध झाला असुन मला अनेकांचे याबद्दल चांगले अभिप्राय मिळाले आहेत.

# माणुसकीची किंमत

अमेरिकेतल्या एका आडबाजुच्या शहरातील आडबाजुला असलेल्या एका सामान्य हॉटेलात रात्रीच्यावेळी एक वृद्ध जोडपे शिरले. बाहेर मुसळधार पाऊस चालु होता. थंड वादळी वारे वहात होते. प्रचंड थंडी पडली होती. अशा या थंडीत हे वृद्ध जोडपे हॉटेलात शिरले तेव्हा थंडीने त्यांचे अंग थरथरत होते. कपडे पण थोडेसे पावसात भिजलेले होते. तसे त्यांचे कपडे सामान्यच होते. त्यावेळी हॉटेलच्या काऊंटरच्या मागे अगदी सामान्य असा दिसणारा एक निग्रो तरुण बसला होता.

‘आम्हाला आजची रात्र रहाण्यासाठी या हॉटेलात रुम मिळेल का?’ त्या म्हाताऱ्या आजिबाईंनी थंडीत कुडकुडत त्या निग्रो तरुणाला विचारले.

‘सॉरी मॅम! आज हॉटेल मध्ये सगळया रुम्स फुल आहेत. एकही रुम शिल्लक नाही.’ त्या निग्रो तरुणाने सांगीतले पण सांगताना त्याचा चेहेरा असा झाला होता की हॉटेलात एकही रुम शिल्लक नाही हा जणुकाही त्याचा अपराध असावा.

‘बघाना काही जमते का? हवे तर दुप्पट पैसे घ्या. बिल नाही दिलेत तरी चालेल.’ म्हातारबुवा म्हणाले. थोडक्यात त्या रुमचे पैसे त्या निग्रो तरुणाने खुशाल खीशात घालावेत असे ते म्हातारबुवा सुचवत होते. पण तो निग्रो तरुण त्यामुळे काही बधेल असे वाटे ना.

‘हे बघा मी तुम्हाला माझी रुम देऊ शकतो. माझी रुम तशी छोटी आहे पण त्यात तुमची सोय होईल. मला जर 10 मिनिटे वेळ दिलात तर मी माझी रुम जरा आवरून येतो. तोपर्यंत मी तुम्हाला गरमागरम चहा आणुन देतो. त्यामुळे तुम्हाला थोडे बरे वाटेल’. असे म्हणुन तो निग्रो तरुण किचनमध्ये चहा करायला गेला आणि थोड्याच वेळात वाफाळलेल्या चहाचे दोन कप आणि कुकिज घेऊन आला आणि आपली खोली साफ करायला निघुन गेला.

थोड्या वेळात तो निग्रो तरुण परत आला तेव्हा ते म्हातारबुवा आपल्या गाडीच्या डिकितुन एक जाडजुड बॅग काढत असतातना दिसले. ‘थांबा मी तुम्हाला मदत करतो’ असे म्हणुन तो निग्रो तरुण पुढे आला आणि तो बॅग काढुन हॉटेलमध्ये घेऊन आला.

‘चला मी तुम्हाला तुमची रुम दाखवतो’ तो म्हणाला आणि त्या वृद्ध जोडप्याला आपल्या रुमपाशी घेऊन आला.

‘ही घ्या किल्ली! काही लागले तर मला हाक मारा!’ तो निग्रो तरुण म्हणाला.

‘तु कोठे झोपणार?’ त्या आजिबाईंनी विचारले.

‘तुम्ही काळजी करू नका! मी बाहेर हॉलमध्ये झोपेन. माझ्याकडे स्लिपिंग बॅग आहे! गुड नाईट!’ तो निग्रो तरुण म्हणाला.

आजीबाईंनी खोलीचे दार उघडले. खोली तशी लहानशीच होती पण व्यवस्थित आवरून ठेवलेली होती. खोलीचे बाथरुम पण स्वच्छ करून ठेवले होते. खोलीचा हिटर चालु करून ठेवला होता. तसेच पलंगावर दोन इस्त्री केलेले नाईट गाऊन्स ठेवलेले होते. प्यायचे पाणी पण भरुन ठेवले होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी ते वृद्ध जोडपे फ्रेश होऊन बाहेर पडले. आता त्यांना निघायचे होते.

‘किती पैसे झाले?’ त्या आजोबांनी वरचारले

‘पैशांचे आपण नंतर बघु. आधी चांगला ब्रेकफास्ट करा! मी तुमच्यासाठी ब्रेकफास्ट घेऊन येतो.’ असे सांगुन तो निग्रो तरुण पॅन्ट्रिमध्ये गायब झाला आणि थोड्याच वेळात ऑम्लेट, टोस्ट आणि गरम कॉफी घेऊन आला.

‘किती पैसे द्यायचे?’ त्या म्हातारबुवांनी ब्रेक फास्ट झाल्यावर विचारले.

‘त्याचे असे आहे. मी तुम्हाला माझी खोली वापरायला दिली. ती काही हॉटेलची खोली नव्हती. त्यामुळे त्याचे पैसे काही नाहीत.’ तो निग्रो तरुण म्हणाला.

‘असे कसे? बर मग चहाचे आणि ब्रेकफास्टचे किती पैसे द्यायचे’ त्या आजीबाईंनी विचारले.

‘मॅडम! मला आई वडील नाहीत. माझे आई वडील माझ्या लहानपणीच गेले. तुम्हाला पाहीले आणि मला माझे आई वडील आठवले. आज जर माझे आई वडील या हॉटेलमध्ये आले असते तर मी त्यांच्याकडुन चहाचे आणि नाष्त्याचे पैसे घेतले असते का? नाही ना! मग मला तुमच्याकडुन पैसे नकोत’ तो निग्रो तरुण म्हणाला.

तो निग्रो तरुण काऊंटरजवळ गेला आणि आपल्या खिशातुन काही पैसे काढुन हॉटेलच्या गल्यात टाकु लागला. म्हातारबुवा कुतुहलाने ते बघत होते. त्यांच्या लक्षात आले की त्यांनी जो चहा घेतला होता आणि ब्रेकफास्ट केला होता त्याचे पैसे तो निग्रो तरुण स्वतःच्या खिशातुन हॉटेलच्या गल्यात टाकत होता.

ते वृद्ध जोडपे जायला निघाले. त्या निग्रो तरुणाने त्यांची जड बॅग त्यांच्या गाडीच्या डिकित आणुन ठेवली. तेवढ्यात त्याची नजर गाडीतील रिकाम्या पाण्याच्या बाटल्यांकडे गेली. ‘थांबा मी तुम्हाला पाणी आणुन देतो.’ असे म्हणुन त्याने त्या दोन्ही वाटल्या स्वच्छ करून पिण्याच्या पाण्याने भरुन आणून दिल्या. ते वृद्ध जोडपे एकमेकांकडे बघत होते.

‘हे पहा आम्हाला या ठिकाणी जायचे आहे. आम्ही या गावात नवीन आहोत. आम्हाला कसे जायचे हे सांगायला थोडी मदत करणार का?’ आजोबांनी विचारले.

‘थोडे थांबा’ असे म्हणुन तो निग्रो तरुण आत गेला आणि गावाचा नकाशा घेऊनच बाहेर आला. त्याने तो नकाशा आजोबांना देताना म्हणाला ‘आत्ता तुम्ही या ठिकाणी आहात. तुम्हाला येथे जायचे आहे. हा बघा हा रस्ता तुम्हाला सरळ तेथे घेऊन जाईल.’ म्हातारबुवांनी बघीतले. त्या निग्रो तरुणाने नकाशावर पेन्सिलने व्यवस्थित खुणा केल्या होत्या.

त्या आजिबाई त्या निग्रो तरुणाचे आभार मागताना म्हणाल्या. ‘तुझे नाव काय? तुझे बिझनेस कार्ड असेल तर मला दे.’

‘सॉरी मॅम! माझ्याकडे बिझनेस कार्ड नाही कारण मी सध्या टेम्परारी नोकरीवर आहे. पण हॉटेलच्या बिझनेस कार्डवर माझे नाव लिहुन देतो. परत या बाजुला आलात तर

आमच्या हॉटेलवर जरुर या!' असे म्हणत त्या निग्रो तरुणाने आपल्या खिशातुन हॉटेलचे बिझनेस कार्ड काढले, त्यावर पेनने आपले नाव लिहीले आणि ते कार्ड आजीबाईंना दिले.

पंधरा दिवस असेच गेले आणि त्या निग्रो तरुणाच्या नावाने एक भला मोठा लिफाफा पोस्टाने आला. तशी त्याला पत्रे वगैरे फारशी येत नसत. हा लिफाफा कोणाचा म्हणुन त्याने उघडुन बघीतला. ओ कॅफे हॉटेलचे लेटर हेड बघुन तो चमकला. ओ कॅफे ही त्याकाळची अमेरिकेतील अत्यंत नावाजलेली अशी हॉटेल्सची साखळी होती. अमेरिकेतील बहुतेक मोठ्या आणि महत्वाच्या शहरांमध्ये ही हॉटेल्स होती. बहुतेक हॉटेल्स पंचतारांकीत होती. ओ कॅफे हॉटेल्समध्ये काम करायला मिळावे अशी अनेकांची ईच्छा असायची.

ओ कॅफे हॉटेलकडुन कसले पत्र आले आहे हे बघावे म्हणुन तो पत्र वाचु लागला आणि उडालाच. त्याला चक्क इन्टर्व्हुचा कॉल आला होता. त्याच्या शहराजवळच ओ कॅफेचे एक नवीन पंचतारांकीत हॉटेल सुरु झाले होते. तिथे त्याला इन्टर्व्हुला बोलावले होते. पण आपण अर्ज केलेला नसताना आपल्याला इन्टर्व्हुचा कॉल कसा आला याचे त्याला आश्चर्यच वाटत होते.

तो इन्टर्व्हुच्या दिवशी त्यातल्या त्यात चांगला पोशाख करुन आणि आपली फाईल घेऊन इन्टर्व्हुला हजर झाला. या हॉटेलमध्ये आपल्याला वेटरची नोकरी मिळाली तरी पुष्कळ झाले असे त्याला वाटले. त्याने रिसेप्शन काऊंटरवर आपले इन्टर्व्हुचे लेटर दिले. त्याला सांगण्यात आले की हॉटेलचे चेअरमनसाहेब स्वतः त्याचा इन्टर्व्हु घेणार आहेत.

त्याला आश्चर्यच वाटले. थोड्याच वेळात त्याला हॉटेलच्या सातव्या मजल्यावर असलेल्या चेअरमन साहेबांच्या ऑफीसमध्ये नेण्यात आले. त्यांचे ऑफीस चांगले भव्य होते. थोड्याच वेळात त्याला आत बोलावण्यात आले. तो चेअरमन साहेबांच्या भव्य केबिममध्ये शिरला. त्याने समोर नजर टाकली आणि तो उडालाच.

चेअरमन साहेबांच्या डेस्कच्या मागे तेच वृद्ध जोडपे बसले होते जे त्याच्या हॉटेलमध्ये आले होते.

‘मी जॉन ओ किफे. या माझ्या पत्नि लिलियन ओ किफे. ओ किफे चेन हॉटेल्स आमच्या मालकीची आहेत.’ ते आजोबा म्हणाले.

‘त्या दिवशी रात्री तु आम्हाला जी माणुसकीची वागणुक दिलीस त्यामुळे आम्ही भारावुन गेलो आहोत. हल्ली अशी माणुसकी बघायला सुद्धा मिळत नाही.’ आजीबाई म्हणाल्या

‘मला तुझ्यासारखी माणुसकीची जाण असणारी माणसेच माझ्या हॉटेलसाठी हवी आहेत. मी या हॉटेलच्या जनरल मॅनेजर पदासाठी तुझा विचार करतो आहे. तु आमच्या हॉटेलमध्ये जनरल मॅनेजर म्हणुन जॉईन होशील का?’ ओ किफे साहेब म्हणाले.

‘जनरल मॅनेजर?’ तो निग्रो तरुण चांगलाच उडाला होता, ‘सर! पण मी या पदासाठी लायक आहे का? कारण माझे शिक्षण--- ‘

‘आम्ही तुझी सर्व माहिती काढली आहे.’ ओ किफे साहेब मध्येच त्याला थांबवत म्हणाले, ‘घरच्या परिस्थितीमुळे तुला काही फारचे शिक्षण घेता आले नाही हे आम्हाला कळले. तसेच तुझ्या काळया रंगामुळे पण तुला कुठे चान्स मिळत नाही हे पण आम्हाला समजते. पण माणुसकी काही शिकवुन मिळत नाही. ती उपजतच असावी लागते. आम्ही शरीराचा कलर, जाती, धर्म असा भेद करत नाही. आम्ही माणसातील गुणवत्तेला महत्व देतो. त्या दिवशी रात्री आम्ही तुझी परिक्षा घेत होतो त्यात तु उत्तम मार्कांनी पास झालास. जेव्हा तु आमच्या चहाचे आणि ब्रेकफास्टचे पैसे तुझ्या खिशातुन हॉटेलच्या गल्यात टाकलेस तेव्हाच आमच्या लक्षात आले की तु नुसताच प्रामाणीक माणुस नाहीस तर ऊत्तम कॅरॅक्टर असलेला माणुस आहेस. आमच्या या हॉटलचा जनरल मॅनेजर म्हणुन तुझे स्वागत असो!’ ओ किफे साहेब म्हणाले आणि त्यांनी त्या निग्रो तरुणाशी शेकहॅन्ड केला.

कधी कधी माणुसकीची आणि कॅरॅक्टरची अशी पण किंमत मिळते.

(एका सत्य घटनेवर आधारीत)

## कार्पोरेट कल्चर (Corporate Culture)

एक छोटी मुंगी होती. ती एका कारखान्यात काम करायची. ती रोज सकाळी लवकर उठायची. वेळेवर कामावर जायची. मेहेनतीने, मन लाऊन, प्रामाणीकपणाने काम करायची. आनंदाने घरी जायची. तिची प्रॉडक्टिव्हिटी उच्च पातळिची आणि दर्जाची होती.

तिच्या कंपनीचा चीफ एक वाघोबा होता. त्याने पाहीले की कोणत्याही 'सुपरव्हिजन' शिवाय ही मुंगी एवढे चांगले काम करते. तिला जर एक चांगला सुपरव्हायझर दिला तर ती आणखी चांगले काम करेल.

त्याने एका झुरळाची सुपरव्हायझर म्हणुन नेमणुक केली. या झुरळाला सुपरव्हायझर म्हणुन काम करण्याचा बऱ्याच वर्षांचा अनुभव होता आणि तो 'एक्सलंट रिपोर्ट' लिहिण्यामध्ये एक्सपर्ट होता. त्याचा पहिला निर्णय घड्याळाची सिस्टीम (Clocking System) बसवणे हा होता. त्याला रिपोर्ट्स लिहिण्यासाठी आणि टाईप करण्यासाठी एका सेक्रेटरीची गरज होती. त्याने यासाठी एका कोळ्याची नीवड केली. त्याचे मुख्य काम झुरळाने निर्माण केलेला कागदांचा ढीग संभाळणे आणि टेलिफोन कॉल्स घेणे हे होते.

झुरळाच्या रिपोर्टसवर वाघोबा खुश होता. त्याने झुरळाला प्रॉडक्शन रेट्स आणि त्यात होणारे बदल यावर निरनिराळे ग्राफ्स काढायला सांगीतले. कारण वाघोबाला पुढच्या बोर्ड मिटिंगमध्ये प्रेझेन्टेशन देण्यासाठी या ग्राफ्सचा उपयोग होणार होता. त्यामुळे

झुरळाला एक कॉम्प्युटर आणि लेझर प्रिंटर विकत घ्यावा लागला. त्याचे आय.टी. डिपार्टमेन्ट मॅनेज करण्यासाठी त्याने एका माशीची नेमणुक केली.

मुंगीच्या लक्षात हे नवीन बदल काही केल्या येत नव्हते. तिचा जास्तीत जास्त वेळ रिपोर्टरुपी कागद निर्माण करण्यामध्ये व फालतु मिटिंगमध्ये वाया जाऊ लागला. तिला मनातुन या सगळयाचा तिटकारा येत होता. खरे काम राहीले बाजुलाच आणि फालतुगिरीच जास्त असे व्हायला लागले होते.

वाघोबाला वाटले की मुंगी ज्या डिपार्टमेन्टमध्ये काम करते त्या डिपार्टमेन्टसाठी ‘हेड’ नेमायची गरज आहे. त्याने एका मुंगळयाची या जागी नेमणुक केली. मुंगळयाने पहिले काम काय केले असेल तर आपल्या केबीनसाठी उत्तम कार्पेट आणि बसायला एक उत्तम, आरामदायी खुर्ची खरेदी केली. त्याला पण कॉम्प्युटरची व असिस्टंटची गरज होती. म्हणुन त्याने आपल्या पहिल्या डिपार्टमेन्टमधील असिस्टंटला आणले. त्याच्यावर त्याने ‘वर्क कन्ट्रोल आणि बजेट कन्ट्रोल स्टॅट्रेजिक ऑप्टीमायझेशन प्लॅन’ (म्हणजे काय कुणास ठाऊक) बनवण्याची जबाबदारी सोपवली.

आता ज्या डिपार्टमेन्टमध्ये मुंगी काम करते ते एक दुःखी डिपार्टमेन्ट झाले आहे. आता तेथे कोणी हसत नाही. चेष्टा मस्करी करत नाही. पुर्वीचे खेळीमेळीचे वातावरण लोप पावले आहे. सगळेजण उदास दिसु लागले आहेत.

मुंगळयाने त्याच्या बॉसला म्हणजे वाघोबाला कन्व्हिन्स केले आहे की मुंगिच्या डिपार्टमेन्टमधील एकुणच वातावरणाचा गंभीरपणे अभ्यास करण्यात यावा. वाघोबाच्या पण हे लक्षात आले की नवीन चेंजेस नंतर मुंगीच्या डिपार्टमेन्टमधील प्रॉडक्शन खुपच खाली आले आहे.

त्याने एका घुबडाची निवड केली. हा घुबड एक अत्यंत नावाजलेला कन्सल्टन्ट होता. कारखान्यातील कामाचे ऑडिट करून त्याला सोल्युशन्स सुचवणे हे त्याचे प्रोफेशन होते. घुबडाने तीन महीने रिसर्च केला. भली मोठी फी उकळली. अनेक खंड असलेला, हजारो कागद असलेला एक भला मोठ्ठा रिपोर्ट तयार करून वाघोबाला सादर केला. त्या रिपोर्टचा मतितार्थ एका ओळीत सांगण्यासारखा होता. 'मुंगीचे डिपार्टमेन्ट ओव्हरस्टाफ आहे. स्टाफ कमी करणे आवश्यक आहे.'

वाघोबाने सर्वात पहिल्यांदा कोणाला फायर केले ठाऊक आहे?

मुंगीला! कारण तिच्यात मोटिव्हेशन कमी आहे आणि निगेटिव्ह ऍटिट्युडस आहेत म्हणुन.

एका मेहेनतीने, मनापासुन, प्रामाणिकपणे काम करणाऱ्या मुंगीच्या करिअरचे मात्र वाटोळे झाले.

'कल्चर' म्हणे 'संस्कृती' हा फार फसवा शब्द आहे. प्रत्येक कंपनीला एक कॉर्पोरेट कल्चर असते त्याचप्रमाणे प्रत्येक कुटुंबाला पण एक 'कल्चर' असते. पण पुष्कळवेळा ही कल्चर्स नुकसानकारकच असतात.

आपल्या कंपनीचे आणि कुटुंबाचे कल्चर असे नाही ना याची खात्री करून घ्या.

## माणसाच्या बाह्य रुपावरून

## त्याची किंमत किंवा पारख करू नका!

अमेरिकेतील जगप्रसिद्ध हॉर्वर्ड विद्यापिठाच्या प्रेसिडेन्टना भेटण्यासाठी म्हणुन एक वृद्ध जोडपे अपॉईमटमेन्ट न घेता भेटायला आले. त्या जोडप्याचा वेश नुसताच साधा नव्हता तर गबाळा पण होता. म्हातारबाईंनी घातलेला फ्रॉक अगदी साधा, चुरगळलेला आणि थोडासा मळलेला होता. तर म्हातारबुवांनी घातलेला सूट पण घरी शिवलेला, ढगाळ, गबाळा आणि इस्त्री न केलेला होता. प्रेसिडेन्टच्या केबिनबाहेर पॉश काऊंटरवर बसलेल्या सेक्रेटरीकडे ते जोडपे आले.

'आम्हाला प्रेसिडेन्ट साहेबांची फक्त दहा मिनिटेच भेट हवी आहे! मिळेल का?' त्या आजीबाईंनी नम्रपणे विचारले.

त्या जोडप्याचा तो गबाळा अवतार बघून ती सेक्रेटरी थोडीशी नाराज झाली. तिला वाटले हे एक गरीब जोडपे आहे. एकतर भीक मागायला, म्हणजे डोनेशन मागायला आले असेल किंवा मुलाच्या फींमध्ये सवलत मागायला आले असेल. अशा लोकांना कसे टोलवायचे हे तिला चांगलेच ठाऊक होते.

‘प्रेसिडेन्ट साहेब सध्या कामात आहेत! ते लगेच भेटू शकणार नाहीत!’ तिने उर्मटपणे सांगीतले. तिला वाटले तिच्या या उत्तराने ही ब्याद एकदाची टळेल.

‘ठीक आहे! आम्ही वाट बघू! पण त्यांना भेटूनच परत जाऊ!’ त्या आजी नम्रपणे म्हणाल्या आणि ते जोडपे तेथे ठेवलेल्या सोफ्यावर जाऊन बसले.

प्रेसिडेन्ट साहेब खरच बिझी असावेत. दोन चार वेळा ते केबिनच्या बाहेर आले. त्यांनी ऊंची सूट घातला होता, पायात चकचकीत बूट होते, चेहेऱ्यावर अधिकाराचा रुबाब होता. त्यांनी त्या म्हाताऱ्या जोडप्याकडे पाहिले न पाहिल्यासारखे केले पण त्यांची काही दखल घेतली नाही. बघता बघता दिवस संपायला आला. संध्याकाळ व्हायची वेळ आली. तरी सुद्धा ते वृद्ध जोडपे बसूनच होते. शेवटी त्या सेक्रेटरीलाच दया आली असावी.

‘ते वृद्ध जोडपे सकाळपासुन तुम्हाला भेटायची वाट बघते आहे. तुम्ही त्यांना पाच मिनीटे तरी भेटावेत’ सेक्रेटरीने प्रेसिडेन्टला सांगीतले. प्रेसिडेन्टला घरी जयची घाई होती तरी पण केवळ पाच मिनिटेच भेटायला ते एकदाचे तयार झाले!

‘काय काम आहे?’ प्रेसिडेन्ट साहेब केबिनच्या बाहेर आले आणि त्या वृद्ध जोडप्याला विचारू लागले. चेहेऱ्यावर बऱ्यापैकी नाराजी हेतीच.

‘हे पहा! आमचा एकुलता एक मुलगा काही वर्षांपूर्वी या विद्यापिठाचा स्टुडन्ट होता. आता दुर्दैवाने तो नाही. विद्यापिठाच्या आवारात त्याचे एखादे स्मारक असावे असे आम्हाला वाटते. म्हणुन आम्ही तुम्हाला भेटायला आलो!’ ती वृद्ध महिला नम्रपणे म्हणाली

‘स्मारक? कसले स्मारक? म्हणजे तुम्हाला ईथे त्याचा पुतळा वगैरे उभारायचा आहे काय? ते शक्य नाही.  आम्ही जर मृत पावलेल्या प्रत्येक माजी विद्यार्थ्याचा पुतळा येथे उभारू लागलो तर आमच्या युनिव्हर्सिटिचे स्मशान व्हायला वेळ लागणार नाही!’ प्रेसिडेन्ट साहेब काहिश्या वैतागानेच म्हणाले.

‘नाही नाही! तसे नाही!’ त्या आजीबाई परत बोलू लागल्या, ‘आम्हाला येथे त्याचा पुतळा वगैरे उभारायचा नाही. त्याचे स्मारक म्हणुन तुमच्या विद्यापीठाला एखादी चांगली ईमारत वगैरे बांधुन देण्याचा विचार आहे!’

त्या आजीबाईंच्या चुरगळलेल्या, मळक्या कपड्यांकडे बघून प्रेसिडेन्ट साहेबांना हसूच आले. ‘ईमारत? ईमारत बांधायला किती पैसे लागतात ठाऊक आहे का? तुम्हाला म्हणुन सांगतो. या विद्यापिठाच्या कॅम्पसमधील ईमारती बांधायला आम्हाला 75 लाख डॉलर्स लागले!’ प्रेसिडेन्ट साहेब सांगत असतातना या जोडप्याच्या खिशात 75 डॉलर्स तरी असतील की नाही याची त्यांना खात्री वाटत नसावी असा त्यांचा चेहेरा होता.

‘युनिव्हर्सिटी काढायला एवढेच पैसे लागतात?’ त्या आजीबाई हळूच त्या म्हातारबुवांच्या कानात कुजबुजल्या. प्रेसिडेन्ट साहेबांचे आभार मानून मिस्टर आणि मिसेस लेलॅन्ड स्टॅनफोर्ड नावाचे हे वृद्ध जोडपे तेथून बाहेर पाडले. पुढे ते कॅलिफोर्निया राज्यातील पालो आल्टो या गावी आले आणि स्वतःच्या मुलाच्या नावाने युनिव्हर्सिटी चालु केली. हीच आहे जगप्रसिद्ध स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटी!

आज स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटी ही जगातील नंबर एकची युनिव्हर्सिटी म्हणुन ओळखली जाते. 8180 एकर जमीनीवर या युनिव्हर्सिटीचा पसारा पसरला आहे. या युविव्हर्सिटीचे वार्षिक बजेट भारत सरकारच्या वार्षिक बजेटच्या तिपटीहून जास्त असते. जगात सगळयात जास्त 'नोबेल लॉरिएट्स' (नोबेल पारितोषिक विजेते) या युनिव्हर्सिटीसाठी काम करतात. आज या युनिव्हिसिटीत 32 नोबेल लॉरियटस प्रोफेसर म्हणुन काम करत आहेत. या युनिव्हर्सिटिने आजपर्यंत 30 अब्जाधीश, 17 अंतराळवीर (ऍस्ट्रॉनॉटस), 60 नोबेल पारितोषीक विजेते आणि 7 फिल्ड मेडॅलिस्ट ( युद्धात अतुलनीय कामगीरी केल्याबद्दल देण्यात येणारे शौर्य पदक) जगाला दिले आहेत. अमेरेकेतील 'सिलिकॉन व्हॅली' या नांवाने ओळखली जाणारी जगातील सर्वात मोठी औद्योगीक वसाहत उभारण्यामध्ये या युनिव्हर्सिटीचा सिंहाचा वाटा आहे. ( आज या विभागात वर्षाला जितका रेव्हेन्यु निर्माण होतो तेवढा जगात कुठेच निर्माण होत नाही असे म्हटले जाते. या रेव्हेन्युचा विचार करता आज सिलिकॉन व्हॅली ही जगातील 10 व्या क्रमांकाची सर्वात मोठी इकॉनॉमी ठरते) कोण्या एकेकाळी असलेल्या अस्सल ग्रामीण भागाचे रुपांतर या युनिव्हर्सिटीने जगातील सर्वात बलाढ्य अशा औद्योगीक वसाहतीत केले आहे. हे सगळे वैभव हॉर्वर्ड विद्यापिठाला मिळाले असते जर त्या विद्यापीठाच्या प्रेसिडेन्ट साहेबांनी त्या गरीब दिसणाऱ्या म्हाताऱ्या जोडप्याची योग्य ती दखल घेतली असती आणि योग्य तो मान राखला असात तर.

अनेक जणांना माणसाची पारख ही त्याच्या कपड्यांवरून किंवा बाह्य रुपावरून करायची सवय असते. पण अनेकदा ही सवय घातक ठरते. पॉश किंवा फॅशनेबल कपडे घालणारा माणूस हा खऱ्या अर्थाने श्रीमंत किंवा चांगल्या कॅरॅक्टरचा असतोच असे नाही.

तसेच सामान्य कपडे घालणारा, सामान्यपणे रहाणारा माणुस हा गरीब, दळिद्री किंवा ‘लो कॅरॅक्टर’चा असतो असेही नाही. अनेक वेळा आपण माणसाच्या कपड्यांवरून किंवा बाह्य रुपावरून चुकीची पारख करतो आणि एखादा चांगला मित्र, हितचींतक किंवा गिऱ्हाईक हातचे घालवून बसतो.

माणसाच्या कपड्यांवरून किंवा बाह्य रुपावरून त्याची पारख करायची घातक सवय, असल्यास, ती सोडून द्या!

अर्थात असे करायचे की नाही हे तुमचे तुम्ही ठरवा!

(व्हॉट्अपच्या सौजन्याने)

## टॉयलेट (Toilet) संस्कृती

अमेरिकेत पहिल्यांदा येणारे भारतीय सर्वात जास्त प्रभावी कशामुळे होतात तर येथील 'टॉयलेट' संस्कृतिमुळे असे मला आढळून आले आहे. येथील सार्वजनीक टॉयलेट्स सुद्धा कमालिच्या स्वच्छ असतात. सार्वजनीक टॉयलेट्स ईतक्या स्वच्छ कश्या राहु शकतात हा प्रश्न मला येथे पहिल्यांदा आलेल्या प्रत्येक भारतियाच्या चेहेऱ्यावर दीसतो.

कुठल्याही देशाने व त्या देशातील समाजाने किती प्रगती केली आहे. त्यांची स्वच्छतेची विशेषतः सार्वजनीक स्वच्छतेची जाण, तळमळ किती आहे. त्यांच्या स्वच्छतेच्या सवयी कशा आहेत. त्या लोकांची आरोग्याची जाण व जागृती किती प्रामाणात आहे हे त्यांच्या 'टॉयलेट' संस्कृतीवरुन दिसुन येते.

आपल्याकडे टॉयलेटला संडास, पैखाना, मुतारी अशी हलक्या दर्जाची नांवे देऊन त्याचे डिग्रेडेशन केले जाते. कधी कधी स्वच्छता गृह असा त्यातला त्यात प्रतिष्ठीत शब्द वापरला जातो. प्रत्यक्षात ही स्वच्छता गृहे ही खरोखरच स्वच्छता गृहे असतात की अस्वच्छता गृहे असतात असा पश्न पडतो. अमेरिकेमध्ये टॉयलेटला ' रेस्ट रुम ' असे नांव देऊन त्यांचे अपग्रेडेशन करण्यात आले आहे. ' रेस्ट रुम ' म्हणजे विश्रांतिची खोली. येथील

रेस्ट रुम्स बधीतल्यावर खरोखरच तेथे अर्धा तास तरी वेळ काढावाच असा मोह सहज होऊ शकतो.

येथल्या रेस्ट रुम्स आपल्यासारख्या टीचभर, कोपऱ्यातल्या, अंधाऱ्या, पाणी न येणाऱ्या, घाण वास मारणाऱ्या नसतात. येथील रेस्टरुम्स चांगल्या प्रशस्त असतात. आतमध्ये भरपुर उजेड असतो. येथील वॉश बेसिन्स, कमोड्स आरश्यासारखी लखलखीत असतात. आरसे कमालिचे स्वच्छ असतात. वॉश बेसीनच्या नळांमध्ये चोवीस तास गरम व थंड पाणी येण्याची सोय असते. येथे ओले झालेले हात, पाय, चेहेरा पुसण्यासाठी कागदी टॉवेल किंवा पेपर नॅपकीन वापरण्याची पद्धत आहे. त्यामुळे खिशात रुमाल बाळगण्याची आवश्यकता पडत नाही. अशा पेपर नॅपकीनचा भरपुर साठा रेस्ट रुम्स मध्ये ठेवलेला असतो. पण याची कोणी नासाडी करताना दीसत नाही. पेपर नॅपकीन टाकण्यासाठी कोपऱ्यात डस्ट बीन्स ठेवलेल्या असतात. लोक त्यातच वापरेले पेपर नॅपकीन टाकत असतात. त्यामुळे कोठे कचरा पडलेला दीसत नाही. प्रत्येक रेस्ट रुमला एक्सॉस्ट फॅन्स असतात. ते सतत चालु असल्यामुळे घाण वास आजिबात येत नाही. या रेस्ट रुम्स मध्ये माशा, डास, चीलटे, पाली व ईतर कृमी कीटक औषधाला पण सापडत नाहीत. तसेच तर दोन तीन तासांनी रेस्ट रुम साफ करायला माणसे येत असतात. बहुतेक ठिकाणी सुगंधी फवारे पण मारले जातात. मग अशा या रेस्ट रुम मध्ये थोडा जास्त वेळ घालवण्याचा मोह जर कुणाला झाला तर त्यात त्याचे काय चुकले? बाहेरुन पण या रेस्ट रुम्स कमालिच्या स्वच्छ असतात. कित्येक रेस्ट रुम मध्ये व्हील चेअरवर बसलेल्या अपंग व्यक्तिंना व्हील चेअरसकट आत जाता येईल अशी सोय असते. तसेच बऱ्याच ठिकाणी फॅमिली रेस्ट रुमची सोय असते. या ठिकाणी लहान बाळाचे कपडे बदलण्याची सोय असते. तसेच आपल्याकडे सार्वजनीक स्वच्छता गृहात अश्लील लिखाण, अश्लील मजकुर, अश्लील चित्रे किंवा त्याच

प्रकारचे कोरीव काम दीसते तसे येथे कुठेच आढळुन येत नाही. प्रत्येक सार्वजनीक ठिकाणी, जसे की उद्याने, पार्कस, गार्डन्स, मॉल्स, बस स्टेशन्स, रेल्वे स्टेशन्स, म्युझियम्स, एअर पोर्ट, टुरीस्ट स्पॉट्स या ठिकाणी अशा रेस्टरुम्स भरपुर प्रमाणात उपलब्ध असतात. या ज्याप्रमाणे पुरुषांसाठी असतात तशाच महिलांसाठी पण असतात. त्यामुळे स्त्रियांची कोठे पंचाईत होत नाही. आपल्याकडे जशा कोपऱ्या कोपऱ्यावर मुताऱ्या दीसतात तशा त्या येथे दीसत नाहीत. कारण येथील प्रत्येक स्टोअर, हॉटेल, रेस्टॉरंट मध्ये रेस्ट रुम ही असतेच. ती जवळ जवळ सार्वजनीकच असते. ती कोणिही वापरु शकते. तसेच प्रत्येक पेट्रोल पंपावर बाथरुम ही असतेच. त्याचा ही वापर कुणिही करु शकते. रस्याने प्रावासाला जाताना दर 30 मैलांवर थांबे असतात. येथे पेट्रोल पंपाबरोबर रेस्ट रुमची पण सोय असते. तसेच ज्या ठिकाणी सार्वजनीक रेस्ट रुमची सोय नसेल पण मोठ्या प्रमाणावर लोक येणार असतील तर त्या ठिकाणी प्लॅस्टीकपासुन बनविलेल्या सींगल रेस्ट रुम बसविण्याची सोय असते. या पोर्टेबल रेस्ट रुम्स गाडिच्या ट्रेलरमध्ये घालुन सहज कुठेही नेता येतात. यामुळे येथे बाहेर, रस्त्यावर प्रातर्विधी करणारे लोक जवळ जवळ दीसतच नाहीत. तसेच सार्वजनीक रेस्ट रुम्स कशा वापरायच्या याचे ट्रेनींग लहान पणापासुनच देण्याची इथे पद्धत आहे.

इथे प्रत्येक घरात तर रेस्ट रुम असतेच. काही घरात तर दोन किंवा तीन रेस्ट रुम्स असतात. तसेच येथे हाफ रेस्टरुम असा पण प्रकार आहे. या साधारणपणे जिन्याखाली व टिचक्या जागेत काढलेल्या असतात. यांत एक कमोड व वॉश बेसीन एव्हडेच असते. पण याला सुद्धा एक्सॉस्ट फॅन असतो व त्या पण कमालिच्या स्वच्छ असतात. मला कित्येक घरामधील रेस्ट रुम्स सुरेखपणे सजवलेल्या पण दीसल्या. या रेस्ट रुम्स मध्ये सुरेख कार्पेट अंथरलेल्या असतात. कमोड्च्या झाकणाला आकर्षक कव्हर्स घातलेली असतात. बाथ

टबला आकर्षक पडदे असतात. रेस्ट रुम मध्ये सुध्दा फुलांच्या करंड्या, झाडांच्या कुंड्या ठेवलेल्या असतात. काही रेस्ट रुम्स मध्ये तर मी वर्तमानपत्रांचे स्टँड, पुस्तकांचे रॅक्स सुद्धा बघीतले आहेत. कारण येथील आंघोळ करण्याची पद्धत आपल्यापेक्षा वेगळी आहे. बाथ टब मध्ये गरम पाणी गोळा करायचे व त्यात यथेच्छ डुंबायचे ही येथील पद्धत आहे. मग डुंबताना वर्तमान पत्र वाचणे, पुस्तक वाचणे, लॅपटॉपवर काम करणे असे प्रकार पण करता येतात. थोडक्यात येथील रेस्ट रुम्स ही प्रत्येक घराची शान असते.

भारताला स्वातंत्र्य मिळुन 72 वर्षे झाली. पण असुनही भारतामध्ये खऱ्या अर्थाने टॉयलेट संस्कृती आलेली नाही. मुंबई, पुण्यासारख्या मोठ्या शहरांमध्ये सार्वजनीक स्वच्छता गृहांचे प्रचंड दुर्भीक्ष आहे. ती सुद्धा जी काही आहेत ती पुरुषांसाठी आहेत. स्त्रियांसाठिच्या सार्वजनीक स्वच्छता गृहांची प्रचंड चणचण आहे. जी आहेत त्यातील बहुतेक ईतकी गलिच्छ असतात की तेथे गेलो तर काही रोग राई होईल की काय याची भिती वाटते. कित्येक घरातील संडास पण कमालिचे गलिच्छ असतात. खेडेगावात तर या संस्कृतिची वानवाच आहे. तेथे अजुनही बहुतेक जनता उघड्यावर 'प्रोग्रॅम' करत असते. मी उत्तर प्रदेशमध्ये असताना सकाळी व संध्याकाळी लोकांच्या झुंडिच्या झुंडी रस्त्याच्या कडेला प्रातर्विधिसाठी बसलेल्या पाहिल्या आहेत.

पानीपतच्या युद्धात मराठ्यांचा जो पराभव झाला त्याला त्यांची 'टॉयलेट संस्कृती' पण मोठ्या प्रमाणावर जबाबदार होती असे इतिहास संशोधकांना आढळुन आले आहे. कारण माराठ्यांच्या सैन्यात बाजार बुणग्यांची संख्या सैन्यापेक्षाही जास्त होती. दीवसभर

चरायचे व प्रातर्विधिला जाऊन बासायचे याशिवाय त्यांना दुसरा उद्योग नसायचा. त्यांनी केलेल्या घाणिचा वास मैलोंमैल पसरायचा. या घाणिच्या वासावरुन शत्रु सैन्याला मराठी सैन्याचा ठाव ठिकाणा शोधुन काढणे सहज शक्य व्हायचे.

महात्मा गांधी नेहमी म्हणायचे की जोपर्यंत भारतातील खेड्या- पाड्यंचा विकास होणार नाही तो पर्यंत खऱ्या अर्थाने भारताचा विकास होणार नाही. त्याचपमाणे म्हणावेसे वाटते की जो पर्यंत चांगल्या 'टॉयलेट संस्कृतिचा' प्रचार व प्रसार भारतात होत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने भारताचा विकास होणार नाही. आणि ही टॉयलेट संस्कृती आणणे हे आपले काम आहे, आपली जबाबदारी आहे, सरकारची नाही हे प्रत्येकाने लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

## ‘श्रद्धा’ आणि ‘अंधश्रद्धा’

एका गावात एक गुरुजी रहात होते. ते प्रचंड देवभक्त होते. त्यांच्या घराजवळ एक विष्णुचे मंदीर होते. ते रोज त्या मंदीरात जाऊन देवाची भक्तिभावाने पूजा अर्चा करत असत. नित्य नियमाने उपास तापास करत असत. सर्व धार्मीक विधी अगदी श्रद्धेने पार पाडत असत. सतत कुठल्या ना कुठल्यातरी धर्मग्रंथाचे वाचन आणि नमन चालु असे. तोंडात सतत देवाचे नाव असे. गुरुजींची गावाजवळ थोडिशी शेती भाती होती. ती कसायला दिली होती. (त्या वेळी कुळकायदा नव्हता) त्या शेतीच्या उत्पन्नावर त्यांचे छानसे भागत होते. देवळाजवळ त्यांचे दुमजली घर होते. गावात फारच थोड्या लोकांची दुमजली घरे होती. शेतातून हवे तेवढे धान्य येत असल्यामुळे गुरुजींना देवपुजेशिवाय दुसरा कुठलाच उद्योग नव्हता. ते एकतर देवळात तरी पडलेले असत नाहीतर त्यांच्या माडीवरच्या झोपाळयावर पडलेले दिसत. ‘देव माझा पाठीराखा आहे. मला कुणाची भिती नाही. कुठलेही संकट आले तर देव मला तारून नेईल’ असे ते सतत सांगत असत. हे बुवा देवभक्त असल्यामुळे गावात त्यांना थोडा मान पण होता. देवळात येणारे काही भक्त त्यांच्या पण पाया पडत असत. देवावर त्यांची जेवढी श्रद्धा होती तेवढी गावातील दुसऱ्या कोणाची नव्हती.

एकदा गावात मोठा पूर आला. नदीचे पाणी गावात शिरले. गुरुजींचे घर तसे नदीपासुन दूर आणि थोडेसे उंचावर होते. तरी सुद्धा दोन चार माणसे त्यांच्या घराकडे

धावत आली, गावात पूर आला आहे लवकर बाहेर पडा असे सांगु लागली. गुरुजींनी त्यांना शांतपणे सांगीतले, 'मला तुमच्या मदतीची गरज नाही. देव माझा पाठीराखा आहे. तो मला या संकटातून सोडवील.' माणसे निघून गेली.

पुराचे पाणी आणखी वाढले, गुरुजींच्या घराजवळ येऊन पोचले. आता तर घरातून बाहेर पडणे मुश्कील झाले. त्यावेळी होडी घेऊन दोन माणसे घराजवळ आली, गुरुजींना नावेत चढण्याविषयी सांगु लागली. गुरुजी त्यांना शांतपणे म्हणाले, 'माझा देव माझा पाठीराखा आहे. तो मला या संकटातून वाचवेल. मला तुमची गरज नाही.' होडीवाली माणसे निघून गेली.

पुराचे पाणी आणखी वाढले. गुरुजींचे घर पाण्यात बुडु लागले. बघता बघता खालचा मजला बुडाला. गुरुजी वरच्या मजल्यावर गेले. तेथे पण पाणी येऊ लागले. गुरुजी मग घराच्या छपरावर चढले. त्यांना एक हेलिकॉप्टर लांबुन येताना दिसले. हेलिकॉप्टरमधल्या लोकांनी त्यांना पाहीले. त्यांनी लगेच हेलिकॉप्टर गुरुजींच्या घराजवळ आणले, वरून दोरीची शिडी फेकली, गुरुजींना ताबडतोब हेलिकॉप्टरमध्ये चढण्यासाठी सांगु लागले पण गुरुजी मात्र ढिम्म होते. 'मला माझा देव वाचवील. मला तुमची गरज नाही ते म्हणाले. हेलिकॉप्टरवाले निघून गेले.

पुराचे पाणी अजुन वाढले. गुरुजींचे घर पाण्यात गडप झाले. जे होऊ नये ते झाले. गुरुजी पाण्यात बुडुन मरण पावले. त्यांचा कोठलाही देव त्यांना वाचवायला आला नाही.

गुरुजी स्वर्गात गेले आणि देवापुढे उभे राहीले ते अत्यंत संतप्त अवस्थेत. ज्या देवाचे त्यांनी आयुष्यभर 'एवढे' केले त्या देवाने त्यांना ऐनवेळी दगा दिला, मदतीला धावला नाही, याचा संताप त्यांच्या नसानसात भरून राहीला होता.

'हे देवा तु मला फसवलेस!' ते तावातावाने म्हणाले, 'मी आयुष्यभर मोठ्या श्रद्धेने आणि निष्ठेने तुझी भक्ती केली, तुझी पूजा अर्चा केली, तुझ्यासाठी उपास तापास केले, निरनिराळी व्रत वैकल्य केली याची परत फेड तु अशी केलीस? तुझ्यावर मी श्रद्धा ठेवली, तु माझा पाठीराखा आहे, तु मला संकटातून सोडवशील असे मी आयुष्यभर लोकांना सांगत आलो त्याचे हे फळ तु मला दिलेस?'

भगवान हसले आणि म्हणाले 'हे तुझ्या श्रद्धेचे नव्हे तर तुझ्या अंधश्रद्धेचे फळ आहे!'

'म्हणजे मला नाही समजले?' गुरुजी म्हणाले.

'तु संकटात सापडलास हे कळल्यावर मी तुला तीन वेळा वाचवण्याचा प्रयत्न केला.' भगवान म्हणाले.

'तीन वेळा! ते कसे काय?' गुरुजींनी विचारले.

'पहिल्यांदा मी तुला सावध करण्यासाठी माणसे पाठवली. तु त्यांना हाकुन लावलेस. नंतर तुला वाचवण्यासाठी होडी पाठवली. त्यांना पण तु वाटेला लावलेस. नंतर चक्क हेलिकॉप्टर पाठवले. त्यांना पण तु वाटाण्याच्या अक्षदा लावल्यास. तुला काय वाटले पौराणीक चित्रपटात दाखवतात त्याप्रमाणे तुझा देव हवेतून गरुडासारखे वाहन घेऊन प्रगट होईल आणि तुला अलगद वर उचलून घेऊन जाईल?' भगवान म्हणाले.

'हे बघ देव म्हणजे कोणी जादुगार नाही.' भगवान बोलु लागले. 'माझी मदत ही नेहमीच उपलब्ध असलेल्या साधनांच्या माध्यमातुनच असते. पण तुम्ही त्याच्याकडे लक्ष देत नाही. दुसरी गोष्ट माझे सगळयांकडेच लक्ष असते. कोणाला काय द्यायचे, काय द्यायचे नाही, केव्हा द्यायचे, केव्हा द्यायचे नाही सर्व मला ठाऊक असते. पण भक्ती, धर्म, पुजा, धार्मिक विधी, देवळांना देणग्या या रुपाने तुम्ही लोक मला विकत घ्यायचा प्रयत्न करीत असता. मी काही विकाऊ वस्तु नाही. तुम्ही भले भक्ती करा किंवा करु नका मला काही फरक पडत नाही. मनुष्याला मी स्वतंत्र बुद्धी दिली आहे ती काही माझी भक्ती करण्यासाठी नाही. प्राणी, पक्षी, वनस्पती, जलचर जीव माझी कधीच भक्ती करत नसतात की देवळात जात नसतात. तरी सुद्धा मी त्यांचे रक्षण करतच असतो. मला प्रयत्न करणारी प्रयत्नशील माणसे आवडतात. ही माणसे जरी माझी भक्त नसली तरी मी नेहमी त्यांचेच भले करत असतो. देव, दैव, नशीब या गोष्टी तुम्ही लोकांनी प्रयत्ववादातून पळवाट काढण्यासाठी शोधून काढल्या आहेत. तु तरी तुझा जीव वाचवण्याचा कुठे प्रयत्न केलास? ढिम्म बसुनच तर होतात. तुझ्यासारखी माणसे तर मला मुळीच आवडत नाहीत. ज्यांना 'श्रद्धा' आणि 'अंधश्रद्धा' यातील फरक सुद्धा कळत नाही त्यांना मी काय डोंबलाची मदत करणार?'

गुरुजी बिचारे पुतळयासारखे स्तब्ध होऊन ऐकत होते.

आता 'श्रद्धा' ठेवायची का 'अंधश्रद्धेचे' बळी व्हायचे हे तुम्हीच ठरवायचे.

# मरतुकडी गाय

नुकतीच एक चिनी लोककथा माझ्या वाचण्यात आली.

चिनमधले एक विद्वान गुरू आपल्या काही शिष्यांसकट प्रवासाला निघाले. त्यांना एक ओसाड प्रदेश लागला. त्या प्रदेशात पाण्याचे दुर्भीक्ष होते तर गवताचे एक पान पण दिसत नव्हते. त्या प्रदेशातील एका टेकडीवर त्यांना एक जिर्ण झालेली, मोडकळीला आलेली झोपडी दिसली. या अशा ओसाड प्रदेशात कोण रहात असावे या कुतुहलाने ते त्या झोपडीजवळ गेले. तेथे त्यांना एक मध्यमवयीन चिनी जोडपे, त्यांची तीन लहान मुले व एक मरतुकडी गाय दिसली. ‘तुमचे कसे भागते?’ गुरुंनी त्या चिनी माणसाला विचारले. त्याने त्या मरतुकड्या गाईकडे बोट दाखवले व म्हणाला, ‘ही गाय रोज आम्हाला थोडे थोडे दुध देते. यातील काही दुध आम्ही वापरतो. उरलेल्या दुधाचे दही करून त्याचे लोणी तयार करून जवळच्या गावात जाऊन विकतो. त्याचे जे काही थोडेफार पैसे मिळतात त्यातुन इतर गरजेच्या वस्तु आणतो. आमचे कसेतरी भागते.’

गुरुजी टेकडी उतरून खाली आले व आपल्या शिष्यांना म्हणाले, ‘ताबडतोब ती मरतुकडी गाय मारून टाका!’ गुरुंची ही आज्ञा ऐकून शिष्य चांगलेच गोंधळले. ज्या गाईवर त्या माणसाचे जिवन चालु आहे, त्या कुटुंबाला रोजी रोटी मिळते आहे ती गाय मारून

टाकायची? शिष्यांना वाटले आपले गुरु किती निर्दय व निष्ठूर आहेत. कोणी शिष्य गाय मारायला तयार होईना. शेवटी हे काम गुरुंनी स्वतःच करायचे ठरवले. 'बोला माझ्याबरोबर कोण येणार आहे?' त्यांनी शिष्यांना विचारले. कसाबसा एक शिष्य तयार झाला. त्या रात्री गुरु त्या शिष्याला टेकडीवर घेऊन गेले, त्या मरतुकड्या गाईला टेकडीवरून खाली ढकलले व गाय मेल्याची खात्री करून घेऊन परत आले व आपल्या शिष्यांबरोबर पुढच्या प्रवासाला लागले.

त्यांच्या बरोबर जो शिष्य गेला होता त्याला फार 'गिल्टी फिलिंग' येऊ लागले. गुरुंनी जे केले ते पाप होते व त्या पापामध्ये आपण पण भागीदार होतो असे वाटून त्याच्या मनात शरमेची भावना निर्माण झाली. काही वर्षे त्याने ही भावना दाबून ठेवली पण एक दिवस या भावनेचा उद्रेक झाला. त्या कुटुंबाचे काय झाले हे पहाण्याची इच्छा त्याच्या मनात निर्माण झाली. गुरुला न कळवताच तो त्या झोपडीच्या ठिकाणी आला.

तेथे आल्यावर त्या शिष्याला आश्चर्याचा धक्काच बसला. त्या क्षेत्राचा संपूर्णपणे कायापालट झाला होता. झोपडीच्या जागी एक आधुनीक, टोलेजंग बंगला उभा होता. बंगल्याच्या बाहेर अनेक आधुनीक मोटारी उभ्या होत्या. बंगल्याभोवती सुरेख बगीचा केला होता. सगळीकडे हिरवळ होती व काही शेते पण दिसत होती. शिष्याला वाटले आपण चुकीच्या ठिकाणी आलो. त्यांने तिथल्या एका माणसाला विचारले, 'माफ करा! मी कांही वर्षांपूर्वी येथे आलो होतो तेव्हा हा भाग ओसाड होता. वरती टेकडीवर एक झोपडी होती. आता त्या झोपडीतील माणसे कुठे असतात?'

‘तुमचे म्हणणे बरोबर आहे!’ त्या माणसाने उत्तर दिले. ‘त्या झोपडीतील माणसे इथेच म्हणजे त्या बंगल्यात रहातात. हा त्यांचा बंगला आहे. आज त्यांच्याकडे फंक्शन आहे.’

आश्चर्य वाटून तो शिष्य टेकडी चढून बंगल्यापाशी आला. त्याने पाहीले की तोच चिनी माणूस व त्याची बायको एका भव्य सोफ्यावर बसले आहेत व त्याची तीन तरूण मुले उत्साहाने सगळ्यांचे स्वागत करत आहेत. तो शिष्य त्या बंगल्यात गेला व त्या चिनी माणसाला म्हणाला, ‘काही वर्षांपूर्वी मी माझ्या गुरुंबरोबर येथे आलो होतो. त्यावेळी तुम्ही एका मोडक्या, जिर्ण झालेल्या झोपडीत तुमच्या तीन मुलांबरोबर रहात होतात. तुमच्याकडे एक हडकूळी गाय पण होती.’

‘अगदी बरोबर आहे.’ तो चिनी माणूस उत्तरला ‘एका रात्री आमची गाय टेकडीवरून खाली पडली व मेली. आमचा तर आधारच हरपला. जगायचे कसे हा प्रश्न उभा राहीला. कारण तोपर्यंत आम्हाला गायीच्या दुधावरच जगायची सवय होती. जगण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक होते. हळू हळू आमच्या असे लक्षात येऊ लागले की आमच्याकडे अनेक कौशल्ये आहेत जी आम्हाला ठाऊक नव्हती. आम्ही त्या कौशल्यांचा विकास करायला सुरवात केली, उद्योग व्यवसायात पदार्पण केले. हे तीन तरूण ही माझी मुले आहेत. तुम्ही याचे परिणाम बघताच आहात. जर आमची गाय मेली नसती तर हे घडले नसते!’

आता त्या शिष्याला कळले की गुरु गाय मारायला का सांगत होते. त्याला आपल्या गुरुंच्या दूरदृष्टीचे कौतुक वाटले व गुरुविषयींचा आदर कित्येक पटीने वाढला.

अनेक मराठी माणसांच्या आयुष्यात अशीच एक गाय असते ज्याला ‘नोकरी’ असे म्हणतात. मराठी माणसांची नजर या अशा गायीवरच असते. या गाइचे जे दुध मिळते (म्हणजे पगार मिळतो) त्यावर भागवण्याची सवय लागते. कोणाच्या नशीबात धष्टपुष्ट गाय येते तर कांहीना किरकोळ गाय मिळते तर काहींच्या नशीबात अशी गायच नसते.

मराठी माणसाचे सगळे कर्तृत्व त्याच्या नोकरीवर व नोकरीच्या प्रगतीवर ठरत असते. ज्याला उत्तम नोकरी मिळते तो जास्त कर्तृत्ववान, ज्याला बरी नोकरी मिळते तो कमी कर्तृत्ववान व ज्याला नेकरीच मिळत नाही त्याला ‘कंडेम’ समजण्यात येते. मराठी माणसाची प्रगती ही त्याच्या नोकरीच्या प्रगतीवर ठरत असते. ‘माझा नवरा क्लार्कचा मॅनेजर झाला’ हे एखाद्या गृहीणीचे वाक्य मोठ्या कौतुकाने सांगीतले जाते व ऐकले जाते. जणू काही नवरा क्लार्कचा मॅनेजर झाला म्हणजे त्याने फार मोठा पराक्रम केला असा थाट या वाक्याभोवती असतो. पण किती झाले तरी ‘नोकरी’ ही एक मरतुकडी गायच असते, कारण ही गाय पुरेसे दुध कधीच देत नसते.

अशीच अजुन एक गाय असते ज्याला ‘जर्सी’ गाय म्हणतात. ही गाय भरपूर दुध देत असते पण ही गाय नेकरीवाल्यांच्या नशीबी नसते तर फक्त ‘उद्योग, धंदा, व्यवसाय’ करणाऱ्या माणसांच्या नशीबी असते. पण मराठी समाजात या गाईला कोणी फारसे महत्व

देत नसते. 'माझ्या नवऱ्याचा धंदा एका लाखाचा एक कोटी रुपये झाला.' हे एखाद्या गृहीणीचे वाक्य फारशा कौतुकाने बोलले पण जात नाही व ऐकले पण जात नाही. 'माझे वडील बँकेत मॅनेजर आहेत.' हे वाक्य ज्या अभीमानाने मुलाकडून सांगीतले जाते त्याच अभीमानाने 'माझ्या वडिलांचे स्टेशनरीचे दुकान आहे' हे वाक्य सांगीतले जात नाही. लग्न करणाऱ्या मराठी मुलींना तर फक्त नोकरी करणारीच मुले हवी असतात. मामलेदार कचेरीत शिपायाची किंवा पट्टेवाल्याची नोकरी करणाऱ्या मुलाला हुंड्यासकट मुलगी मिळते. पण वर्षाला 50 लाख रुपये इन्कम असलेल्या पण धंदा करणाऱ्या मराठी मुलाला लग्नासाठी मुलगी मिळणे कठीण जाते.

नुकचीच पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांनी 'स्टार्ट अप' साठी अनेक योजना जाहीर करून उद्योग व्यवसायाच्या संधीचे भले मोठे दार उघडून दिले आहे. याचा अर्थ अनेकांना 'जर्सी गाई' मिळवण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. पण मराठी माणूस याचा किती फायदा करून घेणार आहे हा कळीचा मुद्दा आहे.

'नोकरी' च्या मरतुकड्या गाईवर जगायचे का उद्योग व्यवसायाच्या क्षेत्रात शिरून भरपूर दुध देणारी जर्सी गाय मिळवायची का दोन्ही गायी संभाळायच्या हे ज्याचे त्याने ठरवायचे नाही कां?

तुम्हाला काय वाटते?

## मोटारीचे दफन

एका देशात एक उद्योगपती होता. तो प्रचंड श्रीमंत होता. त्याच्याकडे अमर्याद संपत्ती होती. त्याला मोटारींचे वेड होते. त्याला मोटारींची मॉडेल्स जमवण्याचा छंद होता. त्याच्याकडे एक जुनी 'व्हिन्टेज' बिटल गाडी होती. जगातील हाताच्या बोटावर मोजता येणाऱ्या लोकांकडेच ही गाडी होती. या गाडीची किंमत 10 लाख स्टर्लिंग पौंड (म्हणजे जवळ जवळ 101 कोटी रुपये) होती. ही त्याची अत्यंत आवडती गाडी होती. तो बऱ्याच वेळा त्याच्या या 'व्हिन्टेज' गाडीतून रुबाबात बाहेर फिरायला जात असे.

हा उद्योगपती जसा त्याच्या श्रीमंतीबद्दल प्रसीद्ध होता त्याचप्रमाणे त्याच्या विचित्र व 'व्हिमजिकल' (Whimsical) वागण्याबद्दल पण प्रसिद्ध होता. तो केव्हा काय बोलेल व काय करेल सांगता यायचे नाही.

एकदा त्याने वर्तमानपत्रात भली मोठी जाहीरात दिली. 'मी माझ्या आवडत्या आणि 10 लाख पौंड किंमत असलेल्या व्हिन्टेज बिटल गाडीचे दफन करण्याचे ठरवले आहे. ज्याप्रमाणे एखाद्या मृत व्यक्तिचे दफन करण्यात येते त्याप्रमाणे भव्य प्रेतयात्रा काढून व सर्व धार्मिक संस्कारांसह या गाडीचे इतमामाने दफन करण्यात येईल. आजपासुन 15 दिवसांनी

हा दफनविधी आयोजीत करण्यात आला आहे. तरी जास्तीत जास्त लोकांनी या दफन विधीसाठी हजर रहावे ही नम्र विनंती आहे.’

त्याची ही जाहीरात बघून लोकांमध्ये खळबळ उडाली. 10 लाख पौंड किंमतीची गाडी हा माणूस जमिनीत पुरून टाकणार म्हणजे काय? अनेकांनी त्याला वेडा, मूर्ख व विचित्र ठरवले. तर अनेकांनी त्याच्यावर ‘त्याने ती गाडी लिलाव करून विकून टाकावी. जे पैसे येतील ते गरीबांसाठी वापरावेत किंवा धार्मिक कामासाठी चर्चेसना दान त्यावेत’ अशा प्रकारच्या सूचनांचा भडीमार केला. पण तो कशालाही बधला नाही.

ठरल्याप्रमाणे त्याच्या गाडीची भव्य प्रेतयात्रा निघाली. माणसाच्या प्रेतयात्रेसाठी ज्याप्रमाणे ‘कफीन’ म्हणजे शवपेटी बनवण्यात येते त्याप्रमाणे या गाडीसाठी सुद्धा भव्य शवपेटी बनवण्यात आली. या शवपेटीत ठेवलेली गाडी दिसावी म्हणुन काचा लावण्यात आल्या होत्या. फुलांनी सजवलेल्या एका भव्य ट्रकवर ही शवपेटी क्रेनच्या सहाय्याने चढवण्यात आली. प्रेतयात्रेपुढे बँड होता व अनेक जण, कुतुहल म्हणुन, या प्रेतयात्रेत सामील झाले होते. शहरातील प्रमुख रस्त्यांवरून ही प्रेतयात्रा स्मशानात आली. गाडीचे दफन करण्यासाठी 20 फूट लांब, 20 फूट रुंद व 20 फूट खोल खड्डा तयार करण्यात आला होता. गाडीचे अत्यंसंस्कार धार्मीक पद्धतीने करण्यासाठी चर्चचे दोन ‘फादर्स’ बायबल घेऊन तयार होते. शवपेटी उतरवण्यासाठी क्रेनची व्यवस्था करण्यात आली होती. जवळच श्रद्धांजली वहाण्यासाठी एक छोटे स्टेज बनवण्यात आले होते. त्यावर माइक व स्पिकरची व्यवस्था करण्यात आली होती.

ती भव्य प्रेतयात्रा स्मशानात पोचली. क्रेनच्या सहाय्याने ती भव्य शवपेटी त्या खड्ड्याजवळ उतरवण्यात आली. चर्चमधल्या 'फादर्स'नी अंतीम संस्कार केले व 'आमेन' म्हणुन त्या गाडीला शेवटचा निरोप दिला. आता ती गाडी खड्ड्यात उतरवण्याची वेळ आली तेव्हा त्या उद्योजकाने थांबायला सांगीतले. तो स्टेजवर आला, माइक हातात घेतला व बोलू लागला,

' मित्रांनो! तुम्ही माझ्या अत्यंत आवडत्या व्हिन्टेज बिटल गाडीच्या प्रेतयात्रेमध्ये ईतक्या मोठ्या संख्येने सामील झालात या बद्दल मी तुमचा अत्यंत आभारी आहे. मी जेव्हा या गाडीच्या प्रेतयात्रेची जाहीरात वर्तमान पत्रात दिली तेव्हा तुमच्यापैकी अनेकांना धक्काच बसला याची मला जाणीव आहे. ही 10 लाख पौंड किंमतीची गाडी मी जमिनीत पुरुन टाकणार याबद्दल अनेकांनी मला वेडा, मूर्ख किंवा व्हिमसिकल ठरवले याची पण मला जाणीव आहे. अनेकांनी मी ही गाडी लिलाव करून विकून टाकावी, आलेले पैसे गरिंबांसाठी वापरावेत किंवा चर्चेसना धर्मदाय दान करावेत असे पण सुचवले. तुम्हाला माझ्या या 10 लाख पौंड किंमतीच्या गाडिची चिंता आहे पण आपण रोज कोट्यावधी पौंड किंमतीची संपत्ती जमिनीत पुरत असतो त्याची चिंता नाही. तुम्ही विचाराल ही कोणती संपत्ती? तर ती संपत्ती आहे आपल्या शरीरातील अवयव. माणूस जरी मृत झाला तरी त्याच्या शरीरातील काही महत्वाचे अवयव मृत होत नाहीत. ते कार्यक्षम रहातात. आपल्याला या अवयवांचे दान करणे शक्य आहे. यामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात, अनेक नेत्रहीन व्यक्तिंना दृष्टी मिळू शकते. ज्यांच्या किडनी खराब झाल्या आहेत त्यांना नवीन किडनी मिळू शकतात. याची किंमत कोट्यावधी पौंड होते. त्यामुळे मी अवयव दान

करायचे म्हणजेच ‘ऑर्गन डोनर’ व्हायचे ठरवले आहे. मी पण तुम्हाला पण ‘ऑर्गन डोनर’ व्हायचे आवाहन करत आहे. केवळ तुमचे डेळे उघडावेत म्हणुन मी हा बनाव केला होता.’

त्या उद्योगपतीच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणुन 31 टक्के लोकांनी अवयव दान करण्याचे ठरवले.

आपण सुद्धा हेच करतो. रोज कोट्यावधी रुपयांची संपत्ती जाळून राख करून टाकतो.

आपण यातून काही धडा घेणार आहोत का?

# -12-

## 90 टक्के मार्क

'हे पहा! माझ्या मुलीला कोणत्याही परिस्थितीत कमीत कमी 90 टक्के मार्क हे मिळालेच पाहीजेत!' आठवीत शिकणाऱ्या मुलीचे वडील तिला घरी शिकवायला येणाऱ्या टिचरला तावातावाने सांगत होते. मुलीच वडील मध्यम वयीन होते तर टिचर यंग म्हणजे 30 च्या आतली होती.

'पण सर! तुमच्या मुलीला मागच्या परिक्षेत चांगले मार्क पडले आहेत!' टिचर समजाऊन सांगण्याच्या सुरात बोलत होती.

'चांगले म्हणजे किती?' वडिलांनी विचारले

'चांगले 73 टक्के मार्क पडले आहेत सर!' ती टिचर कळवळून सांगत होती.

'73 टक्के नाही तर 72.88 टक्के! पण हल्लीच्या कॉम्पिटिशनच्या जमान्यात हे मार्क पुरेसे नाहीत!' वडील ठामपणे म्हणाले.

‘सर मागच्या परिक्षेत तर तुमच्या मुलीला 60 टक्केच मार्क पडले होते. पण या परिक्षेत दिला 72.88 टक्के मार्क पडले आहेत. म्हणजे 12.88 टक्क्यांची घसघशीत वाढ झाली आहे. हे का नाही तुम्ही बघत?’ टिचर कळवळून बोलत होती.

‘ते मला काही सांगू नका! येत्या परिक्षेत दिला 90 टक्के मार्क हे पडलेच पाहीजेत!’ वडील ठासून म्हणाले.

‘सर! तुमची मुलगी हुशार आहे. मेहेनती आहे. हळू हळू तिची टक्केवारी वाढेल. ती 90 च काय पण त्यापेक्षाही जास्त मार्क मिळवू शकेल. जरा धीर धारा!’ टिचर परत कळवळून सांगत होती पण हे काही वडिलांना पटत नव्हते.

‘हे पहा मला थांबायला वेळ नाही. 90 टक्क्यांपेक्षा कमी मार्क असलेल्या मुलांना हल्ली कोणी कुत्रा सुद्धा विचारत नाही. माझ्या सगळया मित्रांची मुले 90 टक्केवाली आहेत. माझीच मुलगी 90 टक्क्यांच्या आत असते. त्यामुळे माझी मान नेहमी शरमेने खाली जाते. तुम्ही 90 टक्क्यांची गॅरंटी देता का?’ वडीलांनी भडकून विचारले

‘अहो! 90 टक्क्यांची गॅरंटी कशी देणार?’ टिचरने विचारले

‘मग तुमच्या शिकवणीचा उपयोग काय? इतरांपेक्षा मी तुम्हाला जास्त फी देतो आहे होय ना?’ वडील म्हणाले.

‘तुमचे म्हणणे बरोबर आहे सर! मी पण प्रयत्न करते आहेच ना!’ टिचर म्हणाली.

‘नुसतेच प्रयत्न नकोत तर मला रिझल्ट हवेत. मी हवे तर तुमची फी दुप्पट करतो. तुम्ही रोज एक तास शिकवता त्या ऐवजी दोन तास शिकवा, तीन तास शिकवा. मुलीची परिक्षा जवळ येत चालली आहे. आत्ताच मी तिचे खेळणे, टीव्ही, बाहेर जाणे, भटकणे, मैत्रीणींकडे जाणे बंद केले आहे. आता तिने फक्त अभ्यास एके अभ्यास करायचा. रोज फक्त चार तासच झोपायचे. उरलेला वेळ अभ्यासात घालवायचा!’ वडील म्हणाले.

‘मला तरी काही एक तसांपेक्षा जास्त वेळ देता येणार नाही कारण मला इतर बऱ्याच शिकवण्या आहेत. तुम्ही तुमच्या मुलीवर अन्याय करता आहात असे नाही तुम्हाला वाटत?’ टिचर परत कळवळून बोलत होती. त्या गरीब बिचाऱ्या निष्पाप मुलीचा चेहेरा सारखा तिच्या डोळ्यासमोर येत होता.

‘अन्याय? मी माझ्या मुलीशी कसे वागायचे हे तुम्ही मला शिकवणार?’ मुलीचे वडील भडकून म्हणाले.

‘तसे नाही सर! प्रत्येक माणसाची कपॅसिटी ठरलेली असते त्याप्रमाणे------‘ पण वडीलांनी टिचरचे बोलणे पूर्ण करू दिले नाही.

‘हे पहा! कपॅसिटी वगैरे फालतु बडबड मला नको! तुम्ही 90 टक्क्यांची गॅरंटी मला देता का बोला?’ वडील काहिशा घुश्यातच म्हणाले.

टिचर क्षणभर विचारात पडली आणि मग म्हणाली, ‘ठीक आहे. मी 90 टक्क्यांची गॅरंटी देते पण माझी फी 1 लाख रुपये असेल!’

‘वर्षाचे एक लाख रुपये ना? दिले!’ वडील म्हणाले.

‘वर्षाचे एक लाख रुपये नाहीत सर! दिवसाचे एक लाख रुपये. महिन्याचे तीस लाख रुपये!’ टिचर शांतपणे म्हणाली.

‘काय? दिवसाचे एक लाख रुपये? काय वेड लागलय काय? आठवीच्या मुलीच्या शिकवणी साठी एवढे पैसे कोणी देते काय?’ वडील भडकून म्हणाले.

‘का? तुमच्या मुलीच्या शिकवणीसाठी मला माझ्या इतर शिकवण्या सोडाव्या लागतील? त्यांचे नुकसान होईल त्याचे काय? दिवसाला 1 लाख रुपये फी मंजुर असेल तरच मी तुमच्या मुलीच्या 90 टक्के मार्कांची गॅरंटी देऊ शकेन!’ टिचर शांतपणे म्हणाले

‘अहो हे कसे शक्य आहे. माझा पगार तरी एवढा आहे का?’ वडील हताशपणे म्हणाले.

‘तुम्ही सॉफ्ट वेअर इंजिनिअर आहात म्हणजे तुम्हाला चांगलाच पगार असला पाहीजे. बाय द वे तुम्हाला किती पगार आहे?’ टिचरने विचारले.

‘फक्त 9 लाख!’ वडील म्हणाले.

‘म्हणजे महिन्याला फक्त 9 लाख पगार? फारच कमी पगार आहे!’ टिचर मिस्कीलपणे म्हणाली.

‘महिन्याचा नाही हो! वर्षाचा पगार 9 लाख रुपये आहे!’ वडील आंबट चेहेऱ्याने म्हणाले.

‘अरेरे फारच कमी!’ टिचर म्हणाली. ‘मग तुम्ही मला महिना 30 लाख रुपये कसे देणार? मग असे करा ना! तुम्हीच ओव्हरटाईम काम का करत नाही. तुम्ही पण फक्त चार तास विश्रांती घ्या. वीस तास काम करा! टिव्ही, हॉटेल, सिनेमा, मित्र, पार्ट्या, पिकनिक, फॉरेन टूर्स सर्व काही बंद करा. फक्त काम एके काम!’ ती टिचर शांतपणे म्हणाली.

‘अहो के कसे शक्य आहे?’ वडील म्हणाले.

‘का शक्य नाही? जर तुमच्या मुलीला हे शक्य आहे तर तुम्हाला का शक्य नाही?’ टिचरने विचारले.

‘अहो! माणसाच्या कपॅसिटीचा विचार नको का करायला?’ वडील म्हणाले.

‘एक्झॅरटली! मला पण हेच म्हणायचे आहे. हल्लीच्या दिवसांमध्ये वर्षाला 9 लाख रुपये पगार काही कमी नाही. तुमचा पण पगार हळू हळू वाढेल. तसेच तुमच्या मुलीचे आहे. 60 टक्के मार्क मिळवणाऱ्या मुलीने आज 73 टक्के मार्क मिळवले आहेत. उद्या ती आणखी चांगले मार्क मिळवील. तिच्यावर नको ती बंधने घालून तिचे बालपण हिरावून घेऊ नका. तिच्या ऍचिव्हमेन्ट बघा. रिझल्टच्या दुष्टचक्रात सापडू नका! 60 टक्क्यांचे तिने 73 टक्के मार्क मिळवले याबद्दल तिचे अभिनंदन करा, कौतुक करा! 90 टक्के मार्क मिळाले नाहीत म्हणुन तिचा दुस्वास करू नका! तुमच्या मित्रांच्या मुलांना 90 टक्के मार्क मिळाले म्हणजे तुमच्या मुलीलाही तेवढेच मिळायला पाहीजेत असा काही नियम नाही. उगीच तुमच्या मुलीची इतरांशी तुलना करत बसू नका. तिच्यात अनेक कला आहेत. तिचे पेन्टिंग उत्तम आहे. तिला गाण्याची आवड आहे. तिच्या या गुणांकडे बघा! परिक्षेतील मार्क म्हणजे काही सर्वस्व नसते. कितीतरी 90 टक्केवाली मुले मी मागे पडलेली बघीतली आहेत. मला विचाराल मला तुमच्या 9 लाख रुपये पगाराचे जास्त कौतुक आहे!’

‘थँकु टिचर! आज तुम्ही माझे डोळे उघडलेत. माणसाच्या ऍचिव्हमेन्ट महत्वाच्या, रिझल्ट नाहीत हे मला आज कळले!’

आता परिक्षा जवळ येत चालल्या आहेत तेव्हा!

ज्या ज्या पालकांना वाटते की त्यांच्या मुलाला किंवा मुलीला कमीत कमी 90 टक्के मार्क मिळालेच पाहीजेत, त्याने वर्गात पहिला यायलाच पाहिजे, किंवा त्यांना कमीत कमी फर्स्ट क्लास डिस्टिंक्शन मिळालेच पाहीजे अशा पालकांसाठी!

(मला व्हॉटसअपवर आलेल्या आणि मला भावलेल्या एका व्हिडिओच्या सौजन्याने)

# -13-

# अन्नाची नासाडी

नुकताच रतन टाटा यांनी ट्विटरवर पाठवलेला एक संदेश वॉट्स अपवर माझ्याकडे आला. मुळ संदेश इंग्रजीमध्ये असून त्याचे मराठी रुपांतर खाली देत आहे.

जर्मनी हा औद्योगीकदृष्ट्या अत्यंत प्रगत देश समजला जातो. आर्थिक दृष्टीने तो एक संपन्न देश आहे. त्यामुळे या देशातील जनता ऐश्वर्यसंपन्न जीवन जगत असेल असे आपल्याला वाटत असेल.

मी नुकताच हॅम्बर्गला गेलो होतो तेव्हाचा हा अनुभव आहे. आमच्या स्थानीक प्रतिनिधीने आम्हाला जेवायला म्हणुन एका चांगल्या हॉटेलमध्ये नेले. तेव्हा माझ्या लक्षात आले की त्या हॉटेलमधील बरीचशी टेबले रिकामीच आहेत. तेथे एक तरूण जोडपे जेवण करत होते. त्यांच्या पुढ्यात फक्त दोन प्लेट्स व दोन बिअरचे कॅन होते. मला वाटले की इतके साधे जेवण रोमँटिक कसे असू शकेल व असे साधे जेवण दिल्याबद्दल ती मुलगी त्याला सोडून तर जाणार नाही ना?

पुढील टेबलावर काही वृद्ध महिला जेवण करत होत्या. वेटर प्रत्येकीच्या डिशमध्ये वाढत होता व त्या महिला पण अन्नाचा कण अन कण संपवत होत्या. प्लेटमध्ये काहीही शिल्लक ठेवत नव्हत्या.

आम्हाला भूक लागली होती म्हणुन आमच्या स्थानीक प्रतिनिधीने थोड्या जास्त डिशेस ऑर्डर केल्या. जेवण संपवून आम्ही जेव्हा निघालो तेव्हा आम्ही ऑर्डर केलेल्या अन्नापैकी बरेचसे अन्न तसेच उरले होते.

आम्ही जेव्हा निघालो तेव्हा कांही वृद्ध महिला आमच्याशी इंग्लीशमध्ये बोलू लागल्या. आम्ही बरेचसे अन्न टाकून निघालो होतो हे त्यांना आवडले नव्हते.

'हे पहा! आम्ही हॉटेलचे पुर्ण बिल दिले आहे. त्यामुळे आम्ही किती अन्न मागे ठेवले याचे तुम्हाला काही देणे घेणे नाही!' माझ्या सहकाऱ्याने सांगीतले. त्यातील एक महिला फारच चिडली. तिने लगेच तिच्या पर्समधून सेल फोन काढला व कोणालातरी फोन केला. काही वेळातच सोशल सिक्युरिटीचा युनिफॉर्म घातलेला एक माणूस तेथे आला. आम्ही अन्न तसेच टाकून जात आहोत हे कळल्यावर त्याने आम्हाला तेथल्या तेथे 50 युरो ( अंदाजे 3800 रुपये) दंड केला व म्हणाला 'जेवढे अन्न तुम्ही खाऊ शकत असाल तेवढ्याच अन्नाची ऑर्डर देत चला. पैसे जरी तुमचे असले तरी हे अन्न बनवायला जी साधन सामग्री म्हणजे रिसोर्सेस लागतात ते आमच्या सोसायटीचे म्हणजे समाजाचे आहेत. जगात अनेक लोक

असे आहेत कि त्यांना पोटभर अन्न मिळत नाही. तेथे साधनांची कमतरता आहे. साधन सामग्री वाया घालवायचा तुम्हाला काहिही अधीकार नाही.’

एका श्रीमंत देशामधील लोकांची मानसिकता बघून आम्हाला आमच्या मानसिकतेची लाज वाटली. आपण अशा देशामधून आलेलो आहोत की जेथे साधनांची कमतरता आहे. असे असताना सुद्धा आपण पुष्कळ अन्न मागवतो व वाया घालवतो.

अमेरिकेमध्ये सुद्धा मला हाच अनुभव आला. तेथील अमेरिकन, थाई, चायनीज, मेक्सिकन हॉटेल्समध्ये अन्न टाकणे किंवा अन्नाची नासाडी करणे निषीद्ध समजले जाते. काही अन्न शिल्लक राहिल्यास थर्मोकोलच्या बॉक्सेस देण्यात येतात. त्यामध्ये उरलेले अन्न पॅक करून घरी घेऊन जायचे असा रिवाज आहे. बुफेमध्ये सुद्धा लोक जेवढे पचेल तेवढेच अन्न प्लेटमध्ये घेतात.

आपल्याकडे मात्र उलटी परिस्थिती आहे. लग्न, मुंज, पार्टी, जेवणावळी, हॉटेल्स यामध्ये कितीतरी अन्न रोज वाया जात असते. बुफेमध्ये सुद्धा लोक प्लेटी भरभरून घेत असतात व त्यातले बरेच पदार्थ फेकून देत असतात.

आपण सुद्धा आता अन्न कसे वाया जाणार नाही याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

तुम्हाला काय वाटते?

-14-

## माणुसकीचा झरा

एकदा एक माणूस मॉर्नींग वॉकसाठी बाहेर पडला होता. परत येताना त्याला रस्त्यावरील एका खांबावर एक चिठ्ठी घडी करून अडकवून ठेवलेली दिसली. त्याने कुतुहलाने ती चिठ्ठी उलगडून वाचायला सुरवात केली. ती चिठ्ठी बऱ्याच वेडावाकड्या अक्षरांमध्ये लिहिली होती. त्या चिठ्ठीतील मजकूर असा होता.

‘माझी 50 रुपयांची नोट हरवली आहे. मी एक गरीब आणि वृद्ध महिला आहे. ही नोट इथेच कुठेतरी पडली असावी. मी ती नोट शोधायचा प्रयत्न केला पण मला काही ती नोट सापडली नाही. ज्या कुणाला ही नोट सापडेल त्याने ती नोट खालील पत्यावर पोचवण्याची कृपा करावी.’

त्या चिठ्ठीच्या शेवटी पत्ता दिला होता आणि ‘गणपतीच्या देवळाजवळ’ अशी खुण पण सांगीतली होती.

त्या माणसाला काय वाटले कोणास ठाऊक. तो पत्ता शोधत निघाला. हा पत्ता एका गरीब आणि दळिद्री झोपडपट्टीतला निघाला. त्याने त्या वस्तीतील गणपतीचे देऊळ शोधून

काढले व त्या पत्यावरील घर पण शोधून काढले. ते घर म्हणजे एक चंद्रमौळी झोपडी होती. झोपडीचे दार बंद होते. त्याने दाराची कडी वाजवली. एका जख्ख म्हातारीने दार उघडले. त्या म्हातारीचे सर्वांग लटपटत होते. काठीचा आधार घेऊन ती कशीबशी उभी होती. शरीर खंगलेले, चेहेरा सुरकुतलेला, गालाची हाडे वर आलेली, अंगावर फाटके कपडे पण चेहेऱ्यावर स्वाभीमान असे तिचे रूप होते.

‘आजी मला तुमची 50 रुपयांची नोट सापडली! हे घ्या तुमचे पैसे!’ असे म्हणुन त्याने खिशातील 50 रुपयांची नोट काढून आजींना दिली.

‘कमाल आहे! माझी हरवलेली 50 रुपयांची नोट देण्यासाठी आत्तापर्यंत 40 माणसे येऊन गेली. तु 41 वा आहेस!’ आजी म्हणाल्या.

‘तुला कोणी सांगीतले माझे पैसे हरवले आहेत म्हणुन?’ आजींनी विचारले.

‘मी ते खांबावरच्या चिठ्टीमध्ये वाचले.’ त्या माणसाने उत्तर दिले.

‘एकतर माझे पैसे मुळीच हरवेले नाहीत! दुसरे म्हणजे ती खांबावरची चिठ्ठी मी लिहीलेली नाही. कारण एकतर मला नीट दिसत नाही त्यामुळे मी घरातून बाहेर पडत नाही. तसेच मला लिहीता वाचता पण येत नाही. कोणीतरी खोडसाळपणाने ती चिठ्टी लिहीली आहे. हे तुझे 50 रुपये परत घेऊन जा!’ आजी म्हणाल्या.

‘नको आजी! राहुदे हे पैसे तुमच्याजवळ! तुम्हालाच ते उपयोगी पडतील!’ तो माणूस म्हणाला.

‘कमाल आहे! आत्तापर्यंत जो जो माणूस माझे हरवलेले 50 रुपये परत द्यायला आला त्याला मी पैसे परत घे म्हणुन सांगीतले तर प्रत्येकाने हेच उत्तर दिले!’ आजीबाई म्हणाल्या

‘माझे एक काम करशील?’ आजीबाईंनी विचारले.

‘हो सांगाना! तुमचे काम नक्की करीन!’ त्या माणसाने उत्तर दिले.

‘अरे बाबा! जाताना ती खांबावरची चिठ्ठी फाडून टाक. लोकांना उगीच त्रास होतो आणि भुर्दंड बसतो. मी सगळयांनाच ती चिठ्ठी फाडून टाकायला सांगीतली. पण अजून कोणी ते काम केलेले दिसत नाही. बहुतकरून विसरले असावेत. निदान तू तरी ते काम करून टाक’ असे म्हणुन त्याला धन्यवाद देत त्या आजींनी त्यांच्या झोपडीचे दार बंद केले.

परत जाताना त्या माणसाला त्या खांबावरची चिठ्ठी दिसली. ती चिठ्ठी फाडण्यासाठी म्हणुन तो त्या खांबाजवळ आला आणि थबकला.

त्याच्या लक्षात आले की त्या एका चिठ्ठीमूळे माणुसकीचा झरा वाहू लागला आहे. त्या चिठ्ठीमूळे अनेक लोकांची मदत त्या गरीब आजीबाईंना मिळाली आहे. आपले 50 रुपये गेले पण एका गरजू माणसाला मदत केल्याचा आनंद व समाधान आपल्याला मिळाले. असेच समाधान त्या 40 लोकांना पण मिळाले असेल. ही चिठ्ठी जर आपण फाडून टाकली

तर माणुसकीचा झरा आटून जाईल. त्याला ती चिठ्ठी लिहिणाऱ्या माणसाचे कौतूक वाटले आणि तो चिठ्ठी न फाडताच तेथुन निघुन गेला.

'माणुसकी नाही! माणुसकी नाही!' अशी हाकाटी आपण मारत असतो. 'हल्ली माणुसकी शिल्लक राहीली नाही! माणसाला माणसाची पर्वा किंवा किंमत राहिली नाही' अशी बोंब ठोकत आपण सगळीकडे फिरत असतो. पण समाजात माणुसकीचे असे 'सुप्त' झरे नेहमीच वाहत असतात. फक्त आपल्याला ते दीसत नसतात. माणुसकीचे हे झरेच समाजाला व माणसाला जिवंत ठेवत असतात. असे झरे हेच समाजाच्या जिवंतपणाचे लक्षण असते.

तुम्हाला सुद्धा माणुसकीच्या अशा एखाद्या झऱ्यामध्ये सामील होण्याची संधी मिळाली तर ती जरूर घ्या. इतरांना मदत केल्यामूळे जो काही आनंद किंवा समाधान मिळते याचा जरूर अनुभव घ्या!

अर्थात हा अनुभव घ्यायचा की नाही हे तुम्हीच ठरवायचे!

(व्हॉट्सअपच्या सौजन्याने)

## शहाणपण लोखंडी खिळयांचे

एक मुलगा होता. तो अत्यंत संतापी स्वभावाचा होता. त्याला सतत कसला ना कसला तरी राग येत असे. जणूकाही राग त्याच्या नाकाच्या शेंड्यावर बसला होता. त्याला राग आला की मग त्याला काही भान रहात नसे. त्याच्या मनावरचा ताबा नष्ट होई. मग तो वाटेल ते बोलत असे, लोकांचा अपमान करीत असे, अत्यंत असभ्य भाषेत बोलत असे. कधी कधी मारहाण पण करत असे. भानावर आल्यावर तो माफी पण मागत असे. त्याचे हे 'संतापणे- माफी मागणे' हे चक्र सतत सुरू असे. लोक पण मोठ्या मनाने त्याला माफ करत असत. त्याला वाटायचे की आपण लोकांना कितीही लाथा मारल्या व नंतर माफी मागीतली की झाले. लोक पण विसरून जातात.

मुलाची ही वागणूक त्याच्या वडिलांना अजीबात आवडत नसे. त्याचे वडील अगदी विरुद्ध स्वभावाचे होते. ते वृत्तीने अगदी शांत व संयमी होते. ते क्वचीतच रागवत असत. रागावले तरी आपला तोल संभाळून वागत. माणसे कधीही दुखावली जाणार नाहीत याचे ते नेहमी भान ठेवत. त्यांनी आपल्या मुलाला समजाऊन सांगायचा पुष्कळ प्रयत्न करून पाहीला. पण त्याचा काही उपयोग होईना. मुलगा तर आता 'अँग्री यंग मॅन' बनला होता त्यामुळे आता त्याला सुधारणे शक्य नव्हते.

एक दिवशी त्या मुलाच्या वडीलांनी त्याला लोखंडी खिळयांचे एक भले मोठ्ठे खोके व एक हातोडी आणून दिली.

‘हे कशाला?’ मुलाने विचारले.

‘तुला राग आला की बाहेरच्या लाकडी कंपाऊंडवर एक खिळा ठोकायचा. प्रत्येक रागाला एक खिळा असे प्रमाण ठेवायचे. रोज रात्री किती खिळे ठोकलेस हे मला येऊन सांगायचे!’ वडीलांनी सांगीतले.

त्या मुलाच्या घराभोवती सुरेख लाकडी कंपाऊंड होते. तिथे खिळे ठोकायची कल्पना काही त्या मुलाला पसंत पडली नाही. तो वडीलांशी हुज्जत घालू लागता. पण फक्त एक महिन्यासाठीच हा प्रयोग करायचा आहे असे वडीलांनी सांगीतल्यामूळे तो कसाबसा तयार झाला. दुसऱ्या दिवसापासुन त्याने सुरवात केली.

पहिल्या दिवशी त्याने 37 खिळे ठोकले. दुसऱ्या दिवशी पण त्याने तेवढेच खिळे ठोकले. पण जस जसे दिवस जाऊ लागले, खिळयांची संख्या कमी कमी होऊ लागली. शेवटी शेवटी तर त्याने दिवसाला 2 ते 3 खिळे ठोकले व काही दिवस एकही खीळा ठोकला नाही. हे त्याने जेव्हा वडिलांना सांगीतले तेव्हा त्यांना पण आनंद झाला. थोडक्यात आपल्या मुलाने रागावर नियंत्रण मिळवायला सुरवात केली आहे याचे वडिलांना समाधान वाटू लागले होते.

‘आता ठोकलेले सर्व खिळे उचकटून बाहेर काढ!’ वडिलांनी सांगीतले.

त्या मुलाने ठोकलेले सर्व खिळे उचकटून बाहेर काढणे कठीण होते. कारण त्याने शेकडो खिळे त्या सुंदर कंपाऊंडला कुठे कुठे ठोकून ठेवले होते. शेवटी मोठ्या मेहेनतीने त्या मुलाने ते सर्व खिळे उचकटून काढले.

‘ शाबास!’ वडील म्हणाले, ‘आता कंपाऊंड कसे दिसते?’

कोण्या एके काळी सुरेख दिसणारे ते कंपाऊंड आता खीळे मारलेल्या भोकांमुळे भयानक आणि विद्रुप दिसत होते. त्याच्याकडे पहावत नव्हते.

‘कल्पना कर की खिळे ठोकणे ही तुझी राग येण्याची प्रक्रीया व खीळे उचकटून बाहेर काढणे ही तुझी माफी मागण्याची प्रक्रीया!’ वडील म्हणाले, ‘पण त्यामुळे काय झाले तर आपले सुरेख कंपाऊंड उद्धवस्त व विद्रुप झाले. ते रिपेअर करण्यासाठी बराच मोठा खर्च होईल. रागाचे असेच असते. त्यामुळे माणसाच्या मनाला भोके पडतात. मग तु नंतर कितीही माफी मागीतलीस तरी मनाला पडलेली भोके काही बुजत नाहीत. ती तशीच रहातात व त्यामुळे नात्यांमध्ये दरार पडते, ती उद्धवस्त किंवा विद्रुप होतात. मग ही नाती जोडायला फार मेहेनत घ्यावी लागते.’

यातून त्या मुलाने योग्य तो बोध घेतला.

मला असे अनेक लोक ठाऊक आहेत की ते रागाच्या भरात काही बाही बोलतात, अपमान करतात. नंतर ते माफी पण मागतात. आपण पण अनेक वेळा असे करत असतो. पण त्याचा एकुण परिणाम हा विद्रुप कंपाऊंडसारखाच असतो. कधी ना कधीतरी ही विद्रुपता बाहेर येतेच.

तात्पर्य

रागावर नियंत्रण ठेवणे व इतरांचा अपनाम न करणे!

कारण अपमानामुळे मनाला पडलेली भोके मागून कितीही माफी मागीतली किंवा दिलगिरी व्यक्त केली तरी सहसा बुजत नाहीत असा माझा तरी अनुभव आहे.

तुमचा अनुभव काय आहे?

अर्थात असे करायचे की नाही ते तुमचे तुम्हीच ठरवायचे!

## चेक

एका उद्योजकाचा व्यवसाय पार डबघाईला आला होता. डोक्यावर कर्जाचा मोठा डोंगर होता. कर्मचाऱ्यांचा पगार देण्यासाठी पैसे नव्हते. अनेक 'सप्लायर्स' ची देणी थकली होती. वेळेवर करांचा भरणा न केल्यामूळे सेल्स टॅक्स, इन्कम टॅक्स, एक्साईज ची माणसे येउन पैश्यासाठी तगादा लावत होते. विजेचे बिल वेळेवर न भरल्याने कारखान्याची वीज तोडली गेली होती, पाणी पुरवठा बंद करण्यात आला होता. बँकेने कर्जाचे हप्ते वेळेवर न भरल्यामूळे देणे करांनी कोर्टात खटले दाखल केले होते. बाजारातील पत, प्रतिष्ठा पार धुळीला मिळाली होती. आर्थिक टंचाई तर प्रचंड होती. या एकुणच तंगीमूळे तो पार वैतागला होता. या चक्रव्युहातून कसे बाहेर पडावे हे त्याला समजत नव्हते. तो गांगरून, गोंधळून गेला होता.

कंटाळून तो एके दिवशी एका बागेतल्या एका बाकावर जाऊन विचार करीत बसला असताना तेवढ्यात तेथे एक म्हातारबुवा आले. 'तुम्ही फार उदास दिसता! तुम्हाला कसली चिंता आहे कां? मला सांगा!' म्हातारबुवा म्हणाले. उद्योजकाने आपली सर्व कर्म कहाणी त्यांना सांगितली. त्यामुळे त्याला जरा हलके वाटू लागले. म्हातारबुवांनी त्याचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले आणि म्हणाले, 'मला वाटते मी तुम्हाला मदत करू शकेन!' त्यांनी खिशातून चेकबुक काढले, त्या उद्योजकाचे नांव विचारले, त्याच्या नांवाने चेक फाडून हातात ठेवला आणि म्हणाले 'हे पैसे घ्या! आत्तापुरते तरी हे पैसे पुरतील. याचा वापर करा. बरोबर एक वर्षाने याच ठिकाणी माझे पैसे परत करायला या!' असे म्हणुन ते म्हातारबुवा निघून गेले.

उद्योजकाने त्या चेकवर नजर टाकली आणि तो आश्चर्याने बघतच राहिला. कारण तो चेक 50 लाख रुपयांचा होता व त्यावर सही रतन टाटांची होती. टाटांसारखे श्रेष्ट आणि जेष्ट उद्योजक आपल्याला मदत करत आहेत हे बघून त्याला भरुन आले. घरी येऊन त्याने तो चेक तिजोरीत काळजीपूर्वक ठेवला. दुसऱ्या दिवशी चेक बँकेत टाकायचे त्याने ठरविले.

दुसरा दिवस उजाडला आणि त्याचे विचार बदलले. त्याने कांही दिवस आपल्या पद्धतीने प्रयत्न करायचे ठरविले. 50 लाख रुपयांच्या त्या चेकमूळे त्याच्या मनाला मोठे बळ मिळाले होते. हा चेक त्याने 'आणीबाणी' प्रसंगी लागला तरच वापरायचा असे ठरवून कपाटात ठेऊन दिला. अगदी जरुरी पडली तरच हा चेक बँकेत टाकायचे त्याने ठरवले.

त्याने नव्या जोमाने कामाला सुरवात केली. थोडेसे आत्म परीक्षण करून केलेल्या चुका शोधून काढल्या. उत्पादनाची गुणवत्ता वाढवित असताना अनावश्यक खर्चाला फाटा देऊन 'कॉस्ट कटींग' करायला सुरवात केली. त्याच्या उद्योगाची पुनर्बांधणी केली. योग्य कामासाठी योग्य व्यक्ती किंवा प्रत्येक व्यक्तीस योग्य काम हे धोरण ठरविले. जरुर नसलेले, अयोग्य, आळशी, कामचुकार, बेशिस्त कर्मचाऱ्यांना घरी पाठविले. 'कॅश फ्लो' वर बारीक लक्ष ठेवायला सुरवात केली. स्वतः मार्केटमध्ये फिरुन ग्राहकांना भेटायला सुरूवात केली. जुन्या ग्राहकांचा विश्वास संपादन करण्याबरोबरच नवीन ग्राहक शोधायला सुरवात केली. कांही महिन्यातच त्याच्या मेहेनतीला फळे येऊ लागली. त्याला मोठ्या ऑर्डर्स मिळाल्या. त्याचा 'कॅश फ्लो' वाढला. सर्वांचे पैसे चुकते करुन आणि सर्व कर्ज फेडून तो कर्जमुक्त झाला. त्याच्या कष्टाला आणि व्यवसायाला परत बरकत येऊ लागली. त्याची बाजारातील पत आणि प्रतिष्ठा वाढू लागली. पुन्हा एकदा त्याचा उद्योग उत्तम आर्थिक पायावर उभा राहिला. हे सगळे केवळ सहा महिन्यांच्या आतच घडले.

आता त्याला रतन टाटांच्या 50 लाख रुपयांच्या चेकची जरुरी नव्हती. त्यांनी टाटांचे आभार मानून हा चेक परत द्यायचे ठरविले. ठरल्याप्रमाणे तो एक वर्षाने त्या बागेत चेक घेऊन आला. ठरल्याप्रमाणे म्हातारबुवा आले. तो म्हातारबुवांना चेक परत करुन आपली यशोगाथा सांगणार होता तेवढ्यात एक नर्स घाई घाईने तेथे आली. तिने त्या म्हातारबुवांना पकडले आणि म्हणाली, 'माफ करा! हे मनोरुग्ण आहेत. जवळच्या वेड्यांचा इस्पितळतले ते एक पेशन्ट आहेत. ते मधेच गायब होत असतात. स्वतःला 'रतन टाटा' समजतात! यांनी तुम्हाला कांही त्रास तर दिला नाही ना?' असे म्हणुन ती नर्स त्यांना घेऊन गेली.

तो उद्योजक थक्क होऊन बघतच राहिला. म्हणजे त्याला मिळलेला 'रतन टाटा' यांचा 50 लाख रुपयांचा चेक हा खोटा किंवा बोगस होता. पण या 'खोट्या किंवा बोगस' चेकनेच हा चमत्कार केला होता.

पैसा, मग तो खरा असो, आभासी असो किंवा खोटा असो, महत्वाचा नसतोच. महत्वाचा असतो तो 'आत्मविश्वास'.

त्या खोट्या चेकमूळे त्या उद्योजकाचा गमावलेला आत्मविश्वास परत आला. या बळावरच तो आपला व्यवसाय संकटातून बाहेर काढू शकला.

जगा, पण 'आत्मविश्वासाने' जगा! आपल्या आत्मविश्वासाला केव्हाही तडा जावू देऊ नका!

(श्री. दिनेश फडणीस यांच्या सौजन्याने)

## 'ईगो' (Ego) म्हणजे नक्की काय?

एकदा एक कावळा आपल्या पंजात मांसाचा एक भला मोठ्ठा तुकडा घेऊन उडत चालला होता. त्याचा विचार होता की एखाद्या शांत जागी उतरावे आणि तो मांसाचा तुकडा शांतपणे गट्ट करावा. थोड्या वेळाने त्याच्या लक्षात आले की काही गिधाडे त्याच्या मागे लागली आहेत. ती गिधाडे बघुन तो कावळा घाबरला. त्याला वाटले की ती गिधाडे त्याला मारण्यासाठीच त्याच्या मागे लागली आहेत. त्या गिधाडांच्या तावडीतुन सुटण्यासाठी तो कावळा आणखी जोरात आणि आणखी उंचीवरून उडायचा प्रयत्न करू लागला. पण त्याने त्याच्या पंजात धरलेल्या मांसाच्या जड तुकड्यामुळे हे काही शक्य होईना. कावळयाची चांगलीच दमछाक झाली. त्याला काही फार उंचावरून उडता येईना. एक गरूड ही गंमत बघत होता. शेवटी तो गरूड पक्षी उडत कावळयाजवळ आला आणि म्हणाला, 'का रे बाबा! काय भानगड आहे? तु एवढा घामाघुम का झाला आहेस?'

तो कावळा म्हणाला, ' हे गरूडा! ही गिधाडे केव्हापासुन माझ्या मागे लागली आहेत. ती माझ्या जिवावर टपली आहेत. त्यांच्यापासुन बचाव करण्यासाठी मी अजुन उंचावरून उडायचा प्रयत्न करतो आहे.'

कावळयाचे हे बोलणे ऐकुन तो गरूड म्हणाला, ' अरे ती गिधाडे तुझ्यामागे नाहीत, तर तुझ्या पंजात असलेल्या मांसाच्या तुकड्यासाठी तुझ्या मागे लागली आहेत. तो तुकडा

जड असल्यामुळे तुला फारसे उंचावरून उडता पण येत नाही. फेकुन दे तो मांसाचा तुकडा आणि बघ काय होते ते!’

कावळयाने त्याप्रमाणे केले. त्याने तो मांसाचा तुकडा आपल्या पंजामधुन सोडुन दिला. मागे लागलेली सगळी गिधाडे त्या मांसाच्या तुकड्याकडे गेली. मांसाच्या तुकड्याचे ओझे गेल्याने त्या कावळयाला पण हलके वाटले आणि त्याने उंच भरारी घेतली.

आपण सगळेजण कावळेच आहोत आणि असाच एक मांसाचा जड तुकडा आयुष्यभर आपल्या पंजात पकडुन आपण जगत असतो. या मांसाच्या तुकड्याचे नाव आहे ‘ईगो’ (Ego) म्हणजेच ‘मी’ पणा किंवा स्वतःवीषयीच्या काही भ्रामक कल्पना.

प्रत्येकाला ईगो हा असतोच. आपल्याला हरभऱ्याच्या झाडावर चढवणारे अनेक जण भेटत असतात आणि आपण पण खुशी खुशी हरभऱ्याच्या झाडावर चढत असतो. आपण कोणीतरी खास आहोत, कुणीतरी स्पेशल आहोत, आपण फार हुशार किंवा बुद्धीमान आहोत, आपल्याला सगळे काही कळते किंवा समजते, आपण दादा आहोत, आपल्याकडे भरपूर शिक्षण किंवा संपत्ती आहे अशा प्रकारचे भ्रम अनेकांना झालेले असतात. आपली इज्जत, आपली प्रतिष्ठा, घरण्याची अब्रु अशा नावाखाली अनेक जण या भ्रामक कल्पना प्राणपणाने जपत असतात. मग या साठी शत्रुत्व आले तरी चालते, माणसे तुटली तरी चालतात, नातेसंबंध संपुष्टात आले तरी त्याची त्यांना पर्वा नसते. त्यांना त्यांचा ‘ईगो’ नावाचा मांसाचा तुकडाच प्राणप्रीय असतो. मग कितीही गिधाडे मागे लागली तरी त्याची यांना पर्वा नसते. गिधाडे उंच उडुन जातात पण हे मात्र मागेच रहातात. पण ज्यांना ‘ईगो ’ नावाचा मांसाचा तुकडा सोडणे जमते तेच उंच भरारी घेऊ शकतात.

एकदा तरी आपला ईगो बाजुला ठेऊन बघा. विसरून बघा. ईगोपासुन सुटका करून बघा!

बघा काय चमत्कार होतो ते!

अर्थात असे करायचे की नाही हे ज्याचे त्याने ठरवायचे

(व्हॉट्सअपच्या सौजन्याने)

-18-

## करावे तसे भरावे

-1-

मायकेल एक हुशार पण गरीब मोटार मेकॅनिक होता. तो एका गॅरेजमध्ये कामाला होता. पण ते गॅरेज बंद पडले आणि मायकेलवर बेकारिची कुऱ्हाड कोसळली. त्याने लगेच दुसरी नोकरी शोधायला सुरवात केली पण बाजारात मंदी असल्यामुळे त्याला दुसरी नोकरी मिळत नव्हती. त्याने अनेक ठिकाणी अर्ज केले पण 'अप्लाय अप्लाय बट नो रिप्लाय ' अशी त्याची अवस्था होती.

शेवटी त्याच्या प्रयत्नाला यश आले. एका मोठ्या व नावाजलेल्या कंपनीकडून त्याला इन्टर्व्हुसाठी बोलावणे आले. इन्टर्व्हुला वेळेवर हजर रहावे, उशीर केल्यास विचार केला जाणार नाही अशी तंबी पण देण्यात आली.

मोठ्या उत्साहाने मायकेल इन्टर्व्हु देण्यासाठी स्वच्छ, इस्त्रीचे कपडे घालून निघाला. त्याच्याकडे एक मोडकी सायकल हेच एकमेव वाहन होते. कंपनी बरीच दूर होती. मायकल सयकलवरून निघाला. रस्त्यात त्याला एक मोटार बंद पडलेली दिसली. एक वृद्ध ग्रृहस्थ ती मोटार चालु करण्याचा प्रयत्न करत होते पण त्यांना काही ते जमत नव्हते. त्यामुळे ते फार त्रासलेले होते. लोकांना मदतीसाठी हाका मारत होते पण धावपळीची वेळ असल्यामुळे कोणी थांबायला तयार होत नव्हते.

मायकलला त्या आजोबांची दया आली असावी. त्याने सायकल थांबवली व काय झाले असे त्या आजोबांना विचारले. 'गाडी अचानक बंद पडली, सुरू होत नाही' आजोबा म्हणाले. 'मी मोटार मेकॅनिक आहे. मी तुमची गाडी बघू का?' मायकेलने विचारले. 'जरूर ' असे म्हणुन आजोबांनी गाडीची चावी मायकेलकडे दिली व ते खाली उतरले. मायकेलने गाडीची तपासणी केली व गाडीत काय फॉल्ट आहे हे लगेच त्याच्या लक्षात आले.

'मी तुमची गाडी ठीक करू शकतो पण आत्ता माझ्याकडे वेळ नाही.' मायकेलने सांगीतले. 'मी आत्ता इन्टर्व्हु देण्यासाठी चाललो आहे. मी जर तेथे वेळेवर पोचलो नाही तर माझा चान्स जाईल.'

'तुला कुठे इन्टर्व्हुला जायचे आहे?' आजोबांनी विचारले. मायकेलने कंपनीचे नाव सांगीतले.

'तु जर माझी गाडी रिपेअर केलीस तर मी तुला माझ्या गाडीतून इन्टर्व्हुला सोडेन. तसेच माझ्यामूळे उशीर झाला असे आत येऊन सांगेन.' आजोबा म्हणाले.

'ठीक आहे!' मायकेलने आजोबांवर विश्वास ठेवला. त्यांची गाडी रिपेअर केली. तिथेच बाजुला सायकल ठेवली व आजोबांच्या गाडीतून इन्टर्व्हु होता त्या ठिकाणी पोचला. त्याने त्याचा अर्ज दिला. पण त्याने बघीतले की तेथे भरपूर गर्दी आहे. अनेक जण आलेले आहेत. त्यामुळे आपल्याला चान्स मिळेल की नाही याची मायकेलला शंका वाटू लागली. अर्ज नेणाऱ्या माणसाने त्याला 'तुम्हाला थांबायला सांगीतले आहे, तुम्ही जाऊ नका!' असा निरोप सांगीतल्यामूळे मायकेलने थांबायचे ठरवले.

इंटर्व्हुला सुरवात झाली. एक एक उमेदवार आत जात होता व बाहेर येत होता. असे करता करता आख्खा दिवस संपला. संध्याकाळची वेळ सुरू झाली. अजुन मायकेलला बोलावणे येत नव्हते. तो तर पार कंटाळून गेला होता. आपल्याला काही ही नोकरी मिळत नाही असे त्याला प्रकर्षाने वाटू लागले होते. शेवटी सगळे कँडिडेट्स संपले व मायकलला बोलावणे आहे. मायकल इन्टर्व्हुच्या खोलीत गेला. समोर सहा माणसे बसली होती. मधल्या उंच पाठीच्या खुर्चीवर एक वृद्ध गृहस्थ बसले होते. ते त्या कंपनीचे सीईओ होते. मायकलने त्यांचेकडे पाहीले आणि त्याला धक्काच बसला. ज्या आजोबांना त्याने मदत केली होती तेच समोर बसले होते.

'मी तुझे कौशल्य बघीतले आहे. त्यामुळे तु उत्तम मेकॅनिक आहेस हे मी तेव्हाच ओळखले होते. पण तुझ्यातली माणुसकी बघून मी जास्त प्रभावीत झालो. तु माझ्याच कंपनीत इन्टर्व्हुला येतो आहेस हे कळल्यावर मी तिथेच तुझी निवड केली. पण तुला बराच वेळ थांबावे लागले कारण इथे आलेल्या बाकिच्या कँडिटेसचा इन्टर्व्हु घेणे आवश्यक होते. अभिनंदन! उद्यापासुन कामावर हजर हो!' ते आजोबा म्हणाले.

मायकलच्या डोळयातून कृतज्ञतेचे दोन अश्रु ओघळले.

-2-

जॉन एक ॲग्रेसिव्ह मार्केटींग मॅनेजर होता. तो फक्त त्याच्या कामातच नव्हे तर एरवी सुद्धा ॲग्रेसिव्हच वागायचा. एका रविवारी तो मॉलमध्ये खरेदीसाठी म्हणुन गेला. मॉलमध्ये प्रचंड गर्दी होती. कार पार्किंग फुल होते. गाडी पार्क करायला कुठे जागा मिळते का हे पहाण्यासाठी त्याने गाडी स्टार्ट केली. तोच समोरच्या पार्कींग लॉटमधून एकजण

त्याची गाडी मागे घेत असल्याचे त्याला दिसले. तेथेच एक म्हातारबुवा आपल्या गाडीत बसून ती कार बाहेर पडण्याची वाट बघत होते. कारण त्यांना त्या ठिकाणी गाडी पार्क करायची होती. कारण त्या ठिकाणी गाडी पार्क करायचा हक्क त्यांचा होता. तेवढ्यात जॉनने मोठ्या स्मार्टपणाने आपली गाडी घुसवली, पार्क केली, आणि गाडीतून बाहेर पडून विजयी मुद्रेने त्या म्हातारबुवांकडे बघत मॉलकडे चालु लागला. बिचारे म्हातारबुवा थोडेसे वैतागले व दुसरीकडे पार्किंग शोधण्यासाठी निघून गेले.

त्यानंतरचा दिवस सोमवारचा होता. जॉनच्या दृष्टीने हा दिवस अत्यंत महत्वाचा होता. त्या दिवशी एका मोठ्या आणि प्रतिष्ठीत कंपनीबरोबर एक भले मोठे कॉन्ट्रॅक्ट 'साईन ' होणार होते. यासाठी जॉनने ढोर मेहेनत केली होती. हे कॉन्ट्रॅक्ट म्हणजे जॉनच्या शिरपेचातील मानाचा तुरा ठरणार होता. त्याचे प्रमोशन पक्के होणार होते. हे कॉन्ट्रॅक्ट आपल्यालाच मिळणार याची जॉनला खात्रीच होती.

कॉन्ट्रॅक्टवर सही करण्यासाठी जॉन आपल्या क्लायंटच्या ऑफिसमध्ये पोचला. कंपनीचे सिईओ कॉन्ट्रॅक्टवर सही करणार होते. त्याआधी एक फॉर्म्यालिटी म्हणुन त्या सीईओंना भेटणे व त्यांच्याशी 'शेक हॅन्ड' करणे एवढीच गोष्ट बाकी राहिली होती.

जॉन मोठ्या उत्साहाने सीईओ साहेबांना भेटायला गेला. त्याला आत बोलावणे आले म्हणुन तो मोठ्या उत्साहाने आत गेला. त्याने समोर नजर टाकली आणि तो चांगलाच हादरला. ज्या म्हातारबुवांचा पार्किंक लॉट त्याने हिरावून घेतला होता तेच म्हातारबुवा समोर बसले होते. म्हातारबुवांनी पण त्याला लगेच ओळखले. त्यांनी कॉन्ट्रॅक्टवर सही न करताच ते पेपर्स परत पाठवून दिले.

जॉनला ते कॉन्ट्रॅक्ट मिळाले नाही.

बिचारा जॉन डोक्याला हात लाऊन बसला.

-3-

थोडक्यात- जसे करावे तसे भरावे.

(व्हाट्सअपच्या सौजन्याने)

## उंटांचे शहाणपण

'उंटावरचा शहाणा' अशी आपल्यात एक म्हण आहे. ही म्हण शक्यतो बिनडोक माणसासाठी वापरण्यात येते व याला कुचेष्टेचा वास पण येत असतो. पण याच उंटांमूळे शहाणपण शिकता येते.

एका गावात एक तरूण रहात होता व त्याला अनेक समस्या होत्या. घरी समस्या होत्या, ऑफीसमध्ये समस्या होत्या, बाहेरसुद्धा समस्याच होत्या. त्याला वाटायचे की त्याला समस्यांनी घेरून टाकले आहे. आपण समस्यांच्या जंगलांत अडकलो आहोत असे त्याला वाटायचे. यातुन सुटायचा त्याचा प्रयत्न चालु होता पण त्याला यश मिळत नव्हते. त्यामुळे तो पार वैतागुन गेला होता आणि जीवन संपवण्याचे विचार पण त्याच्या मनात येऊ लागले होते.

त्याच्या गावात एक साधु महाराज आले व ते लोकांना योग्य मार्गदर्शन करतात असे त्याला कळले. त्याने त्या महाराजांना भेटून त्यांचे मार्गदर्शन घ्यायचे ठरवले. तो महाराजंना भेटायला गेला. तेथे बरीच गर्दी होती. लोक रांग लाऊन उभे होते. शेवटी एकदाचा त्याचा नंबर आला.

‘बोल वत्सा! तुझी काय समस्या आहे?’ साधु महाराजांनी विचारले

‘काय सांगु महाराज? एकच समस्या असेल तर सांगता येईल! माझ्या तर 100 समस्या आहेत. ऑफीसमध्ये, घरामध्ये, बाहेर सगळीकडे समस्याच समस्या आहेत. काय करावे काही समजत नाही. कधी कधी तर जीव द्यावासा वाटतो?’ तो तरुण वैतागून म्हणाला.

‘ठीक आहे आपण तुझ्या समस्यांवर उद्या सकाळी बोलू. कारण मला विचार करायला वेळ हवा. पण तु माझे एक काम करशील?’ साधु महाराज म्हणाले.

‘होय करीन ना! काय काम आहे?’ त्या तरुणाने विचारले.

‘माझे बाहेर 100 उंट आहेत. त्यांना तु रात्री झोपवायचेस. सगळे उंट झोपल्यावरच मग तु झोपायचेस. लक्षात ठेव उंट तसेच झोपत नाहीत. आधी त्यांना जमिनीवर बसवावे लागते मगच ते झोपतात. उद्या सकाळी मला भेटायला ये!’ साधु महाराज म्हणाले.

ठरल्याप्रमाणे तो तरूण दुसऱ्या दिवशी सकाळी त्या साधु महाराजांना भेटायला गेला. त्यावेळी त्याचे डोळे लाल झालेले होते, सुजलेले होते. रात्री नीट झोप न झाल्याच्या स्पष्ट खुणा दिसत होत्या.

‘काय झाले? रात्री नीट झोप झाली नाही का?’ साधु महाराजांनी विचारले

‘नाही ना! मुष्किलीने 2 ते 3 तास झोप मिळाली!’ त्या तरुणाने वैतागाने उत्तर दिले

‘का! काय झाले?’ साधु महाराजांनी विचारले.

‘काय सांगू महाराज!’ तो तरूण सांगू लागला ‘आपण सांगीतले त्याप्रमाणे मी उंटांना खाली बसवायचा प्रयत्न केला. बरेचसे उंट खाली बसले व नंतर झोपी गेले. पण काही नाठाळ उंट होते. त्यांना खाली बसवले की ते लगेच उभे रहायचे. बराच प्रयत्न केला तरी ते काही खाली बसेनात. पण पुढे काय झाले कुणासठाऊक. ते आपोआप खाली बसले व झोपी गेले. पण चार पाच उंट मात्र फारच नाठाळ निघाले. कितीही प्रयत्न केले पण ते काही शेवटपर्यंत खाली बसलेच नाहीत. मग मीच त्यांच्याकडे दुर्लक्ष केले व थोडी झोप काढली!’ त्या तरुणाने उत्तर दिले.

‘तुझ्या समस्या या उंटांसारख्याच आहेत!’ साधु महाराज म्हणाले.

‘ते कसे काय? माझ्या समस्यांचा व या उंटांचा काय संबंध?’ त्या तरुणाने काहीसे गोंधळून विचारले.

‘ तु मला आत्ताच सांगीतले की बऱ्याच उंटांना तु खाली बसवलेस व मग ते झोपी गेले. याचा अर्थ तुझ्या समस्यांपैकी बऱ्याच समस्या अशा आहेत की त्या तु सोडवू शकतोस किंवा त्यांची उत्तरे तुला ठाऊक आहेत. पण तू तसा प्रयत्न करत नाहीस!’

‘तुला काही नाठाळ उंट सापडले की जे प्रयत्न करूनही खाली बसत नव्हते व झोपत नव्हते. पण काहीतरी घडले व ते झोपी गेले. याचा अर्थ असा की तुझ्या काही समस्या या आपोआपच सुटणार आहेत. त्या सोडवण्यासाठी उगीच जिवाचा आटापीटा करू नकोस!’

‘कांही उंट शेवटपर्यंत झोपलेच नाहीत. याचा अर्थ काही समस्या अशा आहेत त्या कधीच सुटणार नाहीत. त्या सोडवण्यासाठी आयुष्य वाया घालवण्यात काही अर्थ नाही. अशा समस्यांकडे काणा-डोळा केलेला किंवा दुर्लक्ष केलेलेच बरे’

‘समस्या या सगळयांनाच असतात. यापासुन कोणाचीही सुटका नाही. कुठल्या समस्या सुटु शकतात, कुठल्या समस्या आपोआप सुटू शकतात आणि कोणत्या समस्यांकडे दुर्लक्ष करायला पाहीजे हे तु शिकलास तर तुझे आयुष्य सुखी, समाधानी होईल’ साधु महाराज म्हणाले.

त्याप्रमाणे खरोखरच त्या तरुणाचे आयुष्य सुखी समाधानी झाले

तुमचे काय?

(व्हॉट्सअपच्या सौजन्याने)

## प्रेम (Love) आणि मीपणा (Ego)

फार फार पूर्वीची गोष्ट आहे. एक आटपाट बेट होत. माणसाच्या मनातील सर्व भावना त्या बेटावर सुखा-समाधानाने व एकोप्याने रहात होत्या. एकदा मोठे वादळ झाले. समुद्र खवळला व ते बेट बुडायला लागले. लगेच 'प्रेम' (Love) नी एक नौका तयार केली व सगळयांना त्या नौकेत बसायला सांगीतले. सगळया भावना पटापट नौकेत चढल्या पण एक भावना मात्र काही केल्या नौकेत चढायला तयार होत नव्हती. ती भावना होती 'मीपणा' (Ego). वेळ फारच थोडा होता. सर्व भावना ओरडून ओरडून 'मीपणा' ला लवकर लवकर नावेत चढायला सांगत होत्या पण त्याचा काही ढिम्म उपयोग होत नव्हता. 'मीपणा ' हट्टाला पेटली होती, बेट सोडायला तयार नव्हती. शेवटी सर्वांनी 'प्रेम' ला सांगीतले की आपण सर्वजण निघून जाऊया, मीपणाला मागेच ठेऊया. पण हे काही प्रेमला पटत नव्हते. कारण 'प्रेम'चे सगळयांवरच प्रेम होते, मीपणावर पण प्रेम होते. शेवटचा प्रयत्न म्हणुन प्रेमने बेटावर जाऊन मीपणाला समजाऊन सांगायचे ठरवले. समुद्र खवळलेला असताना सुद्धा प्रेम बेटावर उतरली व मीपणाला समजाऊन सांगू लागली. तेवढ्यात एक भली मोठ्ठी लाट आली. बेट त्यात वाहून गेले व त्याबरोबर 'प्रेम' आणि 'मीपणा' यांचा पण अंत झाला.

तेव्हापासुन 'मीपणा' (Ego) मुळे 'प्रेमाचा' (Love) अंत होऊ लागला.

आपल्या 'मीपणा' पायी आपल्यातील 'प्रेमाचा' अंत तर हेणार नाहीना याची दक्षता घ्यायला शिका.

## भिकारी

नुकतीच मी फेसबूकवर एक पोस्ट वाचली. ती मला आवडली आणि भावली. एक भिकारी रेल्वे गाडीत भिक मागत फिरायचा. त्याला एकदा एक व्यापारी भेटतो. तो त्या भिकाऱ्याला विचारतो की जे लोक तुला भिक देतात त्या बदल्यात तु त्यांना काय देतोस? काहीतरी देत जा, तुला चांगली भिक मिळेल. आता गरीब बिचारा भिकारी काय देणार? त्याला रेल्वे रुळाच्या कडेला उभे असलेले एक बेवारशी झाड दिसते. त्या झाडाला बरीच सुंदर सुंदर फुले आलेली असतात. भिकारी यातली काही फुले तोडून त्याला भिक देणाऱ्यांना देऊ लागतो. वर्षभरातच तो भिकारी फुलांचा व्यापारी बनतो.

मला पण असाच काहीसा अनुभव आला आहे.

जवळ जवळ 35 ते 40 वर्षांपूर्वीचा हा किस्सा आहे. मी पुण्यात जेव्हा पहिल्यांदा भाड्याने जागा घेतली त्या जागेजवळ एक झोपडपट्टी टाईप वस्ती होती. त्या वस्तितील काही बायका रोज भिक मागायला बाहेर पडत. जवळपासच्या घरांजवळ या बायका दीनवाण्या चेहेऱ्याने भिक मागताना दिसत. अशीच साधारण पंचविशिची एक बाई भिक मागायला येई. तिच्या कडेवर दोन एक वर्षाचे मुल असायचे तर बरोबर तिची साधारणपणे पाच ते सहा वर्षांची मुलगी असायची. अर्थातच त्यांचे कपडे मळके, फाटके, गबाळे आणि

गलिच्छ असायचे. या मायलेकी मला रोज भिक मागताना दिसायच्या. कधीकधी आई एकीकडे तर ती मुलगी दुसरीकडे भिक मागताना दिसायचे. आमच्या घरी बहुतेकवेळा ती मुलगीच भिक मागायला यायची.

आमच्या घराच्या मागे आणि पुढे छोटेसे अंगण होते पण ते बरेचसे अस्वच्छ होते. एकदा ती मुलगी भिक मागायला आली तेव्हा माझी बायको तिला म्हणाली की तु जर हे अंगण झाडून स्वच्छ केलेस तर मी तुला छानसा खाऊ देईन. ती मुलगी लगेच तयार झाली. तिथेच कोपऱ्यात एक मोडकी केरसुणी पडली होती. त्या मुलीने ती केरसुणी उचलून भराभर अंगण झाडायला सुरवात केली. त्या मुलीने अंगण झाडून चकाचक साफ केले. माझ्या बायकोने तिला दोन लाडू दिले. ती मुलगी ते लाडू तिच्या मळक्या परकऱ्याच्या ओच्यात बांधून हसत, खेळत, बागडत निघून गेली. दुसऱ्या दिवशी त्या मुलीने मागचे अंगण झाडून दिले. त्याबदल्यात माझ्या बायकोने तिला ताजी पोळी भाजी दिली. ती मुलगी तिला दिलेले पदार्थ घेऊन जाते हे लक्षात आल्याने माझ्या बायकोने तिला पोळी भाजी एका कागदाच्या पिशवीत व्यवस्थीत पॅक करून दिली.

त्यानंतर हा नेहमीचाच किस्सा झाला. ती मुलगी यायची आणि काकु काही काम आहे का असे विचारायची. काही काम असेल तर झटकन करून द्यायची. काम असो वा नसो आमच्या घरातून तिला ताजी पोळी भाजी रोजच मिळायची. आम्ही तिला शिळेपाके अन्न देत नव्हतो. एकदा आमची मोलकरीण आली नव्हती. धुणे भांड्याची जबाबदारी माझ्या बायकोवर पडली. माझी बायको भांडी घासत असताना ती मुलगी आली. माझ्या बायकोने तिला घासलेली भांडी विसळण्यासाठी मदत करायला सांगीतले. त्या मुलीने

सगळी भांडी अगदी स्वच्छ धुऊन ओळीने घरात मांडुन ठेवली. माझ्या बायकोने पोळीभाजीबरोबर तिच्या हातावर पाच रुपये टिकवले.

त्यानंतर लवकरच माझे तिथुन स्थलांतर झाले. मला दुसरी चांगली जागा मिळाली पण त्या वस्तीपासुन दूर मिळाली. मग त्यानंतर माझे काही त्या भागात जाणे झाले नाही. माझे पण स्वतःचे भाड्याची जागा ते वन रूम किचन फ्लॅट, नंतर वन बीएचके फ्लॅट आणि नंतर टूबिएचके फ्लॅट असे अपग्रेडेशन होत गेले. त्यामुळे मी त्या वस्तीला जवळ जवळ विसरूनच गेलो.

काही वर्षांपूर्वी माझ्या एका मित्राने त्या भागात फ्लॅट घेतल्याचे कळले. बरेच दिवस तो मला फ्लॅट बघायला बोलवत होता. एके दिवशी दुपारी वेळ होता म्हणुन त्याचा फ्लॅट बघायला म्हणुन स्कूटरवर एकटाच गेलो. आता त्या भागात बरेच चेन्जेस झाले होते. ती झोपडपट्टी जवळ जवळ नामशेष झाली होती. मी ज्या घरात भाड्याने रहात होतो ते घर पण गायब झाले होते. अनेक नवीन रस्ते, नवीन बोळकांडी झाली होती. पत्याविषयी माझ्या मनात थोडे कन्फ्युजन होते. तिथे बरीच टपरीवजा दुकाने होती. मी स्कूटर थांबवली आणि एका टपरीवजा दुकानात पत्ता विचारण्यासाठी शिरलो. त्या दुकानात एक बाई बसल्या होत्या आणि माझ्याकडे टक लाऊन बघत होत्या. माझ्या चेहेऱ्याला काहीतरी काळेबेरे लागले असावे म्हणुन त्या बघत असतील असे वाटून मी उगाचच माझा चेहेरा रुमालाने पुसत होतो.

‘काका! तुम्ही पूर्वी या भागात रहात होतात का?’ त्या बाईंनी विचारले.

‘हो पण फार पूर्वी! त्याला आता कितीतरी वर्षे झाली!’ मी म्हणालो.

‘काका! तुम्ही अमुक अमुक ठिकाणी रहात होता का?’ परत त्या बाईने विचारले.

‘होय’ मी उत्तर दिले.

‘काका जरा थांबा! मी आईला बोलावते’ असे म्हणुन ती बाई पळत पळत आपल्या दुकानातून बाहेर पडली आणि आपल्या आईला घेऊन आली. तिची आई सुद्धा साठीच्या वरची असावी.

‘आई हेच ते काका!’ ती बाई म्हणाली पण मला काय चालले आहे तेच काही उमजत नव्हते.

‘काका! आठवतय का की तुमच्या घरी एक मुलगी भिक मागायला यायची! तुम्ही त्या मुलीला काम सांगायचात आणि पोळी भाजी पण द्यायचात! ती मुलगी मीच आहे!’ त्या बाईने हे सांगताच मला आश्चर्याचा धक्काच बसला.

'साहेब! तुम्ही आम्हाला नवीन मार्ग दाखवलात!' आता त्या मुलीची आई बोलू लागली. 'माझी मुलगी बराच वेळ तुमच्या घराजवळ घोटाळते पण पैसे काही आणत नाही, खायला मात्र आणते म्हणुन मी तिच्यावर ओरडायचे. त्यातुन तुम्ही तिच्याकडून काम पण करून घेता हे कळल्यावर मी तुमच्यावर रागावले होते. म्हणुन मी एक दिवस गुपचुप माझ्या मुलीच्या मागे मागे तुमच्या घराजवळ आले. माझ्या मुलीने काही काम आहे का असे विचारले. तुम्ही तिला भांडी विसळण्याचे काम दिलेत आणि पोळीभाजीबरोबर वर पैसे पण दिलेत. एकदम माझ्या डोक्यात प्रकाश पडला. आपण जर भिक मागण्याऐवजी काही काम आहे का असे विचारले तर? मी तो प्रयोग सुरु केला. मी लोकांच्या घरी भिक मागायच्या ऐवजी काही काम आहे का असे विचारायला लागले. आधी मी भिकारीण म्हणुन लोक मला कामे देत नव्हते. मग हळु हळु लोकांनी बाहेरची कामे द्यायला सुरवात केली. मला चांगली भिक मिळु लागली. उलट लोक माझी वाट बघु लागले. मला भिकेबरोबर लोकांच्या घरातील जुने पुराणे कपडे पण मिळु लागले. मला ईतर भिकाऱ्यांपेक्षा खुपच चांगले पैसे मिळु लागले. या वेळी मला तुमची खूप आठवण यायची पण तुम्ही जागा सोडुन दुसरीकडे गेला होतात!' ती आई मला सांगत हेती आणि मी ते भारावुन ऐकत होतो.

'थोडे पैसे साठल्यावर आम्ही भिकाऱ्याचा धंदा बंद केला आणि हे दुकान टाकले.' त्या आईने बोलायला सुरवात केली. 'कोणी भिकारी भिक मागताना दिसला की आम्ही त्याला काम देऊ लागलो. तो पलीकडचा पंक्चरवाला भिकारीच होता. आम्ही त्याला

दुकान काढून दिले. या टपरीतील पाच सहा दुकाने तरी भिकाऱ्यांचीच आहेत. आता या भागात तुम्हाला भिकारी औषधाला सुद्धा सापडणार नाहीत.'

तेवढ्यात तेथे एक रिक्षा आली आणि त्यातून स्कूल युनिफॉर्म घातलेली दोन मुले उतरली.

'ही माझी नातवंडे. इंग्लीश मिडियम स्कूलमध्ये जातात. माझ्या मुलीचे लग्न करून दिले. चांगला जावई मिळाला. तो प्लंबर आहे. चांगले पैसे कमावतो' त्या आजीबाई सांगत होत्या.

भिकाऱ्याची मुले इंग्लीश मिडियम स्कूलमध्ये? ऐकावे ते नवलच.

तेवढ्यात एक धट्टाकट्टा तरूण त्या दुकानात शिरला.

'याला तुम्ही ओळखले का?' त्या आजीबाई म्हणाल्या. 'हाच तर लहानपणी माझ्या कडेवर असायचा. त्याने इंजिनिअरिंगचा डिप्लोमा केला आहे. एका कारखान्यात चांगली नोकरी मिळाली आहे. पुढे पण काहीतरी शिकतो आहे.'

'होय! मी पार्ट टाईम बीई करतो आहे. पुढे एमबीए करायचा पण विचार आहे!' त्याने उत्तर दिले.

म्हणजे त्या भिकारणीच्या कडेवर बसणारा तीन वर्षांचा शेंबडा आणि कळकट्ट कपडे घालणारा मुलगा चक्क बीई आणि एमबीए होणार? मला तर आश्चर्याचे धक्क्यांवर धक्के बसत होते.

‘ काका! तुमच्यामूळे हे घडले!’ ती बाई डोळयात पाणी आणून सांगत होती.

‘छे! छे! माझ्यामूळे कसले? हे सगळे आमच्या सौभाग्यवतींचे डोके!’ मी म्हणालो.

‘ काका मग एकदा काकुंना घेऊन या! आम्हाला त्यांची ओटी भरायची आहे!’ दोघीही म्हणाल्या.

कोण्या एकेकाळी आमच्या हातून एक छोटेसे सत्कृत्य घडून गेले होते. आम्ही पण ते विसरून गेलो होतो. त्याला एवढी रसाळ आणि गोमटी फळे लागतील असे वाटले नव्हते. ‘आम्हाला काकुंची ओटी भरायची आहे!’ या त्यांच्या वाक्यानेच मला भरून पावल्यासारखे वाटत होते.

तुम्हाला असा अनुभव कधी आला आहे?

## बस ड्रायव्हर

नागेश एक बस ड्रायव्हर होता. तो रोज सकाळी बस डेपोमध्ये जाऊन बस सुरू करून रूटवर आणत असे. शहारातल्या 56 नंबरच्या रूटवर त्याची बस चालत असे. तो बस ड्रायव्हर कम कंडक्टर होता. बसमध्ये येणाऱ्या पॅसेन्जर्सकडून पैसे घेऊन तिकीट देण्याचे काम पण त्यालाच करावे लागे. त्या शहरात तशीच पद्धत होती आणि त्याबद्दल नागेशची कोणत्याही प्रकारची तक्रार नव्हती. तो अनेक वर्षे त्या रूटवर बस चालवत होता. त्यामुळे अनेक प्रवासी त्याला ओळखत होते. बहुतेक प्रवासी त्याला सुट्टे पैसे देऊन तिकीट घेत असत. 56 नंबरचा रूट तसा बिझी असल्यामुळे दिवसभरात अनेक पॅसेन्जर्स त्याच्या बसमध्ये चढत असत व उतरत असत. असे असुनही त्याच्या बसमध्ये 'फुकटातला' किंवा बिना तिकीटवाला पॅसेन्जर क्वचितच असे व याचा नागेशला अभिमान पण वाटे.

नागेशची प्रकृती तशी किरकोळ होती. त्याचे शरीर सडपातळ होते. त्याचे वजन 50 किलोपेक्षाही कमीच होते. बस चालवताना तो पोक काढून बसे. नवीन प्रवाशाला तर तो आजारी असवा असेच वाटे. पण नागेशने कधी याची फारशी फिकीर केली नाही.

पण एकदिवशी मात्र आक्रित घडले. नागेशच्या बसमध्ये एक नवीन पॅसेन्जर चढला. तो ताडामाडासारखा चांगला उंच होता. कमीत कमी सहा ते सव्वासहा फूट तरी उंच असावा. शरीर चांगले पिळदार व कमावलेले होते. छाती चांगली तगडी होती. त्याला पहाताच तो एखादा पैलवान किंवा चांगला बॉक्सर असावा असे वाटे. 'या गणपतला बसचे

तिकीट लागत नाय!' असे म्हणुन तो खुशाल बसमध्ये बिनातिकीट जाऊन बसला. नागेशच्या मनात त्याला हडसुन खडसुन तिकीटाबद्दल विचारावे असे वाटले. पण त्याची एकुण शरीरयष्टी बघून नागेशने आपला विचार बदलला. कारण त्याने जर दोन तडाखे हाणले तर आपला काही निभाव लागणार नाही याची नागेशला खात्रीच होती.

पण आता हा प्रकार रोजच व्हायला लागला. रोजच तो गणपत नावाचा आडदांड पैलवानासारखा असलेला माणूस बस मध्ये येऊन 'या गणपतला बसचे तिकीट लागत नाय.' असे म्हणुन फुकटात प्रवास करायला लागला. ही गोष्ट काही केल्या नागेशला हजम होईना. इतर प्रवासी प्रामाणीकपणे पैसे देऊन व तिकीट घेऊन प्रवास करत असतातना हा कोण फुकटात प्रवास करणारा टिकोजीराव लागुन गेला असे नागेशला वाटू लागले. काही महिने असेच गेले पण नागेशला रात्रीची झोप येईनाशी झाली. त्या गणपतचा नक्षा एकदा तरी उतरावयालाच हवा असे त्याला वाटू लागले. पण हे करण्यापुर्वी आपली शरिरप्रकृती सुधारणे आवश्यक आहे असे नागेशला वाटले. त्याने ताबडतोब जिम जॉईन केले. व्यायामाला, ज्युडो, कराटे शिकायला सुरवात केली. यासाठी त्याचे बरेच पैसे खर्च होऊ लागले. वेळपण बराच जाऊ लागला. पण नागेशने याकडे लक्ष दिले नाही. काही दिवसात नागेशची प्रकृती सुधारू लागली. त्याचे वजन वाढले, शरीर थोडेसे पिळदार दिसु लागले, अंगात ताकद आल्यासारखे वाटू लागले.

अंगात पुरेशी ताकद आली आहे. गणपतने दोन हाणल्या तर आपण एक तरी हाणू शकतो याची नागेशला खात्री पटली तेव्हा नागेशने गणपतला खडसवायचे ठरवले. दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे गणपत बसमध्ये चढला आणि 'गणपतला बसचे तिकीट लागत नाय!' असे म्हणुन मागे जायला सुरवात केली तोच नागेशने त्याला आडवले. 'बसचे तिकीट लागत नाय म्हणजे? कारण काय?' नागेशने काहीशा रागानेच विचारले.

'कारण माझ्याकडे बसचा पास आहे! हा बघा!' असे म्हणत गणपतने खिशातून बसचा पास काढून दाखवला.

बिचारा नागेश गणपतचे उत्तर ऐकून सर्दच झाला.

तात्पर्य

आयुष्यातील अनेक समस्या किंवा या समस्यांचे मूळ कारण अगदी साधे, सोपे, सरळ किंवा क्षुल्लक असते. पण आपणच या समस्या, उगीचच किंवा कारण नसताना, गंभीर-क्लिष्ट-गुंतागुंतीच्या किंवा कॉम्प्लिकेटेड बनवत असतो. त्यामुळे या समस्यांचे सोल्युशन सुद्धा असेच क्लिष्ट, कठीण किंवा कॉम्प्लिकेटेड असेल असे वाटून त्यासाठी उगीचच पैसा, वेळ व एनर्जी वाया घालवत असतो. त्यासाठी प्रत्येक समस्येचे मूळ कारण काय आहे ते शोधून काढण्याचा आधी प्रयत्न करा व मग तुमची स्ट्रॅटेजी ठरवा. तुमच्या लक्षात येईल की अनेक समस्यांची सोल्युशन्स ही सुध्दा साधी-सरळ-सोपी व अनकॉम्प्लिकेटेड असतात. (नागेशने जर आधीच गणपतला 'बसचा पास आहे का' असे विचारले असते तर त्याचा पुढचा जिमचा वेळ, मेहेनत व खर्च वाचला असता. अर्थात याचा नागेशला फायदा झाला. त्याची तब्येत सुधारली. पण प्रत्येकवेळी असा फायदा होईलच असे नव्हे.)

अर्थात काय करायचे हे तुमचे तुम्ही ठरवायचे नाही का?

(व्हॉट्सअपच्या सौजन्याने)

## -23-

## चर्चचे छप्पर

फादर सॅम्युअल बिकेटनी वयाची नव्वदी पार केली आणि आता आपण फार दिवस या जगाचे सोबती नाही याची त्यांना प्रकर्षाने जाणीव होऊ लागली. कारण शरीर आता थकले होते. हात पाय चालेनासे झाले होते. दृष्टी अधू झाली होती. ऐकायला पण कमी येऊ लागले होते. काठीचा आधार घेतल्याशीवाय चालणे मुष्कील होऊ लागले होते.

गेली 30 वर्षे ते लंडनमधील मेथॉडिस्ट प्रॉटेस्टन्ट चर्चचे प्रमुख होते. त्यांचे चर्च मेथॉडिस्ट चर्च या नावाने ओळखले जात होते. तसे त्यांचे चर्च काही फारसे प्रसिद्ध नव्हते. लंडनमध्ये असलेल्या 400 चर्चेसपैकी त्यांचे एक चर्च होते. हे चर्च तसे मध्यम आकाराचे व लंडनच्या एका कोपऱ्यात उभारलेले चर्च होते. चर्चच्या आजुबाजुची वस्ती ही प्रामुख्याने गरीब व मध्यमवर्गीय लोकांची होती. त्यामुळे चर्चमध्ये येणाऱ्या लोकांमध्ये याच लोकांचा भरणा जास्त असायचा. चर्चची आर्थिक परिस्थिती तशी बेताचीच होती. चर्चला नेहमीच पैशांची वानवा असायची.

पण असे असुनही फादर सॅम्युअल बिकेट यांनी चर्चची भरपूर प्रगती केली व चर्च चांगले नावारुपाला आणले. चर्चच्या माध्यमातून त्यांनी अनेक लोकोपयोगी व समाजास उपयोगी पडतील अशी कामे सुरु केली. त्यामुळे फादरची लोकप्रीयता वाढली व लोक

त्यांचा आदर करू लागले. खरे म्हणजे फादर सॅम्युअल बिकेट यांनी कित्येक वर्षांपूर्वीच आपल्या प्रमुखपदाचा राजीनामा चर्चच्या मॅनेजिंग कमिटीकडे सोपवला होता. पण त्यांची लोकप्रीयता लक्षात घेता कमिटीने त्यांचा राजीनामा मंजुर न करता त्यांनी आजन्म चर्चच्या प्रमुखपदी रहावे अशी विनंती केली. फादर जेव्हा चर्चमध्ये रहायला आले तेव्हा त्यांची पत्नी त्यांचेबरोबर होती. त्यांना मुलबाळ नसल्यामुळे ते दोघेही चर्चमध्ये रहायला आले होते. दहा वर्षांपूर्वी फादर सॅम्युअल बिकेटच्या पत्निचे निधन झाले. तेव्हापासुन फादर चर्चजवळच्या एका बंगल्यात एकटेच रहात होते. त्यांची सेवा करण्यासाठी त्यांचा एक असिस्टंट सतत त्यांच्या सोबत असे.

मेथॉडिस्ट चर्च हे बरेच जुने होते. त्या चर्चच्या इमारतीला 104 वर्षे होऊन गेली होती. चर्चची इमारत तशी भरभक्कम होती पण चर्चचे छप्पर मात्र बरेच जुने झाले होते. त्याची कौले उडाली होती. छताला भोके पडली होती व त्यातून पाणी गळु लागले होते. लवकर चर्चचे छप्पर रिपेअर केले नाही तर ते खाली पडते की काय अशी भिती निर्माण झाली होती. फादर सॅम्युअल बिकेट यांनी या दिशेने प्रयत्न पण करून बघीतले. लंडनमधल्या एका नावाजलेल्या आर्किटेक्ट फर्मला बोलावले होते. पण चर्चच्या छपराच्या रिपेरिंगसाठी 1 लाख पौंड खर्च येईल असे सांगीतले होते. चर्चकडे तर एव्हडे पैसे नव्हते. चर्चच्या काही भक्तांनी हे काम विनामुल्य करून देण्याची तयारी दाखवली होती पण हे फादरच्या तत्वात बसत नव्हते. चर्चसाठी काहीही फुकट घ्यायचे नाही हे त्यांचे तत्व होते. छताच्या रिपेरींगसाठी लोकांकडून डोनेशन्स गोळा करण्याचा प्रयत्न फादरनी करून पाहीला होता. पण फक्त 10000 पौंड एव्हडेच डोनेशन गोळा होऊ शकले. त्यामुळे चर्चच्या

छपराच्या रिपेरिंगचा प्रश्न तसाच लोंबकाळत राहीला व आपल्या हयातीत तरी हे छप्पर रिपेअर होणार नाही याची फादरना खात्री वाटू लागली होती.

एक दिवशी फादरना एका जपानी कंपनीचे पत्र आले. त्या कंपनीचे प्रमुख फादरना भेटू इच्छीत होते व त्यासाठी त्यांची अपॉइंटमेन्ट मागत होते. ते पत्र बघुन फादरना फारच आश्चर्य वाटले. कारंण ते कोणत्याच जपानी कंपनीला ओळखत नव्हते व गेली कित्येक वर्षे त्यांचा जपानशी काही संबंध पण आला नव्हता. त्यांचा जपानशी संबंध आला होता तो दुसऱ्या महायुद्धाच्या काळात. पण त्याला तर अनेक वर्षे होऊन गेली.

फादर सॅम्युअल बिकेट पूर्वी ब्रिटिश आर्मीत होते. आपल्या कतृत्वावर ते मेजर जनरल या पोस्टपर्यंत पोचले होते. दुसऱ्या महायुद्धात त्यांनी प्रत्यक्ष भाग घेतला होता व पूर्वेकडील ब्रम्हदेशातील आघाडीवर ते लढले होते. हा भाग जपानच्या ताब्यात असल्याने त्यांची लढाई ही मुख्यत्वेकरून जपानी सैनीकांबरोबर होती. पण ते जवळ जवळ लढाई हारत चालले होते. आधी त्यांच्या तुकडीत 500 सैनीक होते. पण ब्रम्हदेशातील जंगली व दलदलीचा भागामूळे अनेक सैनीक आजारी पडून मरण पावले. जे काही सैन्य उरले ते एकीकडे जपानी सैन्य तर दुसरीकडे भारतीयांनी उभारलेल्या आझाद हिन्द फौजेच्या कचाट्यात सापडले. शेवटी फक्त मेजर जनरल सॅम्युअल बिकेट व 15 सैनीक उरले. त्यांना जपानी सैन्याने पकडले व मंडालेजवळच्या एका छळ छावणीत पाठवुन दिले.

मंडालेजवळची छळछावणी खरोखरच भयानक अशीच होता. एका नदीच्या काठी, जंगल व दलदल असलेल्या प्रदेशात ही छावणी उभारली होती. 10 फूट बाय 10 फूट

आकाराच्या छोट्या खोलीत 20 ते 25 माणसे कोंबलेली असत. सतत नदीचा घाण वास येत असे. डास, चिलटे, माश्या व पिसवांचे आगर होते. कमालीची अस्वच्छता होती. खायला प्यायला धड नसायचे. तेथे रोगराई पसरली होती पण औषध पाण्याची व्यवस्था नव्हती. मेजर जनरल सॅम्युअल बिकेट व त्यांच्या 15 सैनीकांना पण अशाच एका छोट्या खोलीत कोंबले होते. तेथे 1000 च्या वर कैदी असल्याची व त्यांचेवर पहारा देण्यासाठी 200 जपानी सैनीकांची तुकडी असल्याचे जनरल साहेबांना कळले होते. छावणीत एक जपानी डॉक्टर होता पण तो फक्त जपानी सैन्यापुरताच होता. रोगराईमुळे अनेकांचा मृत्यु झाला होता. कोणाचा मृत्यु झाला तर निर्दयपणे त्याचे प्रेत नदीत फेकण्यात येत असे. मग त्या नदीतील भुकेलेल्या मगरी व सुसरी त्या प्रेतावर तुटुन पडत असत. ते दृष्य फारच भयानक असे. आपला या ठिकाणी फार दिवस टिकाव लागणार नाही व लवकरच आपल्याला पण मृत्युच्या मार्गाने जावे लागणार अशी मेजर जनरल सॅम्युअल बिकेट यांची खात्रीच पटली होती.

पण एक जपानी सोल्जर त्यांच्या मदतीला धाऊन आला. त्याचे नाव होते ओशो टनाका. तो मेजर जनरल साहेबांना चोरून चोरून मदत करू लागला, कारण त्याच्यात अजून माणुसकी शिल्लक होती. तो चोरून चोरून मेजर जनरल साहेबांना चांगले, ताजे व सकस अन्न आणून देत असे. पिण्यासाठी ताजे व स्वच्छ पाणी आणुन देत असे. कोणी आजारी असल्यास चोरुन औषधे आणुन देत असे. ताजी फळे आणुन देत असे. त्याच्यामुळे मेजर जनरल सॅम्युअल बिकेट व त्यांच्या सोल्जर्सचे जगणे थोडेसे सुसह्य होत असे. पण असे किती दिवस चालणार याची काहीच कल्पना येत नव्हती.

अचानक युद्धाचे पारडे फिरले. अमेरिकेने जपानवर दोन अणुबॉम्ब टाकले. हिरोशिमा व नागासाकी ही जपानमधील दोन प्रमुख औद्योगीक शहरे बेचिराख केली. लगेच जपानने शरणागती पत्करली व दुसरे महायुद्ध संपुष्टात आले. जपानने शरणागती पत्करल्याची वार्ता हा हा म्हणता मेजर जनरल सॅम्युअल बिकेट यांच्या छळछावणीपर्यंत पोचली. त्यानंतर काही तासातच अमेरिकन सैन्याने त्या छावणीवर कब्जा केला, सर्व कैद्यांना मोकळे करण्यात आले. सर्व जपानी सैनीकांची धरपकड करण्यात आली व त्यांना 'युद्ध कैदी' म्हणुन घोषीत करण्यात आले. मेजर जनरल सॅम्युअल बिकेट व त्यांचे 15 सोल्जर्स सुखरुप इंग्लंडला परत आले. आपण सुखरुप परत आलो यावर अजुनही मेजर जनरल साहेबांचा विश्वास बसत नव्हता. ओशो टनाका नावाच्या एका जपानी सोल्जरने केलेल्या मदतीमुळेच आपण जिवंत राहु शकलो हे मेजर जनरल विसरू शकले नाहीत.

मेजर जनरल सॅम्युअल बिकेट ब्रिटनला परतल्यावर आपल्या ड्युटीवर रुजू झाले. त्यांना अचानक ब्रिटनच्या प्राईम मिनिस्टरकडून बोलावणे आले त्यामुळे त्यांना आश्चर्य वाटले. त्यावेळी लॉर्ड ऍटली हे ब्रिटनचे पंतप्रधान होते व मेजर जनरल त्यांना थोडेसे ओळखत होते पण त्यांचा प्रत्यक्ष संबंध कधीच आला नव्हता. बोलावल्याप्रमाणे मेजर जनरल 10 डाउनींग स्ट्रिट या पंतप्रधानांच्या निवासस्थानी लॉर्ड ऍटली यांना भेटायला गेले.

'जे जपानी सैनीक युद्धात पकडले गेले आहेत त्यांच्यावर खटले भरून त्यांना योग्य ती शिक्षा करण्यासाठी अमेरिकन सरकारने एक समीती बनवली आहे. जनरल आयझेनओव्हर (जे पुढे अमेरिकेचे प्रेसिडेन्ट झाले) हे या समीतिचे अध्यक्ष आहेत व या

समीतीने टोकियोमध्ये काम करायला सुरवात पण केली आहे' लॉर्ड ऍटली सांगत होते. 'पण या समीतीत सर्व अमेरिकन आहेत. त्यामुळे अमेरिकेवर टिका होऊ लागली आहे. दोस्त राष्ट्रांचे पण काही प्रतिनिधी असावेत असे अमेरिकन सरकारला वाटू लागले आहे. यासाठी काल रात्री अमेरिकेचे प्रेसिडेन्ट रुझवेल्ट यांचा फोन आला व ब्रिटनचा प्रतिनिधी पाठवायची विनंती केली. मी ब्रिटनचा प्रतिनिधी म्हणुन तुमची निवड करण्याचा विचार करतो आहे. कारण तुम्हाला पुर्वेकडील क्षेत्रातील युद्धाचा व जपानी आर्मीचा चांगला अनुभव आहे. तुम्ही हे पद स्विकाराल ना?'

'मी हे पद स्विकारीन पण माझी एक अट आहे!' मेजर जनरल सॅम्युअल बिकेट म्हणाले.

'ती कोणती?' लॉर्ड ऍटलींनी विचारले

'जर एखाद्या जपानी सैनीकावर अन्याय होतो आहे, त्याने केलेल्या गुन्ह्यांपेक्षा त्याला देण्यात येणारी शिक्षा जास्त कडक आहे असे मला वाटले तर मी जरूर आवाज उठवीन. जर माझ्याकडे दुर्लक्ष करण्यात येते आहे असे मला वाटले तर मी ताबडतोब राजीनामा देऊन इंग्लंडला परत येईन. हे जर तुम्हाला मान्य असेल तरच मी हे पद स्विकारेन' मेजर जनरल सॅम्युअल बिकेट म्हणाले.

'ठीक आहे. मला तुमची अट मान्य आहे. पण असा काही निर्णय घेण्यापुर्वी तुम्ही माझ्याशी फोनवर बोला. तसेच दर पंधरा दिवसांनी या कमिटिचे कामकाज कसे चालले आहे याचा एक रिपोर्ट पाठवत चला.' लॉर्ड ऍटली म्हणाले.

त्याप्रमाणे मेजर जनरल सॅम्युअल बिकेट टोकियोला आले व अमेरिकन समितीबरोबर आपले कामकाज सुरू केले. पण थोड्याच दिवसांत त्यांच्या लक्षात आले की ही अमेरिकन कमिटी हे एक थोतांड आहे. जपानी सैनीकांवर भरलेले खटले हा एक दिखावा आहे. समितीचा मुख्य उद्देश जास्तीत जास्त जपानी सैनिकांना कठोरात कठोर म्हणजे मृत्युदंडाची शिक्षा देणे हाच आहे. फक्त त्या जपानी सैनिकाला फासावर लटकावयाचे का गोळया घालुन ठार मारायचे एव्हडेच समितीने ठरवायचे. अनेक जपानी सैनिकांना किरकोळ गुन्ह्यांसाठी फासावर लटकवले गेलेले मेजर जनरल पहात होते. हे काही केल्या त्यांच्या पचनी पडत नव्हते. त्यांनी जोरदार विरोध करण्याचा प्रयत्न केला पण त्यांचे काही चालले नाही. त्यांचा आवाज दाबुन टाकण्यात आला. आपल्याला येथे कवडीचीही किंमत नाही हे मेजर जनरल सॅम्युअल बिकेटच्या लक्षात यायला वेळ लागला नाही.

जेव्हा ओशो टनाकाची केस समोर आली तेव्हा तर कहरच झाला. त्याला फाशीची शिक्षा देण्याचे जवळ जवळ नक्की झाले. मेजर जनरल ओशो टनाकाला विसरले नव्हते. त्याच्यामुळेच आपण सुखरून ब्रिटनला परत जाऊ शकलो हे त्यांच्या पक्के लक्षात होते. ओशो टनाकाच्या फाशीला त्यांनी तिव्र विरोध केला. पण त्यांचे कोणी ऐकत नाही हे बघीतल्यावर त्यांच्या संतापाचा उद्रेकच झाला. त्यांनी तिथल्या तिथे समितीचा राजीनामा दिला. त्याच दिवशी रात्री ब्रिटनचे पंतप्रधान लॉर्ड ऍटली यांना फोन करून सर्व परिस्थिती सांगीतली, ओशो टनाकाची केस पण सांगीतली. लगेचचे विमान पकडून ब्रिटनकडे प्रयाण केले.

त्यानंतर मेजर जनरल सॅम्युअल बिकेट यांनी लगेचच निवृत्ती पत्करली. मुळात धार्मिक वृत्तीचे असल्यामुळे त्यांनी धर्मकार्याला वाहून घेतले. ते मेथॉडिस्ट चर्चचे प्रमुख

बनले. जागतीक राजकारणापासुन स्वतःला पुर्णपणे अलीप्त ठेवले. त्यांनी जगात काय चालले आहे याची अजीबात फिकीर केली नाही. त्यांना निवृत्ती वेतन चालु झाले त्यातील निम्मे वेतन ते चर्चला देऊ लागले. जपानशी असलेला संबंध तर केव्हाच तुटला होता. आता अगदी अचानक एका जपानी कंपनीचा प्रमुख आपली भेट मागतो आहे याचे कारण काही त्यांच्या लक्षात येत नव्हते. पण तरी सुद्धा त्यांनी एखाद्या रविवारी भेटायला येऊ शकता असा निरोप पाठवला.

एका रवीवारी सकाळी 6 चकचकीत काळया रंगाच्या जपानी मोटारींचा ताफा मेथॉडिस्ट चर्चसमोर येऊन उभा राहीला. त्यातील मधल्या आलिशान गाडीतून एक जपानी माणूस खाली उतरला. त्याचे वय 60 च्या आसपास असावे. त्याचे केस पांढरे झाले होते. त्याने काळया रंगाचा सुट घातला होता. इतर गाड्यांमधून अजुन काही जपानी माणसे उतरली. त्यांनी पण काळया रंगाचे सुट घातले होते. ती सर्व जत्रा फादर सॅम्युअल बिकेटच्या बंगलीसमोर येऊन थांबली. त्या माणसाने आपले बुट बाहेर काढले व तो आत आला. फादर सॅम्युअल बिकेटच्या समोर तो गुढगे टेकून जमिनीवर बसला व फादरचा हात हातात घेऊन ढसा ढसा रडू लागला. तो जपानी भाषेत काहीतरी बोलत होता पण त्याचे बोलणे फादरला समजत नव्हते. तेवढ्यात एक जपानी दुभाष्या समोर आला व त्या जपानी माणसाच्या बोलण्याचे इंग्लीशमध्ये रुपांतर करून सांगू लागला.

'फादर! मी ओशो टनाका!' तो जपानी माणूस सांगत होता. 'तुमच्यामुळे केवळ माझेच नाही तर हजारो जपानी सैनीकांचे प्राण वाचले. तुमच्या राजिनाम्याने फार खळबळ उडाली. जनरल आयझेनओव्हरची ताबडतोब उचलबांगडी करण्यात आली. त्यांच्या जागी

नवीन जनरल आले. त्यांनी सौम्य धोरण स्विकारले. कमीत कमी जपानी सैनिकांना मृत्युदंड देण्याचे धोरण स्विकारले. माझी फाशी रद्द झाली व मला तीन वर्षे साध्या तुरुंगवासाची शिक्षा झाली!'

फादर सॅम्युअल बिकेट हे सर्व ऐकत होते. त्यांचा स्वतःच्या कानांवर विश्वास बसत नव्हता.

'तुरुंगातून सुटल्यावर मी एक कंपनी काढली' ओशो टनाका सांगत होता. 'जपानी आर्मीत मी सिग्नल्स कोअरमध्ये होतो. इलेक्ट्रॉनिक्सची थोडीफार ओळख होती. मी इलेक्ट्रॉनिक वस्तुंचे उत्पादन करायला सुरवात केली. माझ्या सुदैवाने माझा धंदा छान चालु आहे. आज 'टनाका कॉर्पोरेशन' ही कंपनी इलेक्ट्रॉनिक वस्तुंचे उत्पादन करणारी जगातील प्रमुख कंपनी आहे. मी या कंपनीचा संस्थापक व मॅनेजिंग डायरेक्टर आहे. माझ्या कंपनीत अनेक जपानी सैनीक काम करतात.'

ऐकावे ते नवलच, फादरना वाटले. पण ओशो टनाकाचे काय काम असावे? फादरना प्रश्न पडला.

'फादर! मी तुरुंगातून सुटल्यापासुन तुम्हाला शोधायचा प्रयत्न करीत होतो. तुम्ही या चर्चचे प्रमुख आहात हे कळले. ही माझ्यातर्फे तुम्हाला छोटिशी भेट.' असे म्हणत ओशो टनाकाने फादरच्या हातात एक पाकीट ठेवले.

‘हे काय आहे?’ फादरने विचारले.

‘फादर! तुमच्या चर्चचे छप्पर आता जुने झाले आहे. ते बदलले पाहीजे. यासाठी 1 लाख पौंडाची गरज आहे याची मला जाणीव आहे. या पाकीटात 2 लाख पौंडाचा चर्चच्या नावाने काढलेला चेक आहे. तो आपण स्विकारावात. हे माझ्या कंपनीकडून तुमच्या चर्चला दिलेले डोनेशन आहे. खरे म्हणजे ज्या जपानी सैनिकांचे प्राण तुमच्यामुळे वाचले त्या सर्वांतर्फे हे डोनेशन आहे. आता या पुढे दर वर्षी टनाका कॉर्पोरेशनकडून मेथॉडिस्ट चर्चला 25 हजार पौंडाचा डोनेशनचा चेक न चुकता येत राहील.’

त्यानंतर दोनच दिवसांनी फादर सॅम्युअल बिकेट यांचे निधन झाले. निधन समयी टनाका कॉर्पोरेशनचा 2 लाख पौंडाचा चेक त्यांच्या हातात होता व त्यांच्या चेहेऱ्यावर असीम समाधान पसरले होते.

मेथॉडिस्ट चर्चला तर नवे कोरे छप्पर मिळालेच पण अजुनही टनाका कॉर्पोरेशनकडून 25 हजार पौंडाचा डोनेशनचा चेक दर वर्षी न चुकता मेथॉडिस्ट चर्चला येत असतो.

(जेफ्री आर्चर यांच्या एका गाजलेल्या इंग्लीश कथेचे स्वैर मराठी रुपांतर)

## पर्चेस मॅनेजर

( एका सत्य घटनेवर आधारीत)

नितीन पाटणकर एम.बी.ए झाला व लगेचच त्याला पुण्याच्या 'कार्लेकर इंजिनीअरींग' मध्ये 'पर्चेस ऑफीसर' म्हणुन नोकरी पण मिळाली. कंपनी तशी छोटी होती. पगार पण त्यामानाने थोडा कमी होता. पण 'कार्लेकर इंजिनीअरींग' ही 'ग्रोइंग' कंपनी होती. या कंपनीत आपल्याला भरपूर स्कोप मिळेल असे नितीनला वाटले होते. अर्थात नितीनचा हा अंदाज काही फारसा चुकीचा नव्हता.

नितीन एका मध्यमवर्गीय कुटुंबातून आलेला! त्याचे आई वडील दोघेही सरकारी कर्मचारी होते. नितीन त्यांचा एकुलता एक मुलगा! त्याला एक धाकटी बहीण आहे. नितीन पहिल्यापासुन हुशारच होता. शाळेत त्याचा नंबर नेहमी पहिल्या पाचात असे. पुढे तो इंजिनीअरींगला गेला. इंजिनीअर झाल्यावर पुढे शिकायचे म्हणुन त्याने एम. बी.ए. केले व कार्लेकर इंजिनीअरींगमध्ये लागला. त्याची मटेरिअल्स विभागात नेमणूक करण्यात आली. कंपनीच्या दृष्टीने हे एक महत्वाचे डिपार्टमेन्ट होते. कारण कंपनीला लागणारे रॉ मटेरीयल तसेच फिनीश्ड व सेमी फिनिश्ड कॉम्पोनन्टस 'प्रोक्युअर' करण्याचे महत्वाचे काम हे डिपार्टमेन्ट करायचे. या ठिकाणी नितीनचा कंपनीचे सप्लायर्स, व्हेन्डॉर्स, कॉन्ट्रॅक्टर्स, सब कॉन्ट्रॅक्टर्स यांचे बरोबर संबंध येऊ लागला. नितीन मुळात हुशार असल्याने त्याने तीन

महीन्यातच आपल्या कामात प्रावीण्य मिळवले. नितीनच्या या ना त्या कारणाने कंपनीचे चेअरमन व मॅनेजींग डायरेक्टर कार्लेकर साहेब यांचेबरोब गाठी भेटी होऊ लागल्या. कार्लेकर साहेबांचे नितीनवर खास लक्ष होते. कारण तो कंपनीतला पहीला एम.बी.ए. होता. कार्लेकरांना नितीनबरोबर चर्चा करणे फार आवडायचे. कारण कार्लेकर वयाच्या पंन्नाशीत होते तर नितीन ‘फ्रेश यंग ब्लड’ होता. त्यांना नितीनचे विचार ऐकणे आवडायचे.

नितीनला नोकरीला लागुन तिन महीने झाले होते. कंपनीचे एक सप्लायर नितीनला भेटले व सांगु लागले, ‘ माझा माल कंपनीने रिजेक्ट केला आहे. कारण अगदी किरकोळ आहे. आपण जर मदत केलीत तर माझे मटेरीअल पास होईल.’ अर्थात अशा प्रकारे मदत करणे हे कंपनीच्या निती-नियमांच्या बाहेर आहे याची नितीनला कल्पना होती. त्यामुळे नितीनने त्या सप्लायरला टाळले.

दोन दिवसांनी नितीनला एका फंक्शनचे आमंत्रण आले. पुण्यातील एका प्रसीद्ध फाइव्ह स्टार हॉटेलमध्ये ते फंक्शन होते. नितीनला आग्रहाचे बोलावणे होते. नितीन कधी फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये गेला नव्हता. त्याला अशा प्रकारच्या हॉटेलविषयी फार कुतुहल होते. तेथे त्याला ज्यांचा माल रिजेक्ट झाला होता ते सप्लायर भेटले. खरे म्हणजे हे फंक्शन त्यांनीच ऍरेन्ज केले होते. फंक्शनला फार माणसे नव्हती, दहा बारा माणसेच असतील. त्या सप्लायरने नितीनचा खास पाहुणचार केला. त्याला उंची उंची डिशेस खायला घातल्या. स्कॉच व्हिस्की ऑफर केली. निघताना तो सप्लायर नितीनला ‘जरा माझ्या

रिजेक्ट झालेल्या मटेरीयलकडे बघा!' असे विनवणीच्या सुरात व अत्यंत नम्रपणे म्हणाला. दुसऱ्या दिवशी त्या सप्लायरचे मटेरियल पास झाले.

त्यानंतर नितीनच्या अशाच दोन तीन फाइव्ह स्टार पार्ट्या झाल्या. ज्या सप्लायर्सनी या पार्ट्या ॲरेंज केल्या होत्या त्यांची कामे भराभर झाली.

तीन महीने झाले व एके दिवशी कार्लेकर साहेबांनी नितीनला बोलावले व म्हणाले, 'नितीन! मी तुझ्या कामावर खुश आहे. मी तुला प्रमोशन द्यायचे ठरवले आहे. आजपासुन तु 'सिनीयर पर्चेस ऑफीसर' झाला आहेस. तुझ्या पगारात पण चांगली वाढ झाली आहे!' नितीन त्यामुळे खुश झाला.

त्यानंतर एक वर्षाच्या आतच नितीन असिस्टंट पर्चेस मॅनेजर, त्यानंतर डेप्युटी पर्चेस मॅनेजर, तर तीन वर्षांच्या आतच तो 'पर्चेस मॅनेजर' बनला. वयाच्या तिशीच्या आतच नितीनने ही प्रगती केली.

पण प्रमोशन्स मिळत असताना नितीनच्या फाइव्ह स्टार हॉटेल किंवा पुण्यातल्या मोठ्या हॉटेलमधील पार्टीमध्ये वाढ होत होती. आठवड्यातुन तीन चारवेळा तरी अशा पार्ट्या असायच्याच. नितीनला आता जॉनी वॉकर, रेड लेबल किंवा शिवाज रिगल शिवाय दुसरी कोठली व्हिस्की आवडेनाशी झाली होती. यामध्ये आता अजून एका गोष्टीची भर पडली. त्याला अनेक 'कॉस्टली गिफ्ट्स' मिळू लागल्या. या प्रेमाने दिलेल्या गिफ्ट्स होत्या.

त्याला नाही कसे म्हणायचे? यामध्ये इस्त्रीपासुन महागड्या टि. व्ही. सेटपर्यंतच्या गिफ्ट्स होत्या. नितीनचे घर अशा या ‘कॉस्टली गिफ्टस’ ने भरून गेले होते. जे सप्लायर अशा रितीने नितीनची ‘काळजी’ घेत त्यांची कामे भराभर होत असत. त्यांचा माल कधी रिजेक्ट होत नसे. त्यांची पेमेन्टस वेळेच्या आधीच निघत असत. त्यांची ‘ऑर्डर’ सतत वाढतच असे. जे सप्लायर्स नितीनची अशा प्रकारे काळजी घेत नसत त्यांच्या कामात अनेक अडथळे येत असत.

नितीनच्या राहणीमानात पण आता बराच फरक पडला होता. पूर्वी त्याचे कपडे अगदी साधे असायचे. आता त्याचे कपडे महाग, ब्रँडेड व पॉश असु लागले होते. आधी तो बसने कंपनीत यायचा. मग त्याच्याकडे बाईक आली व नंतर मारुती ऑल्टो आली. आता त्याने होन्डा सिव्हीक गाडी बुक केल्याची वंदता होती. आधी त्याच्या वडलांचा वन बिएचके फ्लॅट अगदी साधा होता. आता नितीनने तो रिनोव्हेट करून पॉश करून टाकला होता. इतकेच नव्हे तर बेडरूमला एसी सुद्धा बसवला होता. (सप्लायरची कृपा) आता त्याने पॉश लोकॅलिटीत दोन बिएचकेचा फ्लॅट बूक केला होता.

पर्चेस मॅनेजर झाल्यावर नितीनने सरळ ‘कट’ मागायला सुरवात केली. अर्थात नितीन हुशार होता. हे काम परस्पर न करता आपल्या डिपार्टमेन्टचा प्युन रामु व क्लार्क नंदन याच्यामार्फत करत होता. हे दोघे सप्लायर्सकडे नितीनच्या मागण्या मांडायचे काम करायचे. नितीनला जो ‘कट’ मिळायचा त्यातील कांही हिस्सा तो या दोघांना तसेच या

कामाशी संबंधीत असलेल्या इतर कर्मचाऱ्यांना पण द्यायचा. त्यामुळे ‘तेरी भी चूप. मेरी भी चूप’ या नियमाप्रमाणे हे काम बिनबोभाट चालायचे.

कार्लेकर इंजिनीअरींगचे आता मोठ्या प्रमाणावर एक्सपान्शन करण्यात येणार होते. कंपनीला आता त्यांचे प्रॉडक्शन दुप्पट कारायचे होते. त्या साठी फार मोठ्या प्रमाणावर रॉ मटेरीयलची जरूरी भासणार होती. यासाठी सप्लायरबरोबर ठरावीक मुदतीचे ‘रेट कॉन्ट्रॅक्ट’ करण्याची कल्पना कंपनीने राबवायचे ठरवले. त्यासाठी सर्व प्रमुख वर्तमानपत्रातुन जाहीरात देऊन कोटेशन्स मागवण्यात आली. या कोटेशन्सची ‘स्क्रुटीनी’ करून ‘शॉर्ट लिस्टेड पार्टीज’ ची लिस्ट बनवण्याचे महत्वाचे काम नितीनकडे आले. त्याने हे काम चोख केले व तीन पार्टीज शॉर्ट लिस्ट केल्या. त्यातील दोन पार्टीजचे रेट्स जरा जास्त होते, तसेच त्यांच्या ‘टर्म्स व कंडीशन्स’ कार्लेकर कंपनीला फारशा सुट करणाऱ्या नव्हत्या. तिसऱ्या पार्टीचे रेट बरेच कमी होते व त्यांच्या ‘टर्म्स व कंडीशन्स’ पण कंपनीला सुट करणाऱ्या होत्या. पण यात एक अडचण होती. यातील पहिल्या दोन सप्लायर्सनी आधीच नितीनला मॅनेज करायला सुरवात केली होती. फाइव्ह स्टार हॉटेलधे पार्टी देऊन झाल्या होत्या. कॉस्टली गिफ्टस नितीनच्या घरी पोचवण्यात आल्या होत्या. तसेच नितीनला हवा असलेला ‘कट’ देण्याची पण तयारी दाखवली होती. पण तिसरी पार्टी मात्र विचित्र निघाली. नितीनला भेटण्याचे साधे सौजन्य सुद्धा दाखवले नाही तर इतर गोष्टी दूरच. त्यामुळे नितीनचा ओढा पहिल्या दोन पार्टींकडेच होता. दोघांचेही कोटेशन्स मंजूर करून दोघांनाही बिझनेस द्यायचा नितीनचा प्लॅन होता. तिसऱ्या पार्टीचे कोटेशन त्याने गुंडाळूनच ठेवले होते.

अचानक कार्लेकर साहेबांचा फोन आला व त्यांनी नितीनला ताबडतोब भेटायला बोलावले. आज कार्लेकर साहेबांचा मुड कांही ठीक दिसत नव्हता. एरवी कार्लेकर साहेब नितीनला, 'तुला वेळ आहे का?' असे विचारत. नितीन कामात असेल तर, 'केव्हा फ्रि होणार आहेस?' असे विचारत व त्याप्रमाणे भेटीची वेळ ठरवत. पण आज मामला कुछ औरही था! त्यांच्या आवाजात एकप्रकारची हुकुमत होती. नितीन कार्लेकर साहेबांना भेटायला जाताना नेहमीच त्यांना 'इम्प्रेस' करण्यासाठी काहीतरी माल-मसाला बरोबर नेत असे. पण त्याला अशा प्रकारचा माल-मसाला गोळा करायला वेळ नव्हता. तरी पण कार्लेकर साहेबांना इम्प्रेस करायला उपयोगी पडतील असे दोन चार कागद त्याने घाईघाईने गोळा केले व साहेबांना भेटायला गेला.

नितीनने तोंड उघडण्याआधीच कार्लेकर साहेब म्हणाले, 'मी तुला चहा प्यायला बोलावले आहे. आधी चहा घेऊया!' नितीनला साहेबांचे बोलणे थोडे खटकले. चहा पिऊन झाल्यावर कार्लेकर साहेब म्हणाले, 'हे तु ऐकावेस असे मला वाटते!' असे म्हणुन त्यांनी टेबलावरचा टेप रेकॉर्डर सुरु केला.

टेप रेकॉर्डरमधून दोन माणसांचा आवाज ऐकु येत होता. त्यातील एक आवाज कार्लेकरांचा होता. दुसरे दोन आवाज अनोळखी होते.

'सर आमचे कोटेशन सर्वात कमी किंमतीचे आहे. आम्ही मालाची गॅरंटी पण दिली आहे. आम्ही कोणाला माल सप्लाय करतो याची लिस्ट पण दिलेली आहे. तुम्ही त्यांचेकडून आमची विश्वासार्हता तपासुन पाहु शकता. तसेच आमच्या टर्म्स व कंडीशन आपल्या कंपनीसाठी खूपच फेवरेबल आहेत!' एक माणूस सांगत होता.

'मग प्रॉब्लेम काय आहे?' कार्लेकर साहेबांनी विचारले

मध्ये थोडा पॉज होता मग दुसऱ्या माणसाचे काहीसे चाचरत बोलणे ऐकु येत होते, 'त्याचे काय आहे सर, गेली कित्येक वर्षे आम्ही या धंद्यात आहोत. आम्हाला प्रत्येक ठिकाणी काहीतरी 'कट' द्यावा लागतो. आम्ही 10 टक्यापर्यंत 'कट' देतो. पण तुमचे पर्चेस मॅनेजर तर 25 टक्के कट मागत आहेत. आम्ही जर एवढा कट दिला तर या रेटमध्ये तुम्हाला माल पुरवणे आम्हाला कसे शक्य होईल?' तो दुसरा माणूस म्हणाला

'ठीक आहे, मी बघतो!' कार्लेकर साहेबांचा आवाज होता

हे ऐकुन नितीन सर्दच झाला होता. तो काहीतरी बोलणार येवढ्यात कार्लेकर साहेबांनी त्याला हाताने थांबायची खूण केली व इंटरकॉमवर, 'रामुला आत पाठवा' म्हणुन सांगीतले. थोड्याच वेळात रामू एक भले मोठे इन्वेलप घेऊन आत आला. रामुला बघून नितीनला घामच फुटला. कार्लोकर साहेबांनी ते इन्वेलप उघडले म्हणाले, 'यात बरेच इंटरेस्टींग फोटो आहेत! बघ!' म्हणुन त्यांनी ते फोटो नितीनसमोर टाकले. नितीन ज्या ज्या फाईव्हस्टार हॉटेलमधील पार्ट्यांना गेला होता त्या सर्व पारट्यांचे ते फोटो होते. 'हा फोटो बघ! हा फार इंटरेस्टींग आहे!' कार्लेकर साहेब म्हणाले. तो नितीनचा एका मोठ्या गेटसमोरचा फोटो होता. 'तु कंपनीच्या कामासाठी बाहेर जातोस व रेस खेळायला रेसकोर्सवर जातोस त्याचा हा फोटो आहे!' ते फोटो बघुन तर नितीन उडालाच. 'हे फोटो रामुने काढले आहेत. तो माझा स्पाय म्हणुन तुझ्या डिपार्टमेन्टमध्ये काम करत होता! थँक यु रामु!' कार्लेकर साहेब म्हणाले.

नितीनचा चेहेरा काळा ठिक्कर पडला होता. 'तुला माहित्ये की मी तुला वारंवार प्रमोशन्स का देत होतो?' कार्लेकर साहेबांनी विचारले. नितीन काहीतरी उत्तर देणार

तेवढ्यात तेच म्हणाले, 'तु एका मध्यमवर्गीय कुटुंबातून आला आहेस. आई वडीलांचा एकुलता एक आहेस. तुझ्यावर त्यांची तसेच तुझ्या लहान बहीणीची जबाबदारी आहे. मी सुद्धा तुझ्यासारखाच मध्यमवर्गीय कुटुंबातून आलो आहे. जेव्हा तुझ्याविषयी तक्रारी येऊ लागल्या तेव्हा मला वाटले की तुला पगार पुरत नसेल. म्हणुन मी तुला प्रमोशन देऊन तुझा पगार वाढवत गेलो. पण तुझी हाव काही संपेना! तुझी हाव दिवसेंदिवस वाढतच चालली. इतकेच नव्हे तर माझ्या कंपनीत प्रामाणिकपणे काम करणाऱ्या काही कर्मचाऱ्यांना पण तु बिघडवलेस. त्यामुळे मी तुला ताबडतोब नोकरीवरून काढुन टाकत आहे. एरवी मी तुझा राजीनामा मागण्याचे सौजन्य दाखवले असते. पण तुझा अपराध एवढा गंभीर आहे की तुझी हकालपट्टी करणेच योग्य. हा घे त्याचा मेमो. मी तुला फक्त अर्धा तास वेळ देतो आहे. तुझ्या केबीनमध्ये तुझे जे काही पर्सनल सामान असेल ते घेऊन ताबडतोब चालु लाग. तु जर अर्धा तासपेक्षा जास्त वेळ कंपनीत दिसलास तर सिक्युरीटी गार्डसतर्फे तुला हाकुन देण्यात येईल. तुझे जे काही ड्युज आहेत ते तुला उद्या सकाळी फॅक्टरी गेटवर मिळतील. यापुढे तु फॅक्टरी गेटच्या आसपास कुठे दिसलास किंवा 50 फुटांच्या आत जरी दिसलास तरी तुला अटक करून पोलिसांच्या ताब्यात देण्यात येईल!'

कार्लेकर साहेबांनी इंटरकॉम करताच दोन सिक्युरीटी गार्डस सिक्युरिटी इन्चार्जसकट हजर झाले. नितीन बाहेर पडला त्या आधीच नितीनची हकालपट्टी झाल्याची बातमी आख्या कंपनीत वेगाने पसरली होती.

यानंतर नितीनचे काय झाले काही कळले नाही. एवढे कळले की नितीनचे लग्न ठरले होते, साखरपुडा झाला होता पण ते लग्न मोडले. आई वडीलांनी तर नितीनचे नांवच टाकले आहे. नंतर कळले की नितीनने एक दोन ठिकाणी नेकऱ्या केल्या पण त्याचे 'कार्लेकर इंजिनीअरींग' मधले कर्तृत्व पोचले व त्याच्या या नेकऱ्या पण गेल्या. मग त्याने काही

बिझनेस करण्याचा प्रयत्न केला पण तेथे पण मार खाल्ला. आता तो भणंगासारखा कोठेतरी भटकत असतो. अती लोभाच्या हव्यासापायी नितीनने कारण नसताना आपल्या करीअरचे वाटोळे करून घेतले.

यावरून एक गोष्ट माझ्या लक्षात आली आहे. गुन्हा, मग तो लहान असो की मोठा असो, केव्हा ना केव्हातरी उघडकीला येतच असतो. केव्हा वा केव्हातरी पापाचा घडा हा भरतच असतो. प्रत्येक गुन्ह्याला शिक्षा ही असतेच असते व ती 'याची देही, याची डोळा' भोगायची असते. गुन्ह्याला दोन प्रकारची शिक्षा असते 'इन कॅश' व 'इन काईंड'

'इन कॅश' शिक्षा म्हणजे कोर्टात खटला वगैरे चालुन मिळणारी शिक्षा. ही शिक्षा किरकोळ दंड भरण्यापासुन ते जन्मठेपेपर्यंत तर काहीवेळा फाशीची पण असते. पण या शिक्षा सुसह्य असतात.

'इन काईंड' शिक्षा मात्र फार भयंकर असते. यामुळे माणसाचे जीवन उध्वस्त होऊ शकते. नितीनला जी शिक्षा मिळाली ती 'इन काईंड' प्रकारची आहे.

त्यामुळे कोणताही गुन्हा करताना प्रत्येकाने सावध असावे. केव्हा ना केव्हातरी आपल्याला या गुन्ह्याची शिक्षा मिळणार आहे याची जाणीव ठेवावी. ही शिक्षा शक्यतो 'इन कॅश' असावी 'इन काईंड' असु नये याची काळजी प्रत्येकाने घ्यावी.

अर्थात काय करायचे हे तुमचे तुम्ही ठरवायचे! कारण हे तुमचे आयुष्य आहे नाही कां?

## Walk, don't run! चाला, पळु नका

अमेरिकेतील पेनसिलव्हॅनिया विद्यापीठाच्या IV League विद्यालयाच्या 2012 सालच्या पदवीदानप्रसंगी निपुण मेहता यांनी केलेलं हे भाषण. निपुण हा Service Space ORG या स्वयंसेवी संस्थेचा संस्थापक आहे. तंत्रज्ञान, अर्थशास्त्र आणि स्वयंसेवकता अशा मुद्दय़ांवर ही संस्था काम करीत असते. पदवीदान समारंभासाठी इतका अनवट प्रमुख पाहुणा पहिल्यांदाच बोलावला गेला. त्याच्या बऱ्याचशा गाजलेल्या भाषणाचा हा स्वैर अनुवाद आहे.

“प्रिय मित्रांनो..

तुमच्यासमोर आज बोलताना मला खूप आनंद होतोय.

मी तुम्हाला माझीच कथा सांगतो..

2005 साली माझं लग्न झालं. इतरांसारखं मधुचंद्र वगैरे नेहमीचंच थंड हवेच्या ठिकाणी जाणं असं काही करायचं नाही, असं आमचं मत होतं. मी आणि माझ्या बायकोनं ठरवलं. आपण पुढचे तीन महिने फक्त चालत प्रवास करायचा. हे जमणार का आपल्याला? सर्वांगांनी विचार केला. दोघांचाही होकार आला. अडचणी तर होत्याच. ताजा संसार

होता. पैसे अर्थातच नव्हते. ते उभे करण्यासाठी आमच्याकडच्या सर्व वस्तू आम्ही विकल्या. त्यातून भारतात जायचा आणि यायचा खर्च निघाला. ठरवलं की मोजकेच पैसे बरोबर ठेवायचे. दिवसाला किती खर्च करायचे? तर फक्त एक डॉलर-  म्हणजे तेव्हाचे ४५/४६ रुपये. यात जे परवडेल तेच खायचं. जमेल तिथेच राहायचं. त्यापेक्षा एक पैही अधिक खर्च करायची नाही, असा निर्धार केला. आम्ही लक्ष्य ठेवलं एक हजार किलोमीटर चालण्याचं. गांधी आश्रमात जाऊन डोकं ठेवलं. गांधी आश्रमच का? तर त्या माणसाला चालण्याचं महत्त्व कळलं होतं म्हणुन. आणि सरळ दक्षिणेकडे चालायला सुरुवात केली. पुढचे तीन महिने आम्ही फक्त चालतच होतो. काय शिकवलं या तीन महिन्यांनी?

‘Walk’मधला W: Witness.  (Witness)

तुम्ही जेव्हा चालत असता तेव्हा तुम्हाला खूप खूप गोष्टी दिसत असतात. मोटारीतून जाता तेव्हा डोळय़ांपुढे 40 अंशांचा कोन असतो. पण जेव्हा चालता तेव्हा डोळय़ाला केंद्रभागी ठेवुन 180 अंश कोनातून तुम्हाला परिसर दिसत असतो. त्यामुळे खूप गोष्टी नव्याने कळल्या. रोजच्या सूर्योदयाचं वा सूर्यास्ताचं आकाश. त्या वेळी दिसणारी बगळय़ांची रांग. संध्याकाळी त्या वेळी जिथे असू तिथल्या टपरीवर कटिंग चहा पीत हे सगळं बघणं. केवळ स्वर्गीय. तेव्हा जाणवलं. फेसबुकवर फ्रेंड वाढवत नेण्यापेक्षा अशा खऱ्याखुऱ्या अनुभवांना, मित्रांना सामोरं जाणं हे जास्त आनंददायी असतं. आणखी एक गोष्ट जाणवली. ती म्हणजे वेगामुळे माणसा-माणसामधली दरी वाढतच जाते. चालण्यामुळे ती सहजपणे बुजवली जाते. चालता चालता जे दिसतं, ते पाहून आपण किती सहज काय

काय शिकू शकतो. आम्हा दोघांनाही जाणवलं आपण आपल्या गरजा एरवीच्या आयुष्यात किती वाढवून ठेवल्या आहेत ते. आणि दुसरं म्हणजे चालण्यामुळे अतीच्या हव्यासाला आळा बसतो. आम्हाला एक शेतकरी सहजपणे म्हणाला.. अहो तुम्ही हे मिळवलं ते मिळवलं म्हणता.. पण सूर्याला देतो त्यापेक्षा अधिक प्रकाश द्यायला तुम्ही भाग पाडू शकत नाही, चांदण्याला अधिक बरस म्हणुन सांगू शकत नाही आणि ढगांमधलं पाणी वाटतं म्हणुन अधिक ओतायला लावू शकत नाही. काही गोष्टी आहेत तितक्याच स्वीकारायच्या असतात आणि जगायचं असतं.

हा केवढा मोठा धडा आम्हाला चालण्यानं शिकवला.

‘Walk’मधला a: ॲक्सेप्ट. (Accept)

आपण जेव्हा चालत असतो तेव्हा विश्वाच्या या प्रचंड पसाऱ्यात एक टिंबही नसतो. आम्ही भर उन्हात चाललो, पावसात चाललो. उन्हात वाटायचं कधी एकदा सावली येत्ये, पावसात आडोशाची आस असायची. कधी ती सावली यायची वा आडोसा मिळायचा. बऱ्याचदा नाहीही. पण नाही मिळाला तो म्हणुन वाईट नाही वाटायचं. एकदा आम्हाला पाटी  दिसली, इथे मोफत मुक्काम करू दिला जाईल म्हणुन. आम्ही दोघेही आनंदून गेलो. त्या घरात शिरलो. चांगला मोठा वाडाच होता. अनेक खोल्यांचा. आत गेल्यावर आतल्यानं विचारलं. आमच्या देवळात आलात का? देवळात येणाऱ्यांनाच फुकट राहता येतं. वास्तविक हो, त्यासाठीच आलोय, असं सांगून आम्हाला वेळ मारून नेता आली असती. पण आम्ही तसं केलं नाही. सांगितलं- देवळासाठी म्हणुन आलेलो नाही. हे ऐकल्यावर

त्यांनी आम्हाला खोली दिली नाही. पण रात्र होती म्हणुन दया दाखवली. काय? तर मला पुरुषांच्या स्वच्छतागृहाबाहेर आणि बायकोला महिलांच्या.. रात्र घालवायची परवानगी दिली. आम्ही झोपलो तसेच. उपाशी. कारण देवळात नाही म्हणुन प्रसादाचं जेवण नाही. एक साधी थाप मारून आमचा प्रश्न मिटवता आला असता. पण आम्ही तसं केलं नाही. आम्ही समोर आलेली परिस्थिती स्वीकारली. हे आम्हाला चालण्यानं शिकवलं.

## ‘Walk’मधला L: लव्ह. (Love)

चालताना आपण आसपासच्या परिसराशी नकळतपणे तादात्म्य पावत असतो. आसपासचा निसर्ग आपल्याला खूप शिकवत जातो. फुकट. त्या बदल्यात तो काहीही मागत नाही. हल्ली सगळय़ांचा समज असतो आपल्याकडे भरपूर काही जमल्याशिवाय देताच येणार नाही. पण हे भरपूर जमवता जमवताच इतकी दमछाक होते की द्यायची जाणीवच मागे पडते. आणि हे भरपूर म्हणजे किती, हे तरी कुठे नक्की करता येतं? या चालण्यात त्यामुळे आयुष्यातील सगळय़ात मोठा धडा मिळाला. तो म्हणजे ज्याच्याकडे काहीही नाही असं वाटत असतं तोच बरंच काही देत असतो. ज्याच्याकडे बरंच काही आहे, त्याच्याहीपेक्षा. शहरात आमच्याकडे बघून अनेकांना प्रश्न पडायचा. हे असं का करतायत? पण गावात बरोबर त्याच्या उलट. तिथे उत्सुकता असायची.. अरे तुम्ही आमच्या गावातले वाटत नाही, कोण कुठचे आहात, असे प्रश्न असायचे.. भाकरतुकडा पुढे केला जायचा. मुद्दा हा की तुम्ही कोण, किती मोठे आहात त्यावर तुमचं कसं स्वागत करायचं ही शहरी पद्धत गावात नाही. माणसं मुक्तपणानं एकमेकांचं स्वागत करतात. ते पाहिल्यावर जाणवतं ते

हेच की खऱ्या दातृत्वासाठी खूप काही असावं लागतं हा समजच मुळात चुकीचा आहे. तो आमच्या मनातून दूर झाला केवळ चालण्यामुळे.

'Walk'मधला K: नो युवरसेल्फ. (Know yourself)

तळ्यातल्या पाण्याचा तळ पाहायचा असेल तर पाणी शांत व्हावं लागतं. मनाचंही तसंच आहे. चालताना काही काळानंतर आपल्या मनाला अशी शांत उसंत मिळते. आत डोकावून बघण्यासाठी. आपली दोन मनं असतात. एकाला फक्त प्रगती हवी असते. सरळ उंच जाणारी. दुसऱ्याला आडवंही वाढायचं असतं. रोजच्या स्पर्धेच्या युगात आपण या दुसऱ्याकडे लक्षच देत नाही. नियमितपणे चालायची सवय लावुन घेतली तर या दुसऱ्या मनाकडे लक्ष देता येतं. त्याचं म्हणणं ऐकता येतं. त्याचंही ऐकायची सवय लागली की वाढ परिपूर्ण व्हायला लागते. आपण आपल्याला कळू लागतो.

तेव्हा मित्रांनो महाविद्यालयाच्या प्रांगणातून जगण्याच्या हमरस्त्यावर प्रवेश कराल तेव्हा लक्षात ठेवा की केवळ वेग म्हणजेच सर्वस्व नव्हे. पदवीदानाच्या आजच्या क्षणी असं काही ऐकणं तुम्हाला विचित्र वाटेल. वाटू द्या. पण तुमच्या प्रवासातला एखादा टप्पा तरी त्यामुळे उजळून निघेल अशी मला आशा आहे आणि मला तेवढंही पुरे आहे.

थोडक्यांत Walk म्हणजे नुसते चालणे नव्हे. तर ते म्हणजे प्रत्यक्ष अनुभव, (Witness), तो स्विकारायची तयारी (Acceptance), प्रेम (Love) व स्वतःला ओळखणे (Know Yourself) याचे सुरेख कॉम्बीनेशन आहे.

म्हणुनच थोरांनी सांगीतले आहे ' Walk DON'T Run ' चाला, पळु नका.

तुमच्यातील कितीजण चालत असतात व किती जण पळत असतात?

(मला श्री. अजित गद्रे यांनी हे भाषण ई-मेलवर पाठवले. मला ते आवडले व भावले म्हणुन मी हे आपल्याबरोबर शेअर करीत आहे. ईतकी सुरेख मेल पाठवल्याबद्दल श्री. अजित गद्रे यांचे शतशः आभार.)

-26-

## चांगला बाप

रॉबर्टचा जन्म इंग्लंडमध्ये, लंडनजवळ असलेल्या एका छोट्या शहरात झाला. आईवडीलांचा तो एकुलता एक! त्या शहरात लेलॅन्ड कंपनीचा मोटारी बनवण्याचा एक कारखाना होता. रॉबर्टचे वडील त्या कारखान्यात कामगार म्हणुन काम करत होते. गाडीची चाके फिट करणे हे त्यांचे काम होते. त्याआधी ते 'ब्रिटिश आर्मीत' होते. त्यांनी दुसऱ्या महायुद्धात भाग घेतला होता. युरोपमधील अनेक देशांच्या आघाड्यांवर ते लढले होते. बंदुकीची गोळी उजव्या पायात घुसल्याने ते थोडेसे लंगडत चालत असत. दुसरे महायुद्ध संपल्यावर त्यांनी निवृत्ती स्विकारली व लेलॅन्ड कंपनीत कामाला लागले. त्यांना चांगले निवृत्तीवेतन म्हणजे पेन्शन मिळत होते. लेलॅन्ड कंपनीत पण चांगला पगार मिळत होता. शहरात त्यांनी स्वतःचे एक छोटेसे टुमदार घर पण बांधले होते. थोडक्यात त्यांचे चांगले सुखी कुटुंब होते. रॉबर्टची पण वडिलांसारखीच लेलॅन्ड कंपनीत काम करण्याची ईच्छा होती. त्याला ठाऊक होते की त्या शहरातील मुलांना शालेय शिक्षण संपल्यावर लेलॅन्ड कंपनीत लगेच नोकरी लागते. 17 व्या-18व्या वर्षीच या मुलांना चांगले पैसे मिळू लागतात व ते रुबाबात गावात फिरू लागतात. त्यामुळे आपले शालेय शिक्षण केव्हा पुरे होते व केव्हा आपण लॅलॅन्ड कंपनीत नोकरीला लागतो असे रॉबर्टला झाले होते.

पण रॉबर्टच्या या विचारांना मात्र त्याच्या वडिलांचा सक्त विरोध होता. त्यांचे म्हणणे होते की रॉबर्टने पुढे शिकावे किंवा दुसऱ्या कामाचा अनुभव घ्यावा. यावरून रॉबर्टचे त्याच्या वडिलांशी नेहमी खटके उडत असत, वादावादी होत असे. मग रॉबर्टच्या आईला मध्यस्ती करावी लागत असे. एवढा प्रकार सोडला तर कुटुंबातील वातावरण नेहमी शांत व खेळीमेळीचे असे.

रॉबर्टचे शालेय शिक्षण संपले. त्याने लेलॅन्ड कंपनीत अर्ज केला व त्याला इंटव्ह्र्युचा कॉल पण आला. इंटव्ह्र्युच्या आदल्या दिवशी रॉबर्टचे वडील त्याला म्हणाले, 'तु कंपनीत अर्ज केल्याचे व उद्या तुझा इंन्टव्ह्र्यु असल्याचे मला आजच कळाले. माझे साहेबच इन्टव्ह्रु घेणार आहेत. त्यांना मी तुला इन्टव्ह्रुमध्ये नापास करायला सांगीतले आहे.'

हे ऐकुन रॉबर्ट चांगलाच खवळला. हाती-तोंडी आलेली नोकरी वडिलांमुळे जाणार होती. त्या रात्री रॉबर्टचे त्याच्या वडीलांशी जोरदार भांडण झाले. वडील आपला हेका साडायला काही तयार नव्हते. शेवटी आईने मध्यस्ती केली. ' तु जर एक वर्ष मी सांगीन त्या ठिकाणी काम करायला तयार असशील तर मी तुला माझ्या कंपनीत काम करण्याची परवानगी देईन.' वडीलांनी सांगीतले. फक्त एकाच वर्षाचा प्रश्न होता. रॉबर्टने आपल्या वडीलांची अट मान्य केली.

दुसऱ्या दिवशी रॉबर्टच्या वडिलांनी कर्नल फॉक्स यांच्या नांवाने लिहीलेले पत्र रॉबर्टच्या हातात ठेवले, 'कर्नल फॉक्स मला चांगले ओळखतात. वॉरमध्ये आम्ही एकाच

युनीटमध्ये होतो. ते माझे कमांडर होते. आता ते लंडनमधील 'थ्रि एम्बसी' या हॉटेलमध्ये काम करतात. तु लंडनला जाऊन त्यांना भेट व हे पत्र दे. ते सांगतील तेथे तुला एक वर्ष काम करावे लागेल.'

मोठ्या अनिच्छेनेच रॉबर्ट लंडनला आला. तो पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या शहरात येत होता. लंडनची भव्यता बघून तो थोडासा गांगरून गेला. पण थ्रि एम्बसी हॉटेल शोधून काढणे मात्र त्याला अजिबात जड गेले नाही. कारण ते लंडनमधले अत्यंत प्रसिद्ध असे पंचतारांकीत हॉटेल होते. तो कर्नल फॉक्सना भेटला व वडिलांचे पत्र त्यांना दिले. कर्नल फॉक्स तेथे जनरल मॅनेजर म्हणुन काम करत होते. कर्नल फॉक्सनी त्याला लगेच बेलबॉय म्हणुन नोकरीवर ठेवले. सकाळी 7 ते रात्री 7 त्याची ड्युटी असेल असे सांगीतले. हॉटेलच्या बेसमेन्टमध्ये असलेल्या 8फूट बाय 8फूट व लाकडी पार्टीशन असलेल्या खोलीत त्याची रहाण्याची सोय केली. खोलीत एक जुनाट पलंग होता. रॉबर्टला ती खोली मुळीच आवडली नाही. पण कसेतरी एक वर्ष काढायचे व परत जायचे असे ठरवूनच रॉबर्ट आला होता. त्याने आल्या आल्या खोलीत एक कॅलेन्डर लावले व आलेल्या दिवसावर खुण केली. आता तो रोज दिवस संपल्यावर त्या कॅलेन्डरवर खूण करून किती दिवस राहीले हे मोजणार होता.

बेलबॉयचा जॉब तसा कठीणच आहे हे थोड्याच दिवसात रॉबर्टच्या लक्षात आले. हॉटेलमध्ये आलेल्या गेस्टचे सामान लॉबीमधून रुमपर्यंत न्यायचे व रुममधुन लॉबीपर्यंत आणायचे हे मुख्य काम होते. सामान न्यायला ट्रॉलीची व्यवस्था होती. पण लोक पुष्कळ जड जड सामान आणतात, भरपूर बॅगा घेऊन येतात हे रॉबर्टने पाहीले होते. तसेच ड्युटी

अवर्सला तसा काही अर्थ नव्हता. कधी कधी रात्री 11 वाजेपर्यंत पण काम करावे लागे. शरीर नुसते आंबुन जात असे. खाण्या पिण्याच्या वेळाही धड नव्हत्या. त्यातुन अजुन एक भानगड होती. बेलबॉयना मिळालेली टिप मॅनेजरकडे जमा करावी लागे. तो ही टिप हडप करत असे. बेलबॉयला मिळालेली टिप मॅनेजर हडप करतो हे काही रॉबर्टला आवडले नव्हते. एकदा रॉबर्टला 10 पौंड टिप मिळाली. ती त्याने मॅनेजरला दिली नाही म्हणुन मॅनेजरचा भडका उडाला. मॅनेजरने लगेच रॉबर्टविरुद्ध तक्रार केली व कर्नल साहेबांनी ताबडतोब रॉबर्टला भेटायला बोलावले.

‘ तुझ्याविरुद्ध गंभीर तक्रार आहे. तुला ताबडतोब नोकरीतून काढुन टाकावे अशी शिफरस आहे. पण तु वडिलांची अट पुर्ण करण्यासाठी आला आहेस. तुझ्याजागी दुसरा कोणीही असता तरी मी त्याची हकालपट्टी केली असती. उद्यापासुन तु किचनमध्ये काम करायचेस. किचना शेफ फ्रान्सीस हुशार माणुन असला तरी फार विचित्र माणुस आहे. त्याच्या हाताखाली माणसे फार वेळ टिकत नाहीत. फ्रान्सीसने जर तुझ्या विरुद्ध तक्रार केली तर मग मात्र तुला ‘आऊट’ व्हावे लागेल.’ कर्नलसाहेबांनी सांगीतले.

रॉबर्ट सांगीतल्याप्रमाणे शेफ फ्रान्सीसला भेटायला गेला आणि लगेचच त्याच्या लक्षात आले की फ्रान्सीसकडे माणसे का टिकत नाहीत ते. फ्रान्सीसचा प्रचंड आरडा ओरडा चालु होता. तो प्रत्येकाला झापडत होता. तोंडात सतत शिव्या असायच्या! अशा माणसाखाली कोण टिकणार? आपले कांही खरे नाही रॉबर्टला वाटले. ‘काय पाहीजे तुला?’ फ्रान्सीसने खेकसून विचारले.

‘ मला तुमच्याकडे कामाला पाठवले आहे!’ रॉबर्टने उत्तर दिले. ‘ तुला बटाटे धुता येतात?’ फ्रान्सीसने विचारले. ‘ होय येतात!’ रॉबर्टने उत्तर दिले. मोठ्या अवजड बॅगा उचलण्यापेक्षा बटाटे धुणे बरे असा रॉबर्टने विचार केला. फ्रान्सीस त्याला बटाटा सेक्शनमध्ये घेऊन आला. तेथे बटाट्यांचा ढीग पडला होता. ‘ हे बटाटे गरम पाण्यात स्वच्छ धुवायचे. जरा सुद्धा माती दिसता कामा नये कारण हे बटाटे सरळ शेतावरून येतात. जर कामात हलगर्जीपणा झाला तर बघ!’ असा दम देऊन फ्रान्सीस निघून गेला.

बटाटे धुण्याचे काम वाटते तेवढे सोपे नाही हे रॉबर्टच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. बटाटे हे हॉटेलचे मुख्य अन्न होते. रोज शेकडो पाऊंड बटाटे येत होते. ते गरम पाण्यात स्वच्छ धुवायचे. मग ते जवळच्या बॉयलरमध्ये अर्धवट उकडले जात. मग त्या बटाट्याची साले काढायचे काम मशीनवर व्हायचे. मग ते बटाटे चिरून त्याच्या फोडी करायचे काम मात्र हाताने चालायचे. चार दिवस रॉबर्ट नुसते बटाटे धुवत होता. घरी तो आईला किचनमध्ये मदत करत असताना बटाटे धुऊन देत असे. पण इथला प्रकारच वेगळा. बटाटे धुऊन धुऊन रॉबर्टच्या बोटाची सालतडी निघायची पाळी आली. पण चार दिवसानंतर एक छोटा अपघात झाला. बटाटे चिरणाऱ्या मुलाचा हात सुरीने कापला गेला. तो जखमी झाला. त्याला लगेच हॉस्पीटलमध्ये पाठवण्यात आले. दुसऱ्या कोणाची तरी नेमणूक करणे आवश्यक होते. ‘ तुला बटाटे चिरता येतात?’ फ्रान्सीसने रॉबर्टला विचारले. ‘ होय मी घरी आईला बटाटे चिरून देत असे!’ रॉबर्ट म्हणाला. ‘ ठीक आहे, मला एक बटाटा चिरून दाखव!’ हातातील सुरी रॉबर्टकडे देत फ्रान्सीस म्हणाला. रॉबर्टने लगेच एक बटाटा चिरून व त्याच्या फोडी करून दाखवल्या.

‘ ठीक आहे आजपासुन तु बटाटे चिरायचे काम कर!’ फ्रान्सीस म्हणाला.

बटाटे चिरण्याचे काम रॉबर्टला फारच आवडले. रोज शोकडो पाऊंड बटाटे कापावे लागत होते पण रॉबर्टची कांही तक्रार नव्हती. फ्रान्सीस पण खुश दिसत होता. ‘ चल मी तुला भाज्या कशा कापायच्या ते शिकवतो!’ एक दिवशी फ्रान्सीस खुषीत येऊन म्हणाला. निरनिराळया सुऱ्या घेऊन निरनिराळया भाज्या कशा चिरायच्या हे फ्रान्सीसने दाखवले. रॉबर्टने ही कला पण झटकन आत्मसात केली. या भाज्यांचा उपयोग करून खाण्याच्या डिशेस कशा डेकोरेट करायच्या हे पण फ्रान्सीसने शिकवले. लवकरच रॉबर्ट या कलेत पण पारंगत झाला. रॉबर्टच्या लक्षात आले की फ्रान्सीस खरोखरच ग्रेट शेफ आहे. खऱ्या अर्थाने कलाकार आहे. फ्रान्सीसने उत्तम उत्तम डिशेस बनवायच्या व रॉबर्टने त्या सुरेख डेकोरेट करायच्या असा प्रकार सुरू झाला. लोकांना तो फारच आवडला. दिवसें दिवस ‘थ्रि एम्बसी ’ हॉटेलच्या रेस्टॉरंटची लोकप्रीयता वाढत चालली. लोकांची गर्दी होऊ लागली. लोक येऊन लाईनीत उभे राहु लागले. अनेक वर्तमान पत्रांमधून या डिशेसची वर्णने करणारे लेख छापून येऊ लागले.

रॉबर्टला आता कामाला लागुन 8 महीने होत आले होते. एक दोनदा तो आपल्या गांवी जाऊन आई वडीलांना भेटून आला होता. एकदा सहज पेपर चाळता चाळता रॉबर्टची नजर एका छोठ्या जाहीरातीवर पडली. फ्रान्समध्ये पॅरिसजवळील एका छोट्या शहरात एक फ्रेन्च रेस्टॉरंट विकायला काढले होते त्याची ती जाहीरात होती. हे हॉटेल एक फ्रेन्च महिला चालवत होती पण आता तिचे वय झाल्यामूळे तिने हे हॉटेल विकायला काढले होते.

‘चल आपण ते हॉटेल बघायला जाऊ!’ रॉबर्ट फ्रान्सीसला म्हणाला. ‘आणि जाऊन काय करायचे?’ फ्रान्सीसने विचारले. ‘जमल तर विकत घेऊ’ रॉबर्ट म्हणाला. ‘आणि ते चालवणार कोण?’ फ्रान्सीस म्हणाला. ‘आपण दोघ, पार्टनरशीपमध्ये. तु किचन सांभाळायचेस व मी बाहेरचे बघणार!’ रॉबर्ट म्हणाला. ‘वेडा का खुळा. मी ही माझी चांगली नोकरी कशासाठी सोडु?’ फ्रान्सीस म्हणाला.

‘ठीक आहे! माझ्याबरोबर फिरायला म्हणुन तरी चल!’ रॉबर्ट म्हणाला. फ्रान्सीस कसाबसा तयार झाला.

दोन दोन दिवसांची रजा टाकून दोघे पॅरिसजवळील त्या शहरात पोचले. प्रथमदर्शनीच त्यांना ते फ्रेन्च रेस्टॉरंट आवडले. ‘ जे लोक माझ्या ट्रॅडीशनप्रमाणे रेस्टॉरंट चालवतील त्यांनाच मी ते विकणार आहे’ मालकिणीने सांगीतले. ‘ ठीक आहे आम्ही 15 दिवस तुमचे हॉटेल भाड्याने चालवतो. आम्हालाही अंदाज येईल की हे आम्हाला जमेल की नाही व तुम्हालाही आमचा अंदाज येईल.’ रॉबर्टने सांगीतले. मालकीणबाई कबूल झाल्या. पण फ्रान्सीस याला कबुल होत नव्हता.

‘ आपण काय आयुष्यभर नोकरीच करायची काय?’ रॉबर्ट म्हणाला. ‘ हे रेस्टॉरंट नाही चालले तर?’ फ्रान्सीस म्हणाला. ‘ हा एक प्रयोग आहे! यशस्वी झाला तर ठीकच आहे. नाहीतर आपल्या नेकऱ्या आहेतच!’ रॉबर्टने सांगीतले.

दोघांनीही 15 दिवसांची रजा टाकली. यासाठी फ्रान्सीसला त्याच्या नसलेल्या बायकोच्या आजीला आजारी पाडावे लागले. कारण फ्रान्सीस अविवाहीत होता, त्याला

बायको नव्हती. तर रॉबर्टला त्याच्या नसलेल्या आत्याला 'हॉस्पिटलाईझ' करावे लागले. दोघेही फ्रान्समध्ये आले. ते फ्रेंच रेस्टॉरंट ताब्यात घेतले. आता फ्रान्सीसला त्याचे पाक कौशल्य दाखवायची व रॉबर्टला त्याचे व्यवस्थापन कौशल्य दाखवायची पूर्ण मुभा मिळणार होती. दोघांचीही कौशल्ये फळाला आली. रेस्टॉरंट जोरात चालु लागले. लोकांची गर्दी वाढू लागली. फ्रान्सीस रोज नव नवीन डिशेसची भर घालु लागला. त्या 15 दिवसांत त्या रेस्टॉरंटने तुफान धंदा केला. सगळा खर्च वजा जाता रॉबर्ट व फ्रान्सीसला चांगले पैसे उरले. 'बघ! केवळ 15 दिवसांत आपल्याला आपल्या पगाराच्या कितीतरी पट जास्त पैसे मिळाले! आपण हे हॉटेल विकत घोतले तर?' रॉबर्ट फ्रान्सीसला म्हणाला. लगेच हॉटेल विकत घ्यायचा निर्णय झाला. रॉबर्ट हॉटेलचा मालक असणार होता तर फ्रान्सीस वर्कींग पार्टनर असणार होता. होणारा प्रॉफीट निम्मा-निम्मा वाटुन घ्यायचे ठरले होते.

दोघानींही नोकरीचा राजीनामा दिला व फ्रेंच रेस्टॉरंट चालवायला घेतले. लवकरच त्यांचे हॉटेल प्रचंड लोकप्रीय झाले. रॉबर्टने आजुबाजुच्या गांवातील अजून तीन हॉटेल्स विकत घेतली. सर्व हॉटेल्स उत्तम चालु लागली. मग रॉबर्टने लंडनला पाचवे हॉटेल उघडले. त्याच्या उद्घाटनाला आई वडीलांना आवर्जुन बोलावले पण आई आजारी असल्याने ते येऊ शकले नाहीत. या गडबडीत रॉबर्टच्या वडीलांनी घातलेली एक वर्षाची अट केव्हा पुरी झाली हे रॉबर्टला कळलेच नाही. वयाच्या विशीच्या आतच रॉबर्ट आता पांच रेस्टॉरन्टसचा मालक बनला होता.

रॉबर्टने सहावे हॉटेल आपल्या गावी काढायचे ठरवले. त्याला हे हॉटेल सर्वात मोठे व सर्वोत्कृष्ट बनवायचे होते. त्याला गांवात मोक्याची जागा पण मिळाली. बघता बघता रॉबर्टच्या स्वप्नातील हॉटेल उभे राहीले. त्याचा भव्य उद्घाटन समारंभाला रॉबर्टने अनेक प्रतिष्ठीत लोक बोलावले होते. त्यात अनेक राजकीय पुढारी होते, अनेक लॉर्डस व उमराव होते, विविध क्षेत्रातील नावाजलेली मंडळी होती, पत्रकार व प्रेस रिपोर्टर पण होते.

उद्घाटनाच्या दिवशी रॉबर्टने हॉलच्या एका बाजुला एक छोटे स्टेज उभे केले. त्यावर एक टेबल व दोन खुर्च्या मांडल्या. त्यावर सतत मंद दिव्याचा झोत पडेल अशी व्यवस्था केली.हेड वेटरला बोलावुन सांगीतले, ‘या टेबलावर बसणारे गेस्ट माझ्या दृष्टीने फार महत्वाचे असणार आहेत. त्यांना तु स्वतः सर्व्ह करायचेस. त्यांना जे कांही हवे असेल ते द्यायचे व सर्वोत्तम क्वालिटीचे द्यायचे.’

हॉटेलचा उद्घाटन सोहोळा मोठ्या दिमाखात पार पडला व पार्टीला सुरवात झाली. पण सगळयांचे लक्ष त्या स्टेजवर बसलेल्या वृद्ध जोडप्याकडे जात होते. ते जोडपे बरेच गांवढळ वाटत होते. तिथल्या मॉबमध्ये ते अगदी विसंगत दिसत होते. त्या पुरुषाने तर अगदी ताळतंत्र सोडला होता. पीत काय होता, बका बका खात काय होता, भसाड्या आवाजात गाणी काय म्हणत होता. समोर बसलेली त्याची बायको बिचारी गप्प बसून हा तमाशा बघत होती.

‘कोण आहे हे गांवढळ जोडपे?’ एका खवचट पत्रकाराने रॉबर्टला विचारले, ‘बघा जरा सुद्धा मॅनर्स नाहीत.’

‘ते माझे आई वडील आहेत! मी त्यांचे एकुलतेएक अपत्य आहे!’ रॉबर्टने शांतपणे सांगीतले.

‘ओह! आय एम सॉरी!’ तो पत्रकार खजील होऊन म्हणाला, ‘पण त्यांना कोणी मॅनर्स शिकवले नाहीत कां?

‘त्याचे काय आहे! मला जसा चांगा बाप मिळाला तसा त्यांना मिळाला नाही!’ रॉबर्टने उत्तर दिले.

कितीतरी वेळ रॉबर्ट आपल्या गांवढळ वडीलांकडे अभीमानाने बघत होता. ‘जर त्यांनी एक वर्षाची अट टाकली नसती तर? मी लेलॅन्ड कंपनीत कामगार म्हणुनच राहीलो असतो.’ रॉबर्टच्या मनात सारखे विचार येत होते. आपल्या वडीलांच्या दूरदृष्टीबद्दल त्याच्या मनात आदराची भावना निर्माण झाली होती.

केणता बाप चांगला? जो बाप आपल्या मुलांच्या भवितव्याविषयी अचुक दूरदृष्टी ठेऊन मुलांना तसे घडवतो तो? का जो बाप आपल्या मुलांना नुसतेच शिकवुन मोठे करतो, कुठल्या कोर्सला मार्केट व्हॅल्यु आहे किंवा कुठला कोर्स केल्याने चांगल्या नोकऱ्या मिळतात हे बघून आपल्या मुलांना त्या कोर्सेसला त्यांची आवड नसताना बळजबरीने ढकलतो व भरभक्कम पगाराच्या नोकऱ्या मिळविण्यासाठी उद्युक्त करतात तो?

कोणता बप चांगला हे तुमचे तुम्हीच ठरवायचे नाही कां?

(जेंफ्री आर्चर यांच्या एका गाजलेल्या कथेचा स्वैर अनुवाद)

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १२ वे वर्ष. उल्हास जोशी यांचे हे सहावे पुस्तक.**

श्री. उल्हास जोशी हे एक नामवंत लेखक आहेत. ई साहित्यव्यतिरिक्त इतरही प्रकाशनांनी त्यांची पुस्तके प्र्स्काशित केली आहेत. पॉझिटिव्ह विचारांची व तरुणांना उत्साह देणारी त्यांची पुस्तके असतात. श्री. उल्हास जोशींसारखे ज्येष्ठ लेखक आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (तेरा पुस्तके), शुभांगी पासेबंद (सात पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले (सात पुस्तके), डॉ. नितीन मोरे (१७ पुस्तके), अनील वाकणकर (६ पुस्तके), अनंत पावसकर(चार पुस्तके), मधू शिरगांवकर (दोन), अशोक कोठारे (८ हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी ( आद्य गझलकारा, १० पुस्तके), विनीता देशपांडे (४ पुस्तके) उल्हास हरी जोशी(५), नंदिनी देशमुख (५), सुजाता चव्हाण (४) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।